काश्मिरात राज्य कुणाचे ?

सादिकसाहेबांचे !

छेः

कॉंग्रेसचे !

नावच नको.

भारत सरकारचे !

नाममात्र.

# माणूस

१४ ऑक्टोबर १९६७

चाळीस पैसे

आज तरी काश्मिरात

या अटीतटीच्या सीमाभागात

अराजकाचे थैमान सुरू आहे.

सप्टेंबर, २३

॥श्री॥

'माणूस' नित्य वाचतो.
आपले कौतुक मनात करतो.
कागदावर उतरवणे राहून जाते.
बालगंधर्वांविषयींचे
श्री. श्री. ज. जोशी
यांची 'एक संध्याकाळ'
आणि कानिटकरांचे
'दादा ते आलेच नाहीत'
हे दोन्हीही लेख अत्यंत सुंदर होते.
बालगंधर्वांविषयी अनेकांनी
अत्यंत आत्मीयतेने लिहिले. परंतु
हे दोन्हीही लेख
गाण्याच्याच उपमेने सांगायचे म्हणजे
नारायणरावांच्या
'बघु नको मजकडे
केविलवाण्या राजसबाळा'
इतके हृदयस्पर्शी
आणि आपुलकीने भिजलेले आहेत.
त्या दोघांनाही
माझे धन्यवाद कळवा.
कलावंताविषयीची
त्यांच्या लेखातील कृतज्ञता
औपचारिक नव्हती.
फार खोलवर रुजून आली होती.

पु. ल. देशपांडे, मुंबई.

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : विसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशाची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

स. न. सप्टें. २

'माणूस प्रतिनिधी'ने पाठविलेली वातमीपत्रे शक्यतो एका अंकात भरपूर द्यावीत. उदा. 'परमेश्वरी ते १५ ऑगस्ट' ह्या परवाच प्रसिद्ध झालेल्या पंडित आंदोलनाचे वातमीपत्र अत्यंत तोकडे वाटते. अजून १-२ पाने ते असते तर फारच छान झाले असते. पुढील अंकातून ते येईलच. परंतु आठ दिवस उत्कंठा ताणून एका महत्त्वाच्या विषयापासून आपण वाचकांस अलग ठेवता आहात. **डॉ. एस्. डी. चिंचूरकर, खेड.**

स. न. ऑक्टोबर, १

मी 'माणूस' नियमित वाचतो. श्री. सदाशिव पेठकरांच्या 'दिल्ली दरबार'ची सर मोंगलाईच्या 'दिल्ली दरबार'ला सुद्धा आली नसती. सोप्या व सरळ शब्दांच्या मालिकेत इतके मार्मिक व सडेतोड राजकारण क्वचितच वाचावयास मिळते. आपली मुक्ताफळे, विचारवारे, क्रीडांगण, रातराणी, ही सदरे स्तुत्य आहेत. जाताजाता एकच विनंती, की शक्य असल्यास 'सामान्य ज्ञान' सदर सुरू करावे. **अशोक नाडकर्णी, मुंबई.**

मूल्य ४० पसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच, असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# संमिश्र मंत्रिमंडळाची शोकांतिका

पश्चिम बंगालमध्ये संयुक्त मंत्रिमंडळ गेले काही दिवस इतके हेलकावे खात आहे की प्रशासनाच्या दैनंदिन कामकाजाकडे लक्ष द्यायची एकाही मंत्र्याला गरज वाटत नाही. दररोज सकाळ–संध्याकाळ इतक्या बैठकी आणि इतकी खलबते चालू आहेत की कोण कोणाच्या बाजूचा आहे याचा मुळीच उलगडा होऊ शकत नाही. आणि या परिस्थितीला स्वतः मुख्य मंत्री अजय मुकर्जी हेच जबाबदार आहेत. अजयबाबूंच्या वैयक्तिक चारित्र्याबद्दल बंगाली माणूस मोठ्या आदराने बोलत असतो. परंतु वैयक्तिक निःस्पृहता हा राजकारणी व्यक्तीचा एकमेव सद्‌गुण राजनीतीच्या बिकट वाटेवर पुरेसा पडत नाही. अजयबाबू काँग्रेसमधून बाहेर पडले ते अतुल्य घोषप्रभृतींच्या भ्रष्टाचारी कारवायांना कंटाळून. बंगला काँग्रेस स्थापण्यातही त्यांनी पुढाकार घेतला. वस्तुतः अतुल्य घोष यांची पश्चिम बंगाल काँग्रेस आणि अजयबाबूंची बंगला काँग्रेस यांच्या ध्येयधोरणात फरक नाही. परंतु अतुल्य घोष यांच्या दडपशाहीचा वीट आल्यामुळेच बंडखोर काँग्रेसजनांनी बंगला काँग्रेसचा सवता सुभा उभारला.

सध्याची देशातील परिस्थिती अशी आहे की सर्वसामान्य माणूस काँग्रेसच्या वशिलेबाजी आणि लाचलुचपत यांनी लडबडलेल्या राजवटीला पुरेपूर कंटाळला आहे. काँग्रेसशिवाय दुसरा कोणताही समर्थ पक्ष डोळ्यांसमोर नसल्यामुळे लोकांनी गेल्या निवडणुकीत काँग्रेसविरोध या एकाच कारणामुळे काँग्रेसेतर पक्षांच्या उमेदवारांना मते दिली. बंगला काँग्रेसही बंगालमध्ये विजयी झाली ती याच काँग्रेसविरोधी लोकमताच्या बळावर. परंतु लोकांनी आपल्याला का मते दिली आहेत याचा काँग्रेसेतर पक्षांच्या उमेदवारांना विवेक राहिला नाही. त्यामुळेच प्रत्येक पक्षाने आपापल्या तत्त्वज्ञानाची पोथी कपाटात ठेवून विचित्र शय्यासोबतीचे घादांत संधिसाधू धोरण स्वीकारले. खरे म्हणजे पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसेतर पक्षांचे सरकार स्थापन करताना अजयबाबूंनी आपण मंत्रिमंडळ बनविण्याच्या उत्साहात कोणाशी हातमिळवणी करीत आहोत याचे भान ठेवायला हवे होते. भारतात अराजक माजावे यासाठी लाल चीनसारख्या भारताच्या प्रच्छन्न शत्रूशी संगनमत करणाऱ्या कम्युनिस्टांना मंत्रिमंडळाचे दरवाजे एकदा खुले केल्यानंतर ते आपले सर्वभक्षक स्वरूप दाखविल्याशिवाय राहणार नाहीत हे निदान या

मुरव्वी राजकारणपटूला समजावयाला काहीच हरकत नव्हती. परंतु घडले ते नेमके उलटेच ! अजयबाबूंनी कम्युनिस्टांना आपल्या मंत्रिमंडळात घेतले एवढेच नाही तर अर्थखात्यासारखे महत्त्वाचे खाते एका कम्युनिस्टाकडे सोपविले. सरकार बनविण्यासाठी उतावीळ झालेल्या मंडळींच्या हातून एकदा ही घोडचूक झाल्यानंतर सारी राज्ययंत्रणा कम्युनिस्ट आपल्या पक्षीय स्वार्थासाठी राबवीत आहेत अशी आता तक्रार करण्याचा अजयबाबूप्रभृतींना कोणता अधिकार उरतो ? भारत हे एक राष्ट्र आहे आणि त्याचे स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व अबाधित राहिले पाहिजे एवढे किमान तत्त्व ज्यांना मान्य आहे अशा पक्षांची सोयरीक ही समजण्यासारखी गोष्ट आहे. पण ज्यांना दिल्लीपेक्षा पेकिंग किंवा मॉस्को अधिक जवळचे वाटते अशा सर्वथैव राष्ट्रद्रोही प्रवृत्तींशी हातमिळवणी केल्यानंतर नक्षलबारी होणे हेच अपरिहार्य ठरते.

अर्थात ही केवळ बंगालचीच शोककथा आहे असे नव्हे. जेथे जेथे म्हणून संयुक्त मंत्रिमंडळाचा प्रयोग करण्यात आला तेथे तेथे कम्युनिस्टांचा हा राष्ट्रघातकी उपद्रव हळूहळू कर्करोगाप्रमाणे वाढू लागला आहे. आणि म्हणूनच आता कोठे या सोयरीकप्रकरणाचा फेरविचार करण्याची गरज एक कम्युनिस्ट सोडले तर साऱ्याच पक्षांना वाटू लागली आहे. उत्तर प्रदेश मंत्रिमंडळातून बाहेर पडण्याची भाषा संयुक्त समाजवादी पक्ष व स्वतंत्र पक्ष बोलू लागले आहेत. या असल्या संयुक्त आघाडीच्या राजकारणाबाबत प्र. स. पक्ष प्रारंभापासून फार सोवळा. परंतु ही अशी संमिश्र सरकारे अपरिहार्य आहेत असे या पक्षाचे लोकसभेतील नेते श्री. सुरेंद्रनाथ द्विवेदी गेल्या मार्चमध्ये मला म्हणाले होते. आता मात्र हेच द्विवेदी संयुक्त आघाड्यांच्या राजकारणातून काहीही विधायक निष्पन्न झालेले नाही अशी कबुली देऊ लागले आहेत.

अद्यापही ही संमिश्र सरकारे तग धरून आहेत ती त्यांच्या कर्तृत्वामुळे नव्हे; या सरकारांचा कारभार आणि काँग्रेसी सरकारांचा कारभार यांत डावेउजवे करण्याजोगे काहीही नाही हे लोकांना पुरेपूर अनुभवाला आलेले आहे. तरीदेखील त्यांना काँग्रेसचे सरकार प्रस्थापित होणे ही गोष्ट मान्य नसल्यामुळे ही संमिश्र सरकारे अधिकारावर उभी आहेत. परंतु त्यांच्यामागचे गेल्या मार्चमध्ये आढळून येणारे वलय पार नाहीसे झाले आहे. या संमिश्र सरकारांना राष्ट्रीय धोरण नाही. जनतेचे दैनंदिन प्रश्न सोडविण्याबाबत उत्साह नाही. काँग्रेसेतर पक्षांनाही सत्तेची चटक लागली आहे व लोकमताच्या पाठिंब्यावर ते आपली चटक भागवून घेत आहेत यापेक्षा या राजवटींना कोणताही व्यावहारिक वा उदात्त अर्थ उरलेला नाही. प्रवाहपतिताप्रमाणे वाहत जाणाऱ्या या राजकीय पक्षांमध्ये लोकांचे नेतृत्व करण्याचा वकूब उरलेला नाही. लोकमत जिकडे असेल तिकडे फरफटत जाण्याविना यांना कोणताही मार्ग उरलेला नाही. या मार्गाऐवजी एखादे जनआंदोलन उभारून लोकांच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्याची त्यांची सारी उभारी नष्ट झाली आहे.

१४ ऑक्टोबर १९६७

या असल्या राजकारणाने काही मूठभर व्यक्तींचे तात्कालिक फायदे होत असले तरी देशकारणाचा गाडा पुढे नेण्याच्या कार्याला या राजकारणाचा कवडीचाही उपयोग नाही. या असल्या सत्ताबाज लोकशाहीमुळे कोणत्याही देशाचा युद्धोत्तर काळातील फ्रान्स व्हायला वेळ लागत नाही हे मतांसाठी लोकांपुढे जोगवा मागताना भरघोस आश्वासने देणाऱ्या या लोकप्रतिनिधींना उमगत नाही असे तरी कसे मानावयाचे ?

गेल्या मार्चमध्ये हे सारे कॉंग्रेसेतर पक्ष दिल्लीचे राजसिंहासन सहा महिन्यांत हलवून टाकण्याची भाषा बोलत होते. आता या पक्षनेत्यांची तोंडे इतक्या भिन्न-भिन्न दिशांना वळली आहेत की दिल्लीतल्या केंद्रीय राजकारणावरचा त्यांचा प्रभाव कितीतरी प्रमाणात ओसरल्याचे दृश्य दिसत आहे. पाच वर्षांनी येणारी निवडणूक कशी जिंकावयाची व त्यासाठी लोकांना मूलथापा कशा द्यायच्या याच सवंग राज-नीतीला चटावलेल्या कार्यकर्त्यांच्या हातून देशाचे भले होईल अशी आशा बाळगणे हाच मूर्खपणा ठरतो.

## मनमाड मार्ग की मद्रास मार्ग ?

बेळगाव-कारवार भागाबाबतचा महाजन मंडळाचा अहवाल सरकारने अधिकृत रीतीने प्रसिद्ध केला नसला तरी त्याचा आशय सर्वांना कळून चुकला आहे. बेळगाव आणि कारवार ही दोन शहरे आणि त्यालगतचा मराठी भाषिक प्रदेश महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात आला पाहिजे यासाठी या सीमाभागांतील जनता गेली अठरा वर्षे लढा देत आहे. लोकमत व्यक्त करण्याचे सर्व मार्ग या सीमाभागातील जनतेने अवलंबिले. निवडणुका जिंकण्यापासून तो करबंदीची चळवळ हाती घेण्यापर्यंतचे सारे उपाय वापरून झाले. परंतु तरीही या जनतेच्या मागणीकडे केंद्रीय कॉंग्रेस नेत्यांचे लक्ष गेलेले नव्हते.

निवडणुकीच्या वेळी या प्रश्नाच्या निमित्ताने महाराष्ट्रात आपल्याला विरोध होऊ नये या हेतून कॉंग्रेस-नेत्यांनी या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी एक चौकशी मंडळ नेमण्याचे ठरविले. वस्तुतः या प्रश्नासंबंधीचा इतका कागदपुरावा पुढे आलेला होता की त्यासाठी पुन्हा एकदा चौकशी मंडळ नेमण्याची काहीही गरज नव्हती. परंतु ही गोष्ट खणखणीत शब्दांत कॉंग्रेस-नेत्यांपुढे सांगण्याचे महाराष्ट्र कॉंग्रेसच्या नेत्यांना धैर्य झाले नाही. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसलाही या सीमा भागातील जनते-बद्दल फारशी आस्था होती असे नव्हे. निवडणुकीच्या वेळी या प्रश्नावरून संपूर्ण महाराष्ट्र समितीच्या हाती प्रभावी शस्त्र सापडू नये एवढा आपमतलबी विचार करूनच महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसने चौकशी मंडळ नेमण्याचा आग्रह धरला. कोण-तीही कार्यकक्षा निश्चित न करता महाजन मंडळ नेमले गेले. कोणतीही कार्यकक्षा न ठरविता नेमले गेलेले हे पहिलेच चौकशी मंडळ असावे. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसने तीही अट मान्य केली. अशा परिस्थितीत कोणत्याही तत्त्वांचा निकष न लावता

[ पृष्ठ ६४ वर चालू ]

मुक्काम श्रीनगर

माणूस प्रतिनिधी

# ४

चोवीस ऑगस्टला दिवसभर तुरळक धरपकडी झाल्या पण रात्री पोलिसांना फारच चेव आला. संशयावरून, खाजगी वैमनस्यांवरून कुठल्याही घरावर रात्री–अपरात्री थाप मारावी, वॉरंट असो नसो, अंथरुणातून माणसे ओढून चौकीवर न्यावी, मारहाण करावी हा धुमाकूळ रात्रभर चालू होता. त्यामुळे पंचवीसच्या सकाळपासूनच वातावरण चिंताग्रस्त होते. गडबडून, घाबरून गेलेल्या स्त्री–पुरुषांची आंदोलन समितीच्या कचेरीकडे सारखी रीघ लागून राहिली होती. समितीचे कार्यकर्ते तरी, कुणाकुणाचे सांत्वन करणार, कुठेकुठे धावणार ! त्यांच्यापैकीच पुष्कळजण रात्रीच्या धडपकडीला बळी पडून गजाआड डांबले गेले होते. पण वातावरणच इतके ताणलेले आणि तापलेले होते, की अनाहूत कार्यकर्ते घराघरांतून, कचेऱ्याकचेऱ्यांतून आपणहून या आंदोलनात स्वतःला झोकून घेण्यासाठी पुढे सरसावत होते. संघटना नव्हती, कुठल्याही राजकीय पक्षाचे नेतृत्व नव्हते, पण जनतेच्या चळवळीचे हेच वैशिष्टच असते, की चळवळीबरोबरच संघटना आपोआप उभी राहत जाते आणि चळवळ जसजशी

पुढे पुढे सरकते, तसतसे नवे कार्यकर्ते आणि नेते यांचीही तिला कधी वाण पडत नाही. मात्र चळवळ म्हणजे कृत्रिम प्रक्षोभ किंवा केवळ भडकवाभडकीवी असता कामा नये. जनतेच्या जीवाभावाला ती खरोखरच स्पर्श करणारी असली पाहिजे. पंडित समाजाने गेल्या वीस वर्षांत काश्मीरमध्ये, त्यांच्या हक्काच्या घरामध्ये खरोखरच खूप सोसले होते, सर्व क्षेत्रातील जुलूम आणि पक्षपात मान खाली घालून सहन केला होता. या समाजाची काश्मिरातील संख्यात्मक ताकद ती किती ! शेकडा एक टक्कादेखील नाही. तरीपण अन्याय जिव्हारी झोंबला असेल तर एवढी लहानशी, आणि कुठल्याही क्षणी सहज चिरडून टाकता येण्याइतकी किरकोळ संख्याही केवढा प्रखर आणि तेजस्वी प्रतिकार करू शकते याचे हे एक अनुकरणीय उदाहरणच येथे घडत होते.

ज्या ठिकाणी आंदोलन समितीची मुख्य कचेरी होती ते शीतलनाथ मंदिर व त्या समोवतालचे आवार काही फारसे मोठे नव्हते. एकीकडे कचेरीबाहेर आवारात गर्दी वाढतच होती आणि दुसरीकडे त्या दिवशीच्या पाच जणांच्या तुकडीच्या सत्याग्रह कार्यक्रमाची जमवाजमवही सुरू होती. आदल्या दिवशीच्या व रात्रीच्या धरपकडींचा व अत्याचारांचा निषेध व सत्याग्रही तुकडीला निरोप यासाठी दुपारी दीडला आवारातच सभा योजली होती. आवाराकडे येणाऱ्या सर्व वाटा अगदी अरुंद व एका बाजूला तर घाण पाण्याचे डबके ! सभेला लोकांनी जाऊ नये म्हणून सर्व वाटा पोलिसांनी अडवलेल्या होत्या. तरी लहान मुले, स्त्रिया, म्हातारी माणसे–देखील सभेला लोटतच होती. समोरच्या डबक्यातूनही काही उत्साही तरुण पोहून सभास्थानी येत होते यावरून एकंदर वातावरणाची सहज कल्पना येऊ शकते. सभा सुरू झाली आणि सहस्रसहस्र मुखांतून घोषणा दिल्या जात होत्या ‘ हिंदुस्थान झिंदाबाद, हिंदु–मुस्लिम युनिटी झिंदाबाद, परमेश्वरीको छोड दो......’ तीन साडेतीनच्या सुमारास सभा संपली, सत्याग्रही तुकडी अटक करून घेण्यासाठी नियोजित स्थळाकडे निघाली, लोकही त्यांच्या मागोमाग लोटले आणि आता पोलिसांनी या पाचजणांना मोटारीतून घालून घेऊन जायचे ! गेल्या वीस दिवसांचा हा ठरलेला कार्यक्रम होता. पण या वेळी भलतेच झाले. सत्याग्रहींना अटक करण्याऐवजी पोलिसांनी बेदम मारझोडीला एकदम सुरुवातच केली. अनपेक्षित, अकल्पित अचानक. सर्व रस्ते रोखले गेले होते. एकच वाट–तीही अगदी अरुंद–बाहेर पडण्यासाठी मोकळी ठेवण्यात आली होती–आणि जवळजवळ तीस-चाळीस हजारांचा जनसमुदाय —लहान मुले, स्त्रिया, तरुण विद्यार्थी–विद्यार्थिनी, म्हातारेकोतारे. पोलिसांनी पुरी कोंडी केली आणि हत्यार चालू केले. लाठीहल्ला आणि अश्रुधूर तर खरेच; पण पोलिसांनी दगडफेक करावी ! हे कधी ऐकले नव्हते, वाचले नव्हते, पण तेही येथे ऐकायला–वाचायला मिळाले. थोड्याच वेळात आसपासच्या काही मुसलमानी घरातूनही दगडफेक सुरू झाली. जालियनवाला बागेची आठवण व्हावी असे हे

कोंडी करून निःशस्त्र जनतेवर हल्ला चढविण्याचे भ्याड कृत्य निदान काश्मिरातील पंडित समाज तरी कधीही विसरू शकणार नाही. कृती समितीच्या पत्रकात म्हटले आहे—

" Bleeding wounds of men, women, boys and girls at the Rattan Rani Hospital, are eloquent evidence of Kashmir's ' Jallian. wala Bagh ' enacted in the Shitalnath lane by the Kashmir Armed Police on 25th August '

..." It was a terrible, ghastly scene of premeditated massacre of peaceful unarmed people. About a thousanc fell senseless or wounded, broken bones and widely bruised '...

जखमेवर मीठ चोळावे तसा पुढचा प्रकार. जवळ जवळ हजारएक माणसे जखमी होऊन रस्त्यातच विव्हळत, कण्हत पडली; कुणाच्या बरगड्या मोडलेल्या, बहुतेकांची डोकी फुटलेली, कुणाचे हात, कुणाचे पाय – तरीही एकालाही सरकारी इस्पितळात प्रवेश मिळाला नाही. प्रवेश नाकारण्यातच आला. वाहनांची सोय तर नाहीच. १५ ऑगस्टच्या रिगल चौकातील हल्ल्यानंतर जखमींच्या बाबतीत हाच हेतुपुरस्सर पक्षपात केला गेला होता. त्याची पुन्हा पुनरावृत्ती. रेडक्रॉस ही तर मानवतावादी, आंतरराष्ट्रीय संस्था ना? पण तीही दडपणाखाली होती. १५ ऑगस्टला व २५ ऑगस्टलाही जखमींच्या शुश्रूषेला तिनेही नकार दर्शविला. एकीकडे वृत्तपत्रांची तोंडे बंद करण्यात आली होती, दुसरीकडे रेडक्रॉससारख्या स्वतंत्र सेवा संस्थाही वश करून घेण्यात आल्या होत्या. किती किती मार्गांनी पंडितांचे आंदोलन दडपून टाकण्यासाठी काश्मीर पोलिस व त्यांचे मंत्रिमंडळातील पाठीराखे गट प्रयत्न करीत होते आणि सादिकसाहेब किती असहाय्यपणे हे सारे पाहत राहिले होते याचा यापेक्षा अधिक पुरावा काय हवा? शेवटी ' रतनराणी ' या एका खाजगी दवाखान्यात जखमींना हलविण्यात आले – दवाखाना कसला? एका डॉक्टराचे दुमजली घरच ते. कसल्या खाटा आणि कसले वॉर्डस्? जागा मिळेल तेथे, व्हरांड्यात, आवारात, कसल्यातरी चिरगुटावर असंख्य जखमी विव्हळत पडले होते आणि मिळेल तो उपचार करून घेत होते.

जखमींचा त्या दिवशी प्रसिद्ध करण्यात आलेला तपशील असा–

| | |
|---|---|
| पुरुष | ११७७ |
| स्त्रिया | २९२ |
| मुले | ३५३ |
| एकूण | १८२२ |

इकडे गावात दुपारपासून अशाही अफवा फैलावू लागल्या होत्या, की काही मशिदींना आगी लावण्यात आल्या आणि काही मुसलमानांची घरेही लुटण्यात आली आहेत. एवढे निमित्त पुरे होते. आदल्या दिवशीची पुनरावृत्ती सुरू झाली, दंगली उसळत गेल्या, हिंदू वस्त्यांवर दगडफेक झाली. शिवीगाळ करीत आणि धमकावण्या देत गावभर मुसलमानांचे जमाव धुमाकूळ घालू लागले. रात्र पडली तरी हे असह्य प्रकार थांबले नाहीत. काश्मिर पोलिसांचे तर नावच नको, तिथे असलेले पंजाबचे आणि केंद्राचे पोलिसदलही कुठेच या अवाच्य गुंडगिरीला आवर घालताना दिसत नव्हते.

एक दिवस कसाबसा उलटला आणि दि. २७ ला पुन्हा एकदा पंडित समाजावर गुंडांची आणि पोलिसांची मोठी संक्रांत कोसळली. आतापर्यंत झालेल्या मारहाणीमुळे बरेच लोक अत्यवस्थ होते. प्रथम एक दोघे मृत्यु पावले तेव्हा त्यांच्या प्रेतांची परस्परच विल्हेवाट लावण्यात आली होती. नंतर आणखी दोघे गेले, त्यांची प्रेते नातेवाईकांच्या ताब्यात दिली गेली; कारण बरीच वादावादी या प्रकरणी होऊन चुकली होती. दि. २७ ला दुपारी या दोन जणांची मोठी अंत्ययात्रा निघाली व श्रीनगरातील बहुसंख्य पंडित समाज यात्रेत मोठ्या दुःखित अंतःकरणाने सहभागी झाला होता. 'ॐनमः शिवाय' हा मंत्र, काही भजने यापलीकडे या एवढ्या गंभीर मिरवणुकीतून शब्द उमटत नव्हता. घोषणा कटाक्षाने टाळल्या होत्या. पण नीलम टॉकीजवळ साध्या कपड्यातील पोलिसांनी आणि गुंडांनी मिरवणुकीवर पुन्हा एकदम हल्ला चढविला–' Rain of stone throwing & lathi charging' 'दगडांचा आणि लाठ्याकाठ्यांचा पाऊस पडला' असे या हल्ल्याचे वर्णन एका पत्रकात करण्यात आले आहे. शेवटी केंद्रीय राखीव दलाचे पोलिस मदतीला आले व पांगापांगा, पळापळ होऊन जागेवर राहिलेल्या निवडक लोकांनी झटपट अंत्यविधी कसाबसा उरकून घेतला.

पाठोपाठ छोटा बाजार, नवाब बाजार, चनबल, बाटामूल, या मुसलमान वस्तीतून जमाव बाहेर पडला आणि त्याने आसपास हिंदू घरांची लुटालूट आणि जाळपोळ करण्यास सुरुवात केली. डॉ. पेशिन यांचे औषधी दुकान प्रथम आगीच्या भक्ष्यस्थानी पडले, कारण आदल्या दिवशी सादिकसाहेबांनी बोलावलेल्या प्रमुख नागरिकांच्या सभेत डॉ. पेशिन यांनी पंडित समाजाची बाजू निर्भिडपणे मांडली होती, हा त्यांचा गुन्हा. एका बेकरीवाल्याचे दुकान जाळण्यात आले– आगीने त्या आसपासच्या दुकानांनाही घेरले. शिवाला मंदिराची मोडतोड व लुटालुट झाली. हॉस्पिटलमध्ये जखमींसाठी अन्न घेऊन चाललेली एक जीप अडवण्यात आली आणि अन्नाची नासाडी केली गेली. आसपासच्या वसतीतले एखाददुसरे हिंदूघर दिसले की त्यात जमाव घुसे. लुटालूट, दगडफेक, मोडतोड ओघानेच आली. काश्मिर

पोलिस, गृहरक्षादल यांचा काही उपयोग नव्हता, कारण या कुंपणांनी शेत खाण्याचे हे दिवस होते.

यानंतर कर्फ्यू आलाच. विनोद असा : सर्व हिंदू वसत्यांचा भाग दिवसभराच्या संचारबंदीने आवळला गेला होता, पण जेथे दंगे उद्‌भवत होते, जाळपोळ होत होती ते हिंदूंची तुरळक वसती असलेले मुसलमान मोहल्ले मोकळेच होते. त्यामुळे लुटालूट, जाळपोळ चालूच राहिली. फक्त कृती समितीला काम करणे अवघड होऊन बसले. आंदोलन अधिकच विस्कळित होण्याची शक्यता वाढली. कारण हिंदू वस्त्यातून रात्रीअपरात्री होणाऱ्या घरपकडीच्या वार्ता बाहेर पडेनाशा झाल्या, रुग्णालयात पडलेल्या हजारो जखमींची विचारपूस, औषधपाणी, जेवणखाण सगळे अनियमित झाले, कार्यकर्त्यांचा एकमेकांशी संपर्क तुटला. तरीही रोजच्या पाच जणांच्या तुकडीच्या सत्याग्रहाच्या कार्यक्रमात मात्र खंड पडत नव्हता, मंदिरा-मंदिरांतून हजारो स्त्रिया प्रार्थनेसाठी संध्याकाळी बसत असत—तोही कार्यक्रम व्यवस्थित चालू राहिला. पंडित समाजाचे नैतिक धैर्य खचणे लांबच राहिले—जो तो Now or Never, Thus far & no further, Our struggle for democratic existance या भावनेने पेटून कुठल्यातरी कामांत स्वतःला गुंतवून घेत होता. बरेचसे प्रमुख कार्यकर्ते तर भूमिगतच झाले होते, कृती समितीच्या अध्यक्षांचाच पत्ता पोलिसांना लागू शकत नव्हता.

धरपकड कशी चालू होती याचा हा एक नमुना. नॅशनल हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. जे. एन. मिस्त्री. तीस तारीख. नेहमीप्रमाणे रात्री दहाच्या सुमारास मिस्त्री झोपी गले. मध्यरात्री 'दीनानाथ', 'दीनानाथ' म्हणून हाका ऐकू आल्या. पाठोपाठ कुंपणाचे दार धक्के मारून उघडल्याचा आवाज आला. व्हरांड्यात बूट खाडखाडले. जिना वाजला. दारावर बुटांच्या लाथा ऐकू आल्या. साऱ्या घराला जाग आली, चोर-दरवडा असावा अशी प्रथम कल्पना झाली, पण लवकरच भ्रमनिरास झाला. मिस्त्री यांच्या खोलीत घुसलेल्यांपैकी एक सब इन्स्पेक्टर होता व बाकीचे सात कॉन्स्टेबल्स. मिस्त्री यांचा एम. एस. सी. ला असलेला मुलगा शामसुंदर वडिलांजवळ जाऊन उभा राहिला. त्याची गचांडी धरून पोलिसांनी त्याला बाजूला खेचला. मिस्त्री यांनी आपल्या मुलाला धरून ठेवण्याचा प्रयत्न केला. मिस्त्री यांना त्यांच्या पत्नीने आधार दिला, पण काही परिणाम झाला नाही. उलट सब इन्स्पेक्टरने त्या बाईंच्याच थोमुखात भडकावली व एका पोलिसाने मिस्त्री यांच्या दोन तोंडात ठेवून दिल्या. मागाहून दुसऱ्याने मिस्त्री यांच्या पाठीवर व मांड्यावर लाठ्या घातल्या. धक्के मारीत बापाला व मुलाला खाली आणण्यात आले. तरी मिस्त्री एकीकडे ओरडतच होते—' माझ्या मुलाचे नाव 'दीनानाथ' नाही, श्यामसुंदर आहे, तुम्हांला हवा असलेला मुलगा हा नाही. योला नेऊ नका.' कोणी

त्यांचेकडे लक्ष दिले नाही. शेवटी धीटपणा करून मिस्त्री यांनी विचारले–' वॉरंट आहे का ?' सब इन्स्पेक्टर जो खवळला आहे म्हणता ! मुलाबरोबर बापाचीही बकोटी धरून दोघांना ट्रकमध्ये कोंबण्यात आले. श्रीनगरातील राष्ट्रीय विचारसरणीविषयी प्रसिद्ध असणाऱ्या एका नामवंत शाळेच्या संस्थापक–मुख्याध्यापकांनी ही अवस्था ! या वेळी हे गृहस्थ रात्रीच्या अर्ध्या चड्डीतच होते, त्यांचा चष्मा त्यांना घेऊ दिला नाही, दाताच्या कवळीची तर आठवणच राहिली नाही. बायकोने आणि मुलाबाळांनी ओरडा केला, पण काय उपयोग ! संगिनींची टोके दाखवून आणि धक्काबुक्की करून त्यांची तोंडे बंद करण्यात आली. आणि पोलिस चौकीत पोचल्यावर पुढचे घिडवडे काय कमी होते ! बापाच्या देखत मुलाचे हाल करून मग दोघांचे जाबजबाव घेतले गेले. दोनच्या सुमारास दोघांना एका कोठडीत ढकलण्यात आले–जेथे असेच दहाबारा दुर्दैवी जीव पूर्वीच अडकवलेल होते. काश्मिरची कडक थंडी, गार फरशी, अंगावर अर्धी चड्डी, रात्रभर लघवीलाही पोलिसांनी बाहेर येऊ दिले नाही. तिथेच कोपऱ्यात घाण, बसल्याबसल्या झोप. आणि बहुतेकजण मिस्त्री यांच्यासारखेच प्रतिष्ठित, सुशिक्षित. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांना श्रीनगरच्या तुरुंगात हालवण्यात आले, तेव्हा हायसे वाटले कारण तेथे बरेच समदुःखी भेटले. कोणी फळे दिली, कोणी कपडे दिले. दुःख साऱ्यांनी वाटून घेतले की, हलके होते, निदान वाटते तरी, नाही का !

'**माणूस प्रतिनिधी**' श्रीनगरात दाखल झाला तेव्हा तेथील वातावरण हे असे जळके आणि जळजळीत होते. धरपकड आणि लपंडाव सुरू होता. चीड, संताप, अविश्वास, संशय, काळजी यांचे साम्राज्य सर्वत्र पसरले होते. साधा टांगेवालाही विचारल्या प्रश्नाच्या उत्तरापेक्षा अधिक बोलेना–कारण 'प्रतिनिधी' 'भारतीय' दिसत होता–म्हणजेच 'परका' वाटत होता. टांगेवाले बहुतेक सर्व मुसलमान पडले. टॅक्सीतही मोठ्याने बोलण्याची चोरी, कोण कुठे चहाडी करील आणि विनाकारण केव्हा कोठडीची हवा खावी लागेल याचा नेम नव्हता. मोगलाईच ती. काही पत्रकार भेटले, त्रयस्थांच्या भेटीगाठी झाल्या आणि ओळखीच्या एकदोघांना भेटावे म्हटले तर ते भूमिगत. बराच लपंडाव खेळून शेवटी भेट झाली ती एका अड्ड्यावर. इतरही बरेच कार्यकर्ते तिथे आसऱ्याला वा लपायला आलेले होते. श्रीनगरच्या आसपासच्या भागातूनही वातावरण तापलेले होते. तिथे राहणे असुरक्षित वाटल्याने, किंवा चळवळीत आपणहून भाग घ्यावा म्हणून आलेले, असेही काहीजण त्या घोळक्यात होतेच. कुणी प्राध्यापक, कुणी सरकारी नोकर, कुणी विद्यार्थी...

तहाब गावचा सरकारी डॉक्टर सांगत होता– गावात १८ हिंदू कुटुंबे. गावची बसती १८ हजार. सगळी मुसलमान. नुकतेच रात्री गुंड घराच्या आवारात शिरले.

त्यांनी बागेची उखडाउखडी केली. का तर म्हणे, डॉक्टरांनी शस्त्रास्त्राचा साठा जमवलेला आहे, तो हुडकून काढण्यासाठी. धमक्या ही तर रोजचीच बाब आहे.

डोक्याल' मार बसलेले हे संस्कृतचे प्राध्यापक: कॉलेजमध्ये हिंदू विद्यार्थ्यांवर कसा जाणूनबुजून पक्षपात केला जातो त्याची आकडेवारी सांगताहेत.

हा एक सरकारी नोकर: आपल्यापेक्षा कमी शिकलेला, कमी अक्कल असलेला, मागाहून नोकरीला लागलेला कुणी एक, केवळ तो मुसलमान आहे एवढ्याच गुणावर कसा वर चढवला गेला, असे सगळ्याच कचेऱ्यांत कसे चालू आहे, याचा तपशील देत आहे.

हा विद्यार्थी : ऑलिंपिक सामन्यात हॉकीच्या खेळात पाकिस्तानचा विजय झाला तर कॉलेजच्या मुसलमान विद्यार्थ्यांनी 'पाकिस्तान झिंदाबाद'च्या घोषणा देत कशा मिरवणुका काढल्या आणि भारताचा विजय झाल्यावर हिंदू विद्यार्थ्यांनी काढलेल्या मिरवणुकीवर कशी दगडफेक झाली, याच्या आठवणी सांगत आहे.

परमेश्वरी कशी आहे? वागायला, चालचलणुकीला?" –माणूस प्रतिनिधी.

"चांगली. चांगल्या घरातली मुलगी आहे ती."

"मी तर ऐकले तुमच्या समाजात मुलींच्या लग्नाला फार त्रास पडतो! वीस वीस हजार रुपये हुंडा द्यावा लागतो! त्यामुळे अशा पळवापळवीला अधिक वाव मिळतो, नाही का?" माणूस प्रतिनिधी.

"खरं आहे. आम्ही हाही प्रश्न चळवळ संपल्याबरोबर लगेच हाती घेणार आहोतच. आहेराची प्रथा बंद केली पाहिजे, महागड्या निमंत्रणपत्रिका काढून उगाच खर्च वाढवू नका हा प्रचार तर आम्ही आतापासूनच सुरू केला आहे"– सर्वांचे एकमत.

टॅक्सी आली. पहिली आली ती वाटेत सोडावी लागली, कारण ड्रायव्हरचा अंदाज लागेना. दुसरी खात्रीची मिळवायला बऱ्याच खाणाखुणा, इशारे करावे लागले. कर्फ्यूची वेळ होण्यापूर्वी जेवढे पाहणे शक्य होते तेवढे पाहून झाले– जळकी दुकाने, पडकी मंदिरे, दगडफेकीच्या खुणा असलेली घरे; त्या स्त्रियांच्या रोज होणाऱ्या प्रार्थनासभा, ती दैनंदिन सत्याग्रहाची पूर्वतयारी, ते रुग्ण, तो दिवसाही कर्फ्यू असलेल्या भागातील शुकशुकाट, कोपऱ्याकोपऱ्यावर कुजबुजत असलेली तीं टोळकी, पोलिसी वाहनांच्या सततच्या घिरट्या, शिरस्त्राणधारी सैन्यदलाचे पहारे– श्रीनगरात गुंड आणि पोलिस यांचेच राज्य असावे असे वाटत होते.

अशीच बाहेरून खूप मोडतोड दिसत असलेली,
एक तिमजली उंच हवेली.
सर्व भाग मुसलमान वस्तीचा.
टॅक्सी थांबली.
बाजूचा दरवाजा खूप वाजवला. हालचाल नाही.
हाका मारल्या.
वरची एक खिडकी उघडली गेली.
बरोबरचा सोबती आणि खिडकीत उभी असलेली व्यक्ती—काही
खाणाखुणा झाल्या, बोलणे झाले.
बाजूचे लहानसे फाटक जरा वेळाने उघडले गेले.
आवारात सामसूम होती.
आतून पाहिले तरी सगळी दारे, खिडक्या बंद होती.
हवेलीचे मागील दार उघडल्याचा आवाज आला.
कुणाची हवेली ही ! हिंदूची की मुसलमानाची !
आपण कोणाला भेटायला चाललो आहोत ?
दरवाजा उघडला. ही उभी असलेली पुरंध्री कोण ?
काश्मिरचा सुकीर्त गौरवर्ण तो हाच कां ?
तो सुविख्यात काश्मिरी लाल गुलाब हाच कां ?
झुळझुळीत निळ्या वस्त्रातील कोण ही ' सुकांत चंद्रानना !'
कुणा ' कुलवंताची कामिनी ?'
बघू नकोस चंद्रा वळुनी...
तिचा नमस्कार घे पुढे हो.
डावीकडे, हा लाकडी जिना आहे.
चल वर......

[ पुढील दिवाळी अंकी अखेर ]

# मु क्ता फ ळे

## □ नवा भिंताडचा

ज्ञानेश्वरांनी भिंत चालवली असे म्हणतात. कुणाचे गर्वहरण करायचे की भिंत चालवावी लागते. ते पाहणे आपल्या नशिबी नव्हते. परंतु अमेरिकेत जॉन्सन भिंताडचाने जी नवी भिंत चालू केली आहे, त्याची बातमी वाचून मात्र आम्हांला हसावे की रडावे हे कळेना! माओच्या चीनकडून होणाऱ्या संभाव्य अण्वस्त्र हल्ल्याविरुद्ध उपाययोजना म्हणून, अमेरिकेतील ४० महत्त्वाच्या शहरांना संरक्षण देण्यासाठी एक ' अँन्टी बॅलॅस्टिक मिसाईल सिस्टिम " अमेरिका उभी करणार आहे. म्हणजे काय बुवा ? जाऊ द्या, असेल काही तरी भक्कम चुन्याचे ! चिनी सैन्य तूर्त अमेरिकन भूमी कुरतडत नसताना, या आततायीपणाला काय म्हणावे ? आग इंद्रप्रस्थी आणि बंब लिंडनवस्ती असा हा प्रकार झाला. माओच्या लाथा आम्ही धीराने व खेळकरपणाने सहन करीत असताना, अमेरिकेत मॅक्नामाराने का कुंथावे कळत नाही ! ३०,००० कोटी रुपये खर्चून ही अण्वस्त्रविरोधी भिंत अमेरिका उभारीत आहे. सर्व अमेरिकन शहरे या संरक्षण व्यवस्थेखाली आणायची तर अमेरिका पुढे मागे १,००,००० कोटी रुपये खर्च करणार आहे. असे उधळायला पैसे आहेत आणि आम्हांला गहू पाठवायला मात्र सारखा हात आखडता घेता काय चोरांनो ?

भारतावर चीनने का हल्ला केला ते मात्र जॉन्सनसाहेब विचारात घेत नाहीत. " पाकिस्तान निर्मितीमुळे आशियात कटकटी निर्माण झाल्या, " हे तर इंदिरादेवी बोलून चुकल्या आहेत. परंतु पाकिस्तान निर्माण केल्यावर, त्याला सेटोनाटोत गुंडाळून रावळपिंडीला अमेरिकेने आपली मिसाईल आणायची काही गरज होती का ? रावळपिंडीहून गॅरी पॉवर्स उडाला आणि ' यू–टू ' रशियाने पाडले तेव्हा माओला हे कळलेच. पेकिंगच्या इतक्या जवळ अमेरिकेने आपले तळ आणल्यावर, हिमालय ओलांडून लडाखमध्ये घुसून हिमालयाच्या आमच्या अंगालाच जरूर भासली तर लढाई पेटवणे माओला आवश्यक झाले असा आमचा तर्क आहे. म्हणून तर नेफातून चिनी परत गेले. परंतु लडाख, अक्साई चीन त्यांनी सोडला नाही. तिबेटचाही चीनने कबजा केला आणि सिक्कीममध्ये आमचे जवान आज माओ मारीत आहे. ही सर्व पाकिस्तान निर्मात्यांची व अमेरिकेची भारतावरील कृपा होय !

माओने यासाठी पाकिस्तानशी युद्ध करणे हे सरळ झाले असते. परंतु तो पडला सेटो–नाटोचा समासद. त्याला आज हात लावणे कठीण आहे. हिटलरचे बेल्जम-

हॉलंडशी वाकड नव्हते, परंतु इंग्लंड–फ्रान्सला घूळ चारायची तर या देशांतूनच त्यास जावे लागले. आणि जर्मनीचा मुकाबला करायला रशियाने फिन्लंड–पोलंडची राखरांगोळी घडवून आणली ! अजापुत्राचे बळी बलिष्ठ राजे लोकांच्या यज्ञातून दिले जातात आणि मांडलिक टाळ्या पिटीत आनंदाने तो प्रसाद भक्षण करतात. यामुळे अण्वस्त्र करायचे नाही, असा हट्ट ठेवायचा तर किमानपक्षी पाकिस्तानचा बंदोबस्त तरी आपण केला पाहिजे. हे भयंकर वाटत असेल, तर पाकिस्तानला आहे तसेच ठेवून चीनचा, अण्वस्त्र निर्मिती करून कायमचा मुकाबला केला पाहिजे. यावाचून आता भारताला गत्यंतर नाही !

जरा कडकच झाले ! सरदारजी–जॉन्सनजी रागावू नका बरं. सुवर्णसिंग कोसिजीन सासूबाईंना विचारायला रशियात गेले आहेत, की " वन्स पुन्हा त्रास देऊ लागल्या आहेत. त्यांना सांगता का जरा ! " आणि यजमान गावभर ' पाणी ' भरत आहेत ! अर्थात तशी वेळ आलीच तर लिंडन भिताडच्याच्या पाठीवर बसून ' पानिपतवरून ' पळ काढणे आपल्याला जमेल अशी आपण आशा करू या !

## ☐ रांचीची ' चीं चीं !'

२२ ऑगस्ट १९६७ या दिवशी बिहारची उन्हाळी राजधानी रांची या शहरी दोन मानवसमूहांत भीषण दंगल सुरू झाली. बिहारची दुसरी राज्यकारभाराची भाषा म्हणून उर्दूला मान्यता द्यावी, असा ठराव एका उर्दूप्रेमी आमदार मानवाने, बिहारच्या विधानसभेत मांडला. असे म्हणतात की उर्दू नको असणाऱ्या मानव समूहाच्या ५०–६० मुलांनी एक मिरवणूक रांची येथे काढली. या मिरवणुकीवर एका प्रार्थनामंदिरातून उर्दूप्रेमी मानवांनी विटा व सोडावॉटरच्या बाटल्या फेकल्या. प्रार्थनामंदिरात विटा असणे साहजिक आहे. कारण देव प्रत्यक्ष भक्ताच्या भेटीस तिथे आला तर त्याला उभे राहण्यासाठी वीट फेकता यावी म्हणून या पुंडलिकांनी खूप विटा आत साठवलेल्या होत्या. दूर अंतराळातून आल्यानंतर देवाला धाप लागली तर ? सोडा वॉटरच्या बाटल्याही म्हणूनच तेथे मुबलक साठवण्यात आल्या होत्या हे सहज समजण्यासारखे आहे. पण देवाऐवजी पोरे आलेली पाहताच या उर्दूप्रेमी मानवसमूहाने त्यांच्यावर विटा व सोडावॉटरच्या बाटल्या फेकून मारल्या यातही तसे आक्षेपार्ह काही नाही !

या प्रकारानंतर प्रार्थनेत व्यत्यय आल्याने, आता प्रार्थनेने काही देव येत नाही –तेव्हा त्याला प्रत्यक्ष बोलावून आणण्याकरता, उर्दूविरोधी मानव समूहाची ३८ माणसे भोकसून ताबडतोब देवाघरी धाडली गेली, यातही फारसे चुकले असे कुणी म्हणणार नाही. परंतु उर्दूप्रेमी मानवसमूहावर, केवळ या क्षुल्लक कारणासाठी नंतर जो सूड घेण्यात आला, तो अत्यंत निषेधार्ह आहे ! रांचीची ही ' चीं चीं ' ऐकून इंदिराजी, यशवंतरावजी यांना अनावर संताप आला, यात आश्चर्य ते काय ?

बिहारचा दुष्काळ परवा परवापर्यंत इतका भीषण म्हणून सांगितला जात होता. चांगला पाऊस पडून पिकाचे चार दाणे अजून शेतातच आहेत, तोच रांचीत हे भयभीषण नाटच कसे घडले ? सैन्येदेखील पोटावर चालतात; परंतु उपाशीपोटी-देखील सुरामारी बिहारात का चालावी ? फाळणी केल्यानंतर सर्व उर्दूप्रेमी मानव-समूहाचे समाधान होऊन इथे आनंदी आनंद होणार होता ना ?

## □ फ्राईडचे नवे गाईड !

फ्राईड माहीत असेल ना मंडळी ! फ्राईड–फ्राईड ! मानवाच्या सगळ्या कृती आणि विकृतीच्या बुडाशी लैंगिकतेचा संबंध दाखवणारा थोर शास्त्रज्ञ म्हणजे सिगमंड फ्राईड. पाश्चात्त्य वैद्यकशास्त्र रोगचिकित्सेत या माणसाला मानतात परंतु इंग्लंड–अमेरिकेत जे जे करतात तो सर्व मूर्खपणा रशियात करीत नाहीत

क्रांतिनंतर रशियात फ्राईड हा मूर्ख ठरला. इव्हॉन पाव्हलॉव्ह या रशियन शास्त्रज्ञाने असा शोध लावला, की मानसिक रोगांची उत्पत्ती शरीरांतर्गत निर्माण झालेल्या व्याधींनी होते किंवा परिस्थितीने होते. आजपर्यंत फ्राईडपेक्षा पाव्हलॉव्ह श्रेष्ठ ठरून लालमाईचे चांगले चालले होते.

माणूस चोरी का करतो – दारिद्र्यामुळे, माणूस द्वेष का करतो – आर्थिक विष-मतेमुळे, असे मार्क्सवादी ठोक सिद्धांत स्टॅलिन काळात चांगले रुजवण्यात आले येन केन प्रकारेण मानवनिर्मित दुःखाचा उगम परिस्थितीशी जोडण्यात येऊन क्रांतीला भूमी तयार होईल अशी ठोक कल्पना ! परंतु स्टॅलिन–कन्या स्वेटलाना नुकतीच रशियातून पळाली. प्रकृतीने चांगली ठणठणीत असल्यामुळे तिच्यात शरीरांतर्गत काही दोष नाहीत हे स्पष्ट आहे. ज्या अर्थी स्टॅलिनराजवटीविरुद्ध ती तूर्त बोलत आहे, त्या अर्थी तिच्यात मानसिक विकृती निर्माण झाली आहे या विषयी क्रेमिलिनमध्ये आता कुणाला शंका नाही, हेही स्पष्ट आहे. पण मानसिक विकृती निर्माण झाली म्हणावे तर रशियातील समाजवादी-वर्गविरहित समाज-रचनेच्या तुळशीबागेत ही भांग कशी उगवली, असे लोक विचारणार ! पाव्ह-लॉव्ह हा थोर पुरुष समजावा तरी पंचाईत अशी परिस्थिती निर्माण झाली.

परंतु कसल्याही परिस्थितीतून क्रेमलिन नेहमी मार्ग काढतेच. डॉ. क्रेलिन या रशियन डॉक्टराने क्रेमलिनच्या संमतीने नुकतेच (सप्टेंबरमध्ये) असे जाहीर पत्रक काढले आहे की, आतापर्यंत प्रतिगामी व अशास्त्रीय ठरवलेला फ्राईड हा काही एकंदरीत आपण समजत होतो तितका मूर्ख नाही. पाव्हलॉव्हची मते बाजूस ठेवून रशियन डॉक्टरांनी फ्राईडचा वैद्यक शास्त्रात अभ्यास करणे आवश्यक आहे.

डॉक्टर क्रेलिन यांनी आता फ्राईडच्याही पुढे उडी मारली आहे. ते म्हणतात,

" आपले रोगी लिहिताना वा बोलताना काय चुका करतात, त्यांना स्वप्ने काय पडतात, त्यांना कोणते विनोद हसवतात या सगळ्यांचा डॉक्टरांनी अभ्यास करून त्यांचे सुप्तावस्थेतील मन समजून घेतले पाहिजे. "

तात्पर्य, पाव्हलॉव्ह हा आता मूर्ख आहे. स्वेटलानाला मानसिक विकृती झालेली आहे, कारण फ्राईड हा तूर्त थोर आहे !

## □ फक्त एक टक्का

समस्त नापाक जन हो, पाक रेडिओ ऐकत चला ! म्हणज उर्दूविषयी तुमच्या मनात जी अढी आहे ती नाहीशी होईल !

" परतबे खुरसे हैं शबनम्को फनाकि तालिम ।
हममी है एक इनायत के नजर होने तक ॥
फिर दिल तवाफ कूये मलामतको जाय है ।
पिंदारका सनम्कदा हीरां किये हुये है ॥ "

नाही ना काही समजले ? पण ऐकायला छान लागते की नाही ? अशा सुंदर उर्दू कविता पाक जनतेला सतत पेश होतात. आणि तो घोगऱ्या आवाजाचा माणूस बोलतो काय सुरेख !

अगर वर तकदीर कोई सही मोशरिक मेरा पैदा होकर इस्तेहकाक जाहीर करें, या मुनमिकर कल्वा बाकइ न दे या किसी किफालत मवाखजा की वजहसे कत्ले मुर्तेहनात मोसूफमे वे खलल बाके हो मूर्तेहिनको यखतियार होगा कि जुज या बुल जरे रहन मयसूद तारीखे तहवीर वासीका हजासे जायनादे मजकुरावाला व दीगर जायजाद व जात मुनफिकरसे वसूल करले और राजें इनफिकाक यह है के जव जरे रहना आदा कर दूंगा तो मैं मरतूब इनफिकाक करा लूंगा.

विहारात शेकडा ८० टक्के नापाक लोकांना ही भाषा समजत नाही. परंतु जे मुसलमानबंधू पाकवासी झाले नाहीत त्यांना सरकारी कामकाजासाठी उर्दू भाषा आणि लिपी हवी आहे. ३० वर्षांपूर्वी सीमाप्रांतात उर्दू ही बहुसंख्याकांची भाषा असल्याने इतर कुठल्याही भाषेत सरकारी कामकाज होणार नाही, असा आग्रह धरणाऱ्या मुसलमान पुढाऱ्याने हिंदूंनी याबाबत धमकावताच जाहीर उत्तर दिले होते,

" ज्या प्रांतांत हिंदू बहुसंख्य, त्या प्रांतांतसुद्धा शाळांतून वा सरकारी कामकाजातून उर्दूला निषिद्ध करण्याची हिंदूंची छातीच होणार नाही ! "

जोपर्यंत काँग्रेसी मंत्रिमंडळे अस्तित्वात होती तोपर्यंत हिंदूबहुसंख्य प्रांतांत उर्दूचे लाड नाही का झाले ? परंतु भारतीय मुसलमानांच्या दुर्दैवाने बहुतेक मोठ्या प्रांतांतून तूर्त काँग्रेस स्वर्गवासी झाली असल्याने आता त्या प्रांतांत " उर्दू या प्रांतांत कधीही सरकारी कामकाजाची दुसरी भाषा म्हणून आम्ही वापरणार नाही, " असे उद्दाम उद्गार काढण्याची काही जणांची छाती होत आहे. कमनशिबी कुठले ! हे लोक इतिहास या शब्दाऐवजी तवारिक, विकासासाठी तरक्की, मुलक, कोम हे शब्द वापरणार नाहीत ! उर्दूसाठी दंगेधोपे करावे तर आता राज्ययंत्रही काँग्रेसवाल्यांचे नसल्याने या प्रयत्नांतही म्हणण्यासारखे यश लाभत नाही.

इथल्या मुसलमानांचे दु:ख हलके करण्याकरता पाकवासी मुसलमान काही शहाण-

पणाने वागतील म्हणावे तर तसाही रंग दिसत नाही. पूर्व पाकिस्तानात रवींद्रनाथ टागोरांच्या वाङ्मयावर मुसलमानांनी संक्रांत आणली आहे. टागोरांचा गुन्हाच भयंकर, त्याला लोक बाकी काय करणार ! छत्रपत्री शिवाजीराजांवर जे काव्य त्यांनी लिहिले त्यात छत्रपतींचा गौरव केलेला आहे ! काय हे ?

छागला यांनी दिलेला राजीनामा हा इंग्रजी वियोगाच्या दु:खाने दिलेला नसून, पश्चिम आशियात त्यांच्या परराष्ट्र धोरणाचे जे तीन तेरा झाले ते त्यांच्या राजीनाम्याचे खरे कारण आहे, असे विरोधी पक्षनेते म्हणतात. आम्हांला मात्र छागला यांच्या राजीनाम्याचे तिसरेच कारण आता लक्षात येत आहे.

राजीनामा दिल्यानंतर छागलांनी सर्वांत महत्त्वाची मुलाखत दिली ती 'लंडन टाईम्स'च्या वार्ताहराला. मनातले गुह्य गोऱ्या मंडळींना आधी सांगायचे हा नेहरूनीतीतला निगम छागलांनी पाळला हे रीतीला धरूनच झाले. या मुलाखतीत छागला म्हणतात–

"राज्यसभेतील जागेचाही राजीनामा द्यावा की काय याचा मी विचार करीत आहे. राजीनामा देण्यातील माझा मुख्य उद्देश भाषेच्या प्रश्नावर जनमत जागृत करण्याचा आहे. शेकडा नव्याण्णव टक्के लोकांना इंग्रजी कळत नसले तरी हे लोक आपला प्रांत सोडून बाहेर जात नाहीत. ज्या एक टक्का लोकांना इंग्रजी येते त्यांतच, देशाचे राजकारणी, बुद्धिवादी, न्यायाधीश व शास्त्रज्ञ ही मंडळी येतात. हेच लोक देशाची एकता टिकवून आहेत. मला हा इंग्लिशवरील रोष समजू शकत नाही. इंग्लिश लोकांकडून स्वातंत्र्य मिळवायला आम्ही त्यांच्याशी इंग्लिशमधूनच भांडलो ना ?"

देशाच्या स्वातंत्र्याकरता जे फासाची फळी चढले, तुरुंगात गेले, अंदमानात गेले किंवा पोलिसांच्या लाठ्या-गोळ्यांचे धनी झाले, त्यांत खरोखरच नव्याण्णव टक्के लोक हे इंग्रजीचा गंध नसलेलेच होते. आणि इंग्रजांशी कोण भांडले ? छागला तुम्ही ? तुम्ही इंग्रजांशी इंग्रजी भाषेतून किती साली भांडलात ?

इंग्रजी भाषा येणारी एक टक्का माणसे जर या देशाची एकता टिकवून धरू शकतात, तर पाच टक्के हिंदी येणारी माणसे या देशाची एकता पाचदा टिकवणार नाहीत काय ? त्यासाठी इंग्रजीचाच आग्रह का ? मद्रास, केरळ, आंध्र या राज्यांना इंग्रजी शिकायचे असेल तर त्याला आडकाठी नाही. तिथली नव्याण्णव टक्के जनता हिंदी शिकली नाही तरी पर्वा नाही. या राज्यातली एक टक्का जनता जरी हिंदी शिकली तरी देशाची एकता टिकवता येईल, असे छागला सांगत आहेत. दक्षिणेकडचे समस्त हिंदू इतके का नादान आहेत, की त्यातले एक टक्कादेखील देशाच्या एकतेकरता हिंदी शिकणार नाहीत ?

–ग्यानबा

O

समीर

# विचार वारे

## ☐ सहिष्णुतेचे जागतिक महत्त्व

तत्त्वज्ञान्यांचा देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतात वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीतील तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक डॉ. जेनाल्ड बिशप आले होते. ते म्हणाले, राष्ट्रेच काय, पण माणसेही एकमेकांशी अधिक सहिष्णुतेने वागायला शिकली तर जग खूपच अधिक सुखी होईल. सहिष्णुतेची अशी जागतिक चळवळ आरंभली तर भारताला तिचे नेतृत्व करण्याइतका अधिकार आहे. भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान आणि धर्म यांच्यांत अमेरिकन विद्यार्थ्यांना खूपच स्वारस्य वाटू लागले आहे; याचे कारण बहुधा असे असावे की ज्या धर्मात त्यांचा जन्म झाला आहे त्या धर्मापासून त्यांना हवे ते मिळत नाही. वास्तविक, निरनिराळ्या धर्मांचा एकमेकांशी कधीही विरोध नसतो. "प्रत्येक धर्मात असे काही तरी असते, की त्यामुळे दुसऱ्या धर्मातली उणीव भरून निघते. सर्व धर्मांत समान तत्त्वे पुष्कळ आहेत, पण दुर्दैवाने शिक्षक कधीच या समानत्वावर भर देत नाहीत.

## ☐ योजनेवर राजकारणाचा प्रभाव

"भारताला एकदाही भेट न देता भारतावर पुस्तक लिहिण्याची पुष्कळ लोकांना–विशेषत: पाश्चिमात्त्यांना–खोड असते." इति श्री. अँगस होन. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या या शिक्षकानेही भारतावर अनेक लेख लिहिण्याची 'चूक' केली आहे, असे ते म्हणतात व ती चूक सुधारण्यासाठी आणि चक्षुर्वै सत्यम् माहिती मिळविण्यासाठी ते भारतात आले आहेत. भारतातील योजनेच्या प्रतिक्रियेबद्दल ते म्हणतात, योजनेवर राजकारणाचा प्रभाव आणि योजनाकार व सरकार यांच्यांतला संघर्ष या दोन गोष्टी विशेष अभ्यास करण्यासारख्या आहेत. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात दर वर्षी ५ ते ६ टक्के या दराने नक्की प्रगती होईल; परंतु परकीय मदत अधिक मिळाल्याशिवाय किंवा 'डेफिसिट फिनॅन्सिग'चा मार्ग अवलंबिल्याशिवाय औद्योगिक उत्पादन-क्षमता वाढवायाला बराच काळ लागेल.

## ☐ भारत आणि आयर्लंड

सुप्रसिद्ध आयरिश देशभक्त डानियल ब्रीन यांची कन्या कु. ग्रेन ब्रीन या नुकत्याच भारतमार्गे ऑस्ट्रेलियाला गेल्या. तेव्हा नव्या दिल्लीच्या मुक्कामात त्यांनी

पूर्वीच्या काही आठवणी सांगितल्या. भारताबद्दल खूपच आयरिश लोकांना आकर्षण वाटते, आणि दोन्ही देश ब्रिटिश सत्तेखाली असताना भारताने चालविलेल्या स्वातंत्र्य-लढ्याचे खूप आयरिश तरुणांना कौतुक वाटत होते. भारतीय नेते देशाच्या स्वातंत्र्यासाठी काय करीत आहेत हे स्वत: डानियल ब्रीन आपल्या अनुयायांना समजावून सांगत. " ते स्वत: त्या काळी आपल्या देशासाठी असेच कार्य करण्यात गुंतले होते. " ब्रीन व त्यांच्या अनुयायांना देशाचे स्वातंत्र्य अत्यंत प्रिय होते, व त्यासाठी ते रात्रंदिवस अत्यंत कठीण परिस्थितीत कार्य करीत होते. कधी कधी तर त्यांना स्वत:चा जीव धोक्यात घालावा लागे. ब्रीनना पकडण्यासाठी ब्रिटिशांनी बक्षीसही लावले होते. सत्तरीला आलेले ब्रीन आता शांत जीवन जगत आहेत. मात्र " त्यांना, त्यांच्या अनुयायांना व हजारो आयरिश नागरिकांना असा विश्वास वाटतो की एक दिवस त्यांचा देश अखंड होईल; अर्थात् त्याला वेळ लागेल– दहा वर्षे, वीस, कदाचित् तीस वर्षेही लागतील. " भारताचे विभाजन आता दगडावरची रेघ आहे असे समजणाऱ्या भारतीयांना ही भावना वेडेपणाचीच वाटेल.

## ☐ भारत आणि इराण

आंतरराष्ट्रीय कायदा आणि ललित-लेखन या दोन्ही क्षेत्रांत आघाडीवर असलेले इराणी पंडित डॉ. महंमद अली इस्लामी यांच्या मते आंतरराष्ट्रीय कायदा हा बहुतेकांना वाटतो तसा रूक्ष विषय नाही. उलट या विषयाच्या अध्ययनामुळेच त्यांना भारताचा परिचय झाला. इराण व भारत यांच्यांत इतके साम्य आहे की थोड्या दिवसांच्या वास्तव्यातही आपण स्वदेशातच आहोत असे वाटते. तरीदेखील सांस्कृतिक, शैक्षणिक आणि औद्योगिक या सर्व क्षेत्रांत भारत व इराणचे संबंध अधिक दृढ होण्याची आवश्यकता आहे व तसे व्हायला वावही आहे. उलट इराणने दक्षिण आशियाकडे–विशेषत: भारताकडे–अधिक लक्ष द्यायला पाहिजे. " जर आपण अधिक जवळ जवळ आलो तर आपण शांतता राखायला मदत करू शकू आणि आपल्या देशातील जनतेचे जीवन सुधारू शकू. "

## ☐ समाजसेवेचा आनंद

इंटर्नॅशनल सेक्रेटरिएट फॉर व्हॉलंटियर सर्व्हिस या आंतर्राष्ट्रीय स्वयंसेवक-संस्थेचे सरचिटणीस विल्यम डिलॅनो यांनी काही दिवसांपूर्वी भारत-भेटीत मांडलेले मत :

भारतात अधिक समाजकार्यासाठी स्वयंसेवक मिळू शकतील व ते वाढविण्यास वावही आहे. परंतु स्वयंसेवकांना संघटित करून त्यांना कार्याभिमुख केले पाहिजे. स्वयंसेवक होण्यात गंमत असते व चांगले कार्य केल्याचे समाधानही असते, म्हणून अधिकाधिक तरुण मंडळींनी यासाठी पुढे यायला पाहिजे. ●

पडदा दुभंगतो तेव्हा रंगभूमीवर प्रकाशाचा एक भला थोरला उभा भगभगीत पेटलेला लाल स्तंभ. बाकी नेपथ्य दिसते न दिसते असे. एक विलक्षण गूढ, भयावह वातावरणात त्या लाल पेटल्या स्तंभापुढे केवळ बाह्याकृती दिसणारे कोणी-तरी बोलू लागते. तो लालभडक, पेटता, आभाळाला भिडल्यासारखा वाटणारा प्रकाशाचा स्तंभच जणू आपल्याशी थेट बोलतो आहे असे किंचितकाल वाटते. आजच्या नाटकाची प्रस्तावना आपण ऐकू लागतो. मग प्रकाश उजळतो–बाह्या-कृतीच्या, चेहरा सोडून बाकी भागावर. मग चेहरा गूढ वाटावा अशा पद्धतीने चेहऱ्यावरदेखील तो पडतो. हा सूत्रधार. आजच्या नाटकात मांडलेल्या ययातीच्या कथानकाचा परिचय तो आपल्याला करून देतो. आजचे कथानक ययातीचे असले तरी ती केवळ एक पुराण कथा म्हणून सांगितलेली नाही. तिच्यात जे सिद्ध झाले ते कालातीत सत्य आहे. हे कालातीत सत्य नाटकरूपाने दाखवण्याचा हा प्रयत्न आहे.

# रातराणी

हे ययातीच्या अंतःपुरातील एक दालन. दालन म्हणून याला केवळ आकार (Forms) आहेत, त्या आकारांना कसलीही शैली नाही. शैली–कोणतीही–काल-सापेक्ष असते. इथे खिडकी म्हणजे कोन मोडलेल्या चौकोनाची एक चौकट आहे. द्वारे उभी त्रिकोणी आहेत. आसन म्हणजे एक लाकडी ठोकळा आहे आणि पलंग म्हणजे एक लंब, चौकोनी ठोकळा आहे. समया उंची चित्रपटगृहातील अगदी आधुनिक उंच दांडीच्या अॅशपॉटची आठवण करून देतात. आणि अर्थात तो पेटलेल्या लाल प्रकाशाचा दिगंतात घुसल्यासारखा ढळढळीत स्तंभ.

प्रथम हे सारे खटकतेच. हे काय ययातीचे अंतःपुर ? त्याचे इंटीरिअर डेकोरेशन काय अद्ययावत फॅशनची उपाहारगृहे शृंगारणाऱ्या एखाद्या उलटचा खोपडीच्या उमेदवाराने सवलतीच्या दरात करून दिले ?

सूत्रधार कथेची पार्श्वभूमी सांगतो तेव्हा बदलत्या प्रकाशझोतांनी नेपथ्याला भय-पटातल्या खलपुरुषाच्या गुहेचे रूप येते. किंवा हवे तर एखाद्या मंत्रविद्येच्या प्रयोगा-

विजय तेंडुलकर

साठी सजवलेला रंगमंचच म्हणाना. नाहीतरी नाटकही आणखी एक प्रकारची मंत्रविद्याच.

सूत्रधार मावळत्या प्रकाशात प्रेक्षकांचा निरोप घेऊन ययातीच्या अंत:पुरात शिरलेल्या चोरासारखा सावध, घाईने बहिर्गमन करतो आणि पुन्हा प्रकाश उजळतो. तेव्हा शय्येशी एक दासीवजा स्त्री विकल होऊन रडताना दिसते. एक राणीवजा स्त्री तिला बेचैनपणे पण एका अधिकाराने म्हणते आहे, 'क्यों व्यर्थ रोती है स्वर्णा ? तुझसे एक नहीं, हजार बार कहा, उसकी बातोंपर ध्यान मत दे–'

ही राणीवजा स्त्री देवयानी–राक्षसांचे कैवारी शुक्राचार्य यांची एकुलती एक कन्या आणि महाप्रतापी राजा ययाती याची राणी. स्वर्णा तिची एक दासी. 'उसकी बातोंपर ध्यान मत दे' हा संदर्भ शर्मिष्ठेला उद्देशून आहे. राक्षस कुलातली जन्मजात राजकन्या शर्मिष्ठा देवयानीची एकेकाळची सखी आणि आताची दासी.

# गिरीश कर्नाड यांचा वेगळा 'ययाति'



अमरीश पुरींच्या (ययाति) अभिनयातील आत्मविश्वास व जिद्द

देवयानीला विहिरीत ढकलून मारण्याचा प्रयत्न तिने केला या गुन्ह्याबद्दल देवयानीची दासी म्हणून तिला राहावे लागले आहे. कारण देवयानीचे पिताजी शुक्राचार्य यांच्या ऋणात सारे राक्षसकुल आहे. आचार्यांच्या अद्‌भुत संजीवनी विद्येमुळेच युद्धात देवांविरुद्ध राक्षसांना टिकाव धरता आला. ही संजीवनीविद्या वृद्धाला तरुण करते. मरणोन्मुखाला संजीवन देते. ही विद्या अमरत्वाची विद्या आहे. देवयानी-बरोबर या विद्येचाही लाभ घेऊन राजा ययाती चिरतरुण झाला आहे.

' ययाति–देवयानी ' चे कथानक नव्या अर्थासहित पुन्हा सांगणारे हे ' ययाति ' नाटक होते. इंडियन नॅशनल थिएटरने नुकतेच सादर केलेले. मूळचे कानडी. त्याचे हे हिंदी भाषांतर होते. मूळ लेखक होते गिरीश कर्नाड. दिग्दर्शक सत्यदेव दुबे होते. हे पाहण्याला जयहिंद कॉलेजच्या नाटयगृहात शिरताना कथानकाविषयी एरवी असते ती उत्सुकता तर मनात नव्हती. कथा पूर्वपरिचितच होती. खांडे-करांची गाजलेली भली मोठी कादंबरी, शिरवाडकरांचे ' कला मंदिर ' ने सादर केलेले संगीत नाटक स्मरणात अद्याप होते, उत्सुकता होती ती एक तर, या कथेला कोणता वेगळा घाट, या दिल्लीत आधीच गाजलेल्या नव्या नाटकाला देण्यात आला असेल याविषयीची; आणि हे नाटक हिंदी नाटचक्षेत्रातली ही मुंबईकर तरुण प्रयोगशील मंडळी कसे सादर करतात या विषयीचीही.

## कथानक

नेपथ्याविषयी आरंभी वर्णन केलेच. ते प्रथम प्रथम फार खटकले. 'कलामंदिर'चा ययातीच्या महालाचा नक्षीदार सेटच त्यावरच्या चित्रकाराच्या मोठाल्या सहीसहित-देखील बरा होता असे वाटू लागले. महाल म्हणजे सर्व बारकाव्यांनिशी महालच समोर उभा केला पाहिजे असा हट्ट मी प्रेक्षक म्हणून केव्हाही धरणार नाही; पण महापराक्रमी ययातीच्या महालाची काही ना काही शान या महालाला हवी की नाही ? आणि महाल हा महाल नको तर, राजा ययातीचा पौराणिक वेष तरी एवढा रंगीबेरंगी आणि अव्वल पौराणिक का ? तोही एक साधे उपवस्त्र पांघरून रगमंचावर का नाही आला ? अर्थात त्याही रंगहीन जुजबी नेपथ्याचा सराव पाहता पाहता माझ्या नजरेला आला. कारण नाटकाची आणि नाटचप्रयोगाचीही बाकी अंगे तितकी मातबर होती.

चिरतारुण्याच्या बळावर ययातीला प्राप्त झालेला कर्तुमकर्तुम आत्मविश्वास आणि त्याच्या अंतरंगात पेटलेली धगधगती, अमर्याद, अतिमानुष महत्त्वाकांक्षा हा या नाटकाचा कणा होता. नेपथ्यातला तो लाल भगभगता प्रकाशाचा वर दिगं-तात गेल्यासारखा ढळढळीत स्तंभ या महत्त्वाकांक्षेचे, जिद्दीचे प्रतीक होता – निदान मला तरी तो तसा वाटला. नाटकाच्या आरंभापासून अखेरपर्यंत हा स्तंभ, मध्यं-तर सोडल्यास, सतत नजर वेधून घेत होता. ययातीनंतर महत्त्व होते त्याच्या तरुण मुलाला, पुरुला. चिर पौरुषाने मुसमुसलेल्या विकारी पित्याचा हा एकुलता

एक पुत्र तरुण वयातच मनाने वृद्धावस्थेकडे चाललेला, अंतर्मुख, अशान्त आणि पित्याचे शौर्यधैर्यादी गुण अंगी नसल्याने केवळ विचार करणारा. विचारांनी गुदमरलेला, विवाह करून आपली नवपरिणित वधू चित्रलेखा हिच्यासहित तो राज्यात येत आहे येथूनच नाटकाला सुरुवात झाली. प्रेक्षकांना रंगमंचावर समोर दिसणाऱ्या महालातच आपली शैय्या सजवावी – कारण त्या महालाशी त्याला अज्ञात अशा त्याच्या मृत मातेच्या स्मृती निगडीत होत्या – अशी त्याची इच्छा त्याने कळवली असल्याने राजा ययाति जातीने या व्यवस्थेमागे होता. पुरु येऊन पोचला तरी महाल सजलाच नव्हता. कारण चिरतरुण अ-जर अनियंत्रित ययातीने शर्मिष्ठेचा त्याच महालात भोग घेतला आणि देवयानीला हे समजल्यानंतर निर्माण झालेल्या घरगुती वादळात तो गुंतला होता. मानी, संतप्त देवयानीने शर्मिष्ठेला दास्यातून तडकाफडकी मुक्त करून राज्यातून निघून जाण्याची आज्ञा केली. ययातीने शर्मिष्ठेला आपली राणी करून अंतःपुरात ठेवण्याचा आग्रह धरला. देवयानीचे वर्चस्व कर्तृमकर्तृम अजरामर ययातीला मानवणारे नव्हते. आणि कचाच्या निमित्ताने मागे एकदा अभिमानाला डंख बसलेली देवयानी, मागे केव्हातरी आपला घात करणाऱ्या दासी शर्मिष्ठेला ययातीखातर आपली सवत होऊ देणार नव्हती. देवयानी राज्य सोडून गेली. ययाती प्रथम बेपर्वा राहिला. आपल्या नवविवाहित पुत्राच्या पहिल्या रात्रीसाठी अंतःपुर अजून सजले नाही, हीच त्याची एकमेव चिंता होती. आणि शर्मिष्ठा धावत येऊन सांगती झाली की राजपुत्राला आशीर्वाद देण्यासाठी आलेले देवयानीचे पिताजी शुक्राचार्य आपल्या कन्येच्या मानखंडनेने अती संतप्त होऊन देवयानीसमवेत राज्यातून निघून जात आहेत. त्यांनी ययातीला शाप दिला आहे की रात्र उलटण्याआत तो वृद्ध होईल !

ययाती लटपटला. आत्मविश्वासाचा हिमालय क्षणार्धात डळमळला. अतिमानुष ययाती फार फार मामुली माणसासारखा धापा घालू लागला. आपले काय होणार ? नुकता येऊन पोहोचलेला पुरु म्हणाला, पिताजी, येऊ घातलेले वृद्धत्व पत्करून आता वानप्रस्थाश्रमास चला. शर्मिष्ठेनेही हेच विनविले. परंतु ययातीला ही कल्पना दुःसह्य होती. चिरतारुण्याच्या बळावर एकाहून एक विजीगिषु स्वप्ने पाहणाऱ्या आणि तीन्ही लोक जिंकण्याचे युयुत्सू मनसुबे रचणाऱ्याने मध्ये असे वृद्ध होऊन वानप्रस्थाश्रम पत्करावयाचा ? केवळ यःकश्चित राणीच्या दुखावलेल्या अहंकारामुळे ? स्वतः शुक्राचार्यांसमोर जाण्याची ययातीची छाती होत नव्हती; त्याने पुरुला पाठवले. विवाह करून नुकताच येऊन पोहोचलेला पुरु पित्याच्या तारुण्याची भीक मागत त्या पावली शुक्राचार्यांकडे गेला आणि शर्मिष्ठेने विहिरीत लोटले असता देवयानीला ययातीनेच बाहेर काढून जीवदान दिले, या एके काळच्या स्मरणामुळे शुक्राचार्यांनी त्यांच्या भयंकर शापाला दिलेला उःशाप घेऊन परत आला. उःशाप असा की अन्य कोणी ययातीचे वृद्धत्व घेतल्यास ययाती

तरुण राहील. आणि वृद्धत्वाच्या केवळ कल्पननेच वृद्धावस्था येऊ लागलेला ययाती हे ऐकून तात्काळ पुन्हा फुशारला. आपले वृद्धत्व किमान आपल्या वैभवाच्या मोबदल्यात कोणीही पत्करील असा त्याचा गर्व. पण पुरु म्हणाला, की राज्यात कोणीही ते घेण्यास तयार नाही. ययातीला तर वृद्धत्व असह्य वाटत होते. शेवटी जगाचे, पित्याचे व्यवहार अवलोकून मनाने ऐन तारुण्यातच वैफल्य आणि वृद्धत्व जगू लागलेल्या पुरुने हे वृद्धत्व स्वतः पत्करले. विवाहाच्या पहिल्या रात्री पुरु गलित-गात्र जराजर्जर वृद्ध झाला. त्याचा पिता ययाती चिरतरुण राहिला. पुत्र वृद्ध, पिता ऐन यौवनात ! पुत्राच्या अवस्थेची फिकीर ययातीला नव्हती. आपले शापाने आलेले वृद्धत्व मनातले सर्व युयुत्सू मनसुबे पूर्ण होताच म्हणजे त्याच्या हिशेबी पाच-सात वर्षांनी पुरुकडून तो परत घेणार होता. शिवाय पुरुने एवढा त्याग करणे हे त्याचे पुत्र आणि राजपुत्र म्हणून कर्तव्यच होते.

## वेधक मांडणी

येथवर हे नाटक ढोबळ मानाने मूळ परिचित कथेच्याच वळणाने आले. तरीही भविष्य घडवू पाहणारा, तारुण्य न सोडणारा विकारी ययाती आणि स्वतःच्या भूत काळातली गूढे जाणून घेण्यासाठी खुषीने वृद्धत्व घेणारा व्यथित, विचारी पुरु ही या कथेची मांडणी वेधक होती. तिसऱ्या अंकाच्या अखेरी ययाती पुरुला लपटून म्हणत होता, लेकिन शाप मुझेही धारण करना पडता तो– तो सोचो पुरु– बस् एकही गंतव्य रह जाएगा मेरा– मृत्यूकी प्रतीक्षा और फिर मृत्यू ! आणि पुढे लगेच चढत्या रात्री पुरुचे तरुण शरीर वृद्धत्वाने गळू लागताच भयभीत शर्मिष्ठेने विचारले, पुरु, क्या हुआ ? पुरु कण्हत उत्तरला, शाप–मां – शाप– नये जन्मकी वेदना !

चिरतरुण ययातीच्या दृष्टीने प्रत्येक स्त्री ही उपभोग्य वस्तू होती तर पुरुला ती त्याच्या तारुण्यातही ' मां ' होती हेही लक्ष्यणीय आहे.

तरीही या नाटकाचा चौथा अंक खरा महत्त्वाचा होता. या अंकात पुरुच्या 'नवपरिणीत कोवळ्या वधूला – चित्रलेखेला– महत्त्व आले. पुरु तर विवाहोत्तर पहिलेवहिले भोग-सुख घेण्यादेण्याआतच वृद्ध झाला, आता हिचे काय ? असा प्रश्न या अंकाच्या आरंभीच उभा राहिला. या प्रश्नाचा एक धागा दुसऱ्या अंकात गुंतला होता. त्या अंकात जणू अदृष्टाची चाहूल लागूनच की काय, आपल्या विवाहाविषयी पुरु एके ठिकाणी पित्याला म्हणाला होता, स्वयंवरात आपल्या कन्येने महापराक्रमी चंद्र वंशाच्या मला राजकुमारालाच वरावे आणि आर्यावर्ताची सम्राज्ञी व्हावे या इच्छेने स्वयंवराचा ' पण ' देखील कठीण ठेवण्यात आला होता. पण मग माझ्या ' शौर्या ' ची कल्पना मिळाल्याने स्वयंवराचा ' पण ' मागे घेण्यात आला. हेतू हा हा की कोणत्याही परिस्थितीत चित्रलेखेने आमच्या घराण्यातच पडावे, यात सन्मान असला तर आमच्या घराण्याचा होता, गौरव तुमच्या कीर्तीचा होता– मला तर

वाटले– वाटले की चित्रलेखेचा विवाह तुमच्याशीच झाला ! ती विद्यावती आहे, वीरपुत्रांना जन्म देण्याची स्वप्ने तिने बाळगली असतील– तिला तुमच्यासारखाच पती मिळायला हवा होता, पिताजी ! मी तिला लायक नाही. या विवाहात माझे काही महत्त्व मला दिसत नाही. पूर्वजांच्या वाटेने मला जायचे नाही–मी वेगळा आहे.

## खेळाची समाप्ती

चौथ्या अंकात पातिव्रत्याचे संस्कार घडलेल्या यौवनसंपन्न चित्रलेखेने वृद्ध पुरुलाही पती म्हणून पत्करण्याचा निर्धार केला. परंतु त्याचे प्रत्यक्ष किळसवाणे रूप ती सहन करू शकली नाही. तिने आधार मागणाऱ्या पुरुला दूर लोटले. याने क्रुद्ध होऊन चित्रलेखेला पत्नीधर्माची जाणीव देण्यासाठी आलेल्या ययातीला तिने त्याच्याच कणखरपणे उलट विचारले, मला पत्नीधर्म शिकवू येता पण मला सांगा, माझ्या पतीला वृद्धत्वाकडे, मृत्यूच्या समीप कोणी ढकलले ? काय मी हे केले ? शहाणपणाच्या गोष्टी मला सांगू नका. माझ्यावर काय ओढवले आहे ते समजलेले नाही तुम्हांलाच. मला आदर्श शिकवता ? तुम्ही कोणता आदर्श घडवलात ? प्रजेच्या भलाईचे निमित्त पुढे करून मूर्ख पुत्राच्या गळचात आपले पापी वृद्धत्व बांधलेत हाच ना ? उज्ज्वल भविष्यकाल घडवण्यासाठी तुम्हांला तारुण्य हवे होते. मी ओळखत नाही हे अस्तित्वात नसलेले उज्ज्वल भवितव्य. त्याचा जन्म झालेला नाही, पण माझा झाला आहे. ययाति सांगतो, तुझ्यातील अलौकिकत्वाची आताच कसोटी आहे, तू अलौकिक हो ! चित्रलेखा म्हणते, होते पण सामोरे येईल त्या अलौकिकाला घाबरता कामा नये तुम्ही ! तुम्ही भ्याड आहात. तुमच्या कृत्याची आणि उपदेशाची परिणती तुम्हांला सहन होणार नाही. ययाति विचारतो, कसली परिणती ? चित्रलेखा सांगते, विवाहाची माळ तुमच्या पुत्राच्या गळचात घातली तेव्हा त्याची मला काहीएक ओळख नव्हती. मी त्याच्या वंशाच्या कीर्तीवर मोहित होते. पतीच्या पौरुषाच्या बलावर चंद्रवंशाच्या भावी वीरपुत्रांची माता बनण्याचे स्वप्न जपत होते मी. आता माझ्या पतीचे पौरुष तुम्ही घेतले आहे. त्याबरोबर येणारे सगळेच तुम्हांला पत्करले पाहिजे ! अलौकिक व्हायचे ना ? मी तयार आहे, तुम्हीही व्हा आता अलौकिक– असे यापूर्वी कोणी केले नाही तर नसेल– तुम्हांला तर उज्ज्वल भविष्य घडवायचे आहे ? ययाति तगमगून विचारतो, पिचाचिनी, मला व्यभिचार करण्याला प्रवृत्त करतेस ? राजपुत्री असून तुझ्या मेंदूत ही अशा विचारांची घाण कोठून आली ? त्यावर चित्रलेखा उत्तर देते, आपण माझ्या विद्येचा गौरव करीत आहात ! शिव आणि सौंदर्याइतकेच अमंगळ आणि गलिच्छही सत्याचा भाग असते– केवळ भ्याडच पूर्णसत्य पाहण्याचे टाळतात ! ययाति चित्रलेखेने दाखवलेल्या प्रखर सत्यापुढे लटपटतो तेव्हा चित्रलेखा त्याला म्हणते, म्हणजे एकूण आपण आपल्या पुत्राला त्याचे पौरुष परतही देणार नाही आणि त्या पौरुषावर हक्क असलेल्या माझाही स्वीकार करणार नाही ? तर

मग ऐका — माझ्यापुरता हा तुम्ही मांडलेला खेळ बस्स झाला — तुम्हांलाच या तुमच्या खेळाची समाप्ती पाहिली पाहिजे !

चित्रलेखा विष घेते. ययातीचा हात तिला अडवण्यासाठी उठूच शकत नाही. भयंकर यातना भोगत ' मला मरायचे नाही हो—मला वाचवा ' म्हणत चित्रलेखा मरते आणि आपल्या कर्तुमकर्तुमत्वाचा बुलंद पायाच या प्रसंगात खचलेला ययाति, पुरुला आपले पौरुष देऊन शर्मिष्ठेबरोबर वानप्रस्थाश्रमात निघून जातो. नाटकाच्या शेवटी तरुण पुरु विचारांच्या भयंकर वादळात भिरकांडत चित्रलेखेच्या प्रेताशी एकटा पुटपुटतो आहे, चित्रा, तुला असे हकनाक मरण्यासाठीच का मी विवाह करून इथे आणले ? कोणत्या जन्मीचे ऋण चुकविण्यासाठी आलीस तू, कुणास ठाऊक ! पण तुझ्या आत्महत्येचा बोध आम्हांला होत नाही—काय या सगळ्याचा अर्थ...परमेश्वरा, या सगळ्याचा अर्थ तरी काय ?

## धारदार नाट्यवस्तु

इथे या ' ययाति 'वर समाप्तीचा पडदा पडला. ' या सगळ्याचा ' अर्थ शोधीतच प्रेक्षकही बाहेर पडले. अर्थ न उमगला तरी नाटकाचे आणि नाट्यविषयाचे सामर्थ्य जाणवलेले होते. जीवनाच्या मोहात बुडून मृत्यू नाकारू पाहणाऱ्या महामानव ययातीलादेखील निसर्गक्रमापुढे अखेर वाकावे लागले होते. अपरिहार्य मृत्यू आणि निसर्गक्रम नाकारण्याच्या त्याच्या जिद्दी हट्टात अपरिमित हानी मात्र त्याच्या हातून घडली. त्याचा पुत्र पुरु हा त्याच्याच जिद्दी जीवनाचा जिवंत बळी. चित्रलेखेचा भयंकर मृत्यू त्याच्याच या जिद्दीने घडवला. देवयानीला त्यानेच वर्मी दुखावले आणि शुक्राचार्यांचा शाप परिणामी साऱ्या आर्यावर्तावर ओढवून घेतला, हे जाणवले आणि या नाटकामागचे आशयाचे रहस्य अधिक जवळ आले असे वाटू लागले. मानव हा अखेर मानव आहे, तो नाशिवन्त आहे, आणि हे विसरण्याचा वा नाकारण्याचा हट्ट परिणामी फार घातक ठरतो असे तर नाटककाराला सांगावयाचे नसेल ? पुरूच्या मृत मातेला अज्ञात ठेवण्याच्या ययातीच्या हट्टामागे ती केवळ राक्षस कुलातील होती एवढेच कारण असेल की, आणखी काही नाटककाराला अभिप्रेत असेल ?

काही असो, एवढे खरे की या नाटकाने आजही माझा पिच्छा सोडलेला नाही. अनेक प्रश्न ते माझ्यासमोर टाकते आहे. अनेक रहस्ये अद्याप ते वागवते आहे, असे मला वाटत राहते. हा सारा परिणाम अलंकारप्रचुर काव्यात्म भाषेशिवाय आणि पसाऱ्याशिवाय या नाटकाने केला आहे. त्यात विचाराला जागा नाही. संगीत तर नाहीच, आरंभापासून अखेरपर्यंत विस्तार आहे तो केवळ नाट्यवस्तूचाच, एखादे शस्त्र पाजळावे तसे या नाट्यवस्तूचे पाते अंकाअंकागणिक एकसारखे धारदार होत जाते आणि चित्रलेखेच्या अखेरच्या संवादांनी आणि यातनामय मृत्यूने तर हे पाते आपल्या मेंदूत पार आतवर खुपसले जाते. यशस्वी विचारप्रधान

नाटकाची ही एकजात वैशिष्टच.


अशा या प्रभावी नाटकात अमरिश पुरी (ययाति) नाटकाला हवे तसे बलिष्ठ आणि आत्मविश्वासाने आणि ताठ जिद्दीने भरलेले वाटले. त्यांनी जरा–आणि–मृत्यु-भयाने लटपटलेला ययातीही समजदारपणे साकार केला. ययातीच्या बरोबर उलट असा त्याचा पुत्र पुरु दिग्दर्शक सत्यदेव दुबे यांनी हृद्य स्वरूपात दाखवून जागोजाग काळजाचा ठाव घेतला. इतर भूमिकांत सुनील प्रधान (देवयानी), आशा दंडवते–पूर्वाश्रमींच्या कामेरकर (चित्रलेखा), तरला मेहता (शर्मिष्ठा) आणि सुलभा देश-पांडे (स्वर्णा) या अभिनेत्रींनी सत्यदेव दुबे यांच्या दिग्दर्शनाखाली भूमिकांचा आणि नाटकाचा तोल पुष्कळ चांगला सांभाळला. किंबहुना सर्व नटसंचच समजूत-दार आणि कसलेला वाटला. नाटकाप्रमाणे प्रयोगातही ढिलाई नव्हती.

आपल्या वि. वा. शिरवाडकरांनी 'ययाति आणि देवयानी' लिहिले असले तरी हा 'ययाती' मराठीत प्रयोगशील मंडळींनी आणला पाहिजे. मूळ कथा एक असली तरी ही नाटके अगदी भिन्न आणि वेगवेगळी नाट्यवस्तू सुचविणारी आहेत. आणि असे म्हटले तर तो शिरवाडकर यांच्या प्रतिभेला अन्याय ठरू नये, की हा गिरीश कर्नाड यांचा मूळ कानडी भाषेतला 'ययाति' थोडा अधिक भक्कम आणि सखोल आहे.

□

# अरे मानसा, मानसा...

मध्यंतरी म्हणजे गेल्या २५ ते २९ सप्टेंबर या दर-म्यानच्या दिवसांत मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीत एक प्रदर्शन झाले. तशी जहांगीर गॅलरी प्रदर्शनासाठीच प्रसिद्ध आहे; त्यात अगदी साड्यांचे नि मोटारीच्या सुट्या भागांचे देखील प्रदर्शन भरू शकते. पण हे प्रदर्शन आणखीच वेगळे होते. हे कलात्मक नव्हते आणि व्यापा-रीही नव्हते, हे फॅशनेबलदेखील नव्हते, हे नैसर्गिक प्रदर्शन होते. निसर्गाच्या अवकृपेचा भीषण आविष्कार हा त्याचा विषय होता. स्थळ: बिहारचे गया आणि शाहाबाद जिल्हे. काळ: यंदाचा गेला मे महिना. प्रदर्शन भरवले होते बिहार–दुष्काळ साहायता–समितीने.



काळीज फाडून जाणारे असे प्रदर्शन आर्ट गॅलरीत क्वचित पाहायला मिळते. या प्रदर्शनाचे वर्णन तरी कोणत्या शब्दांत करावे ? अनेक मोठमोठी छायाचित्रे. काही जरा कमी मोठी छायाचित्रे. सगळी ठसठशीत. वेधक. काळ्या पांढऱ्या रंगांतली उत्तम प्रकारे घेतलेली. त्यात काय दिसत होते ? एक म्हणजे ओसाड वसत्या. ओसाडीचे इतके विदारक चित्र काढू म्हणता काढता येणार नाही, अशी ओसाडी कॅमेऱ्यात आयती मिळालेली होती. घरे सुतकात होती. झाडे अगदी निष्पर्ण, कोरडी ठाक होती. शेते जळून त्यांचे बरड माळ झाले होते. जमीनीला मोठमोठे तडे गेले होते. आभाळ कसे अगदी निरभ्र होते बरे ! अशा या वातावरणात छाया-चित्रांतून अंगावर आल्यासारखे सर्वभर दिसत होते रिते वाडगे, मांसाची लक्तरे फोडून बाहेर येऊ पाहणारे बसले–लोळलेले सांगाडे, सुकले स्तन, वासली तोंडे, भुकेच्या वेदनेने बधीर झालेले निस्तेज भकास डोळे, मिळेल ते खाऊन फुगलेली रोगट पोटे, सडली चामडी, टरटरल्या रक्तहीन शिरा, आणि धर्मार्थ अन्नासाठी लागलेल्या लांबलांब रांगा. ते रिते वाडगे जणू, भरल्या पोटी ते सारे तिथे उभे राहून पाहणाऱ्या आपल्यावर फेकले जातील की काय असे भासत होते. बसले लोळलेले सांगाडे जिवंत आहेत हे अनेकदा संदर्भानेच जाणावे लागत होते. सुकल्या स्तनांना आसुसून जळूसारखी लुचलेली पोरे पुढल्याक्षणी कधी कुणी ऐकला नसेल

डोळ्यांत घुसणाऱ्या
प्रत्येक रित्या पोटावर
चेहऱ्यावर, हाडाहाडावर
एकच एक सवाल होता
'आमचा कोणता अपराध ?'



असा टाहो परमेश्वराला उद्देशून फोडतील असे एकसारखे मनाला वाटत होते.

यातच गांधीधाम नामक गावात एक बैल भुकेने तडफडून मेला त्याचे अंत्यदर्शन होते. एका कैलासवासी मूक-बळी कुत्र्याचेही असेच छायाचित्र लावले होते. आणि यातच एका म्हातारीचे उपासमारीने सुजलेले कलंडले शव दोन छायाचित्रांत दिसत होते. यांतल्या पहिल्या छायाचित्रात भुकेकंगाल बुभुक्षित मुद्रांची काही भली माणसे शवाभोवती मुकी मुकी उभी राहून अन्नोपोटी जणू म्हातारीला सद्गती मिळावी अशी सामुदायिक प्रार्थनाच कठोर जगन्नियंत्याकडे करीत असल्यासारखी वाटत होती, तर दुसरे छायाचित्र निव्वळ शवाचेच होते. पांघरूणात लपलेला एक स्त्रीचा की पुरुषाचा ते नकळणारा निश्चेतन देह आणि त्याच्या जवळ उपडे लोळलेले एक हाडकुळे उघडेवाघडे पोर असेही दुसरे एक धुळीतले छायाचित्र होते. पांघरुणाआत काय असेल, जे असेल ते सजीव असेल की निर्जीव असेल, याची शाश्वती देता आली नसती. एवढे खरे की त्या मरगळल्या निपचित उपड्या पोराला मात्र तेवढाच एकुलता एक आधार या जगात असावा. निदान तसे ते त्या पांघरुणाला मरगळल्या स्थितीतही झटून होते.

तुम्ही म्हणाल हे सारे फार निर्दय आहे हो. ते होतेच. दोन भावंडांचे एक छायाचित्र एका अन्नछत्रावर घेतलेले होते. त्यातले वडील भावंड – वय वर्षे असेल दहा बारा – आपल्या कडेवरच्या तीन–चार वर्षांच्या भावंडाला भरवीत होते. अन्न त्या चिमुकल्याच्या ओठांवर, गालांवर ओघळले होते. आणि उचलता न येणारी


मान मोठ्याच्या खांद्यावर टाकून ते पोर नुसतेच वासल्या तोंडाने अर्ध्या उघड्या डोळ्यांनी गुंगीत शांत पडून होते. तोंडी दिलेला घास गिळण्याचीही शक्ती त्याच्यात उरली नव्हती !

याहूनही दोन छायाचित्रे मेंदूचा आणि काळजाचा ठाव घेणारी होती. धान्याचे एक चालू आणि भरले गोदाम पार्श्वभागी दिसत होते बघा. धान्याचे ढीग त्यात दिसत होते. त्यात तेथल्या कामकरी माणसांचे पायही दिसत होते. आणि गोदामाच्या दारी दोन आवळे जावळे चिमणे जीव एकमेकांना बिलगून मोठ्या मोठ्या भुकेल्या डोळ्यांनी धान्यांचे सांडले तुरळक दाणे कोंबड्यांनी वेचावेत ना, तसे पटापट वेचीत होते. एका लक्तरात भरत होते. माणसांच्या दोन पिलांना कोंबड्यांच्या नाहीतर अगदी कुत्र्यांच्या बेवारशी पिलांची अवकळा आली होती ! कुठे असतील त्यांचे जन्मदाते ? निदान या जगात ? आम्ही तर इथेच होतो, आलीशान जहांगीर गॅलरीत, सुखेनैव त्या दयनीय पोरांना न्याहाळीत आणि नक्राश्रू ढाळीत ! पुन्हा बाहेर पडून तांदूळ हल्ली पुरत नाही, साखर संपली म्हणून तक्रार करणार होतो. आमची पिले आमच्याच आसऱ्याला सुरक्षित होती. देवाशपथ सांगतो, दाणे वेचणाऱ्या त्या दोन चिमण्या भुकेजल्या पोरांची ती जीवघेणी छायाचित्रे अद्याप डोळ्यांसमोरून हलतच नाहीत, त्यांचा कोणता अपराध ? त्या प्रदर्शनातल्या प्रत्येक छायाचित्रातून वरचा गुळगुळीतपणा फोडून आमच्या डोळ्यात घुसणाऱ्या प्रत्येक रित्या पोटावर, चेहऱ्यावर, नजरेत, अगदी हाडाहाडांत हाच एक सवाल जाणवत होता, आमचा कोणता अपराध ? एका छायाचित्रात अजून काँग्रेसचे निवडणूक–भित्तीपत्रक एका झोपडीच्या भिंतीला चिकटून शाबूत राहिलेले दिसत होते. तर या साऱ्या प्रदर्शनात 'टाटा आयर्न अँड स्टील'ने 'बिहारचे हेही रूप, म्हणून जाहिरात केलेले आपल्या मोठमोठ्या कारखान्यांचे पोलादी श्रीमंत प्रदर्शन एकीकडे दिमाखाने मिरवत होते. पलीकडे मागे धान्याचे ढीग आणि दाराशी भुकेने कोळपलेले चिमणे जीव. कुठेतरी टोलेजंग धडधडते कारखाने आणि पलीकडे भेगाळलेल्या धरतीवर कलंडलेले भूकबळी – अन्नछत्रे आणि रिते वाडगे सारेच विसंगत, भेसूर, बेचैन करून टाकणारे, पोटातली भूक पार मारणारे.

त्या मन:स्थितीत आर्ट गॅलरीच्या त्या प्रक्षोभक दालनातून कसाबसा मी बाहेर आलो आणि अगदी सहज लगतच नजर गेली. शेजारच्या 'सॅमोव्हर' उपाहारगृहात गर्दीगर्दीने बसून सुंदर सुंदर पोषाखातली माणसे मनसोक्त खात होती, पीत होती, धूम्रपान करीत निर्भर हास्यविनोद करीत होती. एक भिंत टाकून दुष्काळाचे आतडी पिळवटून टाकणारे मूक दर्शन मांडले होते. आणि इथे हे दर्शन ! दृष्टीवर क्षणभर विश्वासच बसेना. मनाशी म्हणालो, माणसांचे हेही रूप... आणि घाईने पायऱ्या उतरून एकदाचा रस्त्यावर आलो.

□

कुलकर्णी दाम्पत्य सुखी आहे. त्यांच्या विवाहाला तीन वर्षे झाली. त्यांना अजून मूलबाळ कसे नाही यामागील त्यांची भूमिका समजावून घेण्यासारखी आहे. मुलांच्या बरोबर जबाबदारी येते. त्यांच्या संगोपनासाठी काळजी, कष्ट, वेळ व पैसाही आवश्यक असतो. मुलांच्या शिक्षणाची व इतर गोष्टींची संपूर्ण तरतूद करता न आल्यास नुसती मुले होऊन काय उपयोग? शिवाय वैवाहिक सुखाचा काळ काय पुन्हा येत असतो? म्हणून पहिले अपत्य जरा उशीराच होऊ देण्याचे त्यांनी ठरविले आहे. आपण सुखी असल्याचे ते सांगतात ते यामुळेच.



*कुलकर्णी दाम्पत्य सुखी आहे—*

## तसेच तुम्हीही?



67/186

# मनोवेधक रहस्यकथा

मराठी भाषेतील त्याच त्या प्रकारच्या कंटाळवाण्या रहस्यकथांच्या गुऱ्हाळाची कोंडी श्री. नारायण धारप यांनी फोडली आहे. नवनवीन चमत्कृतिपूर्ण विषय अभ्यासूपणाने हाताळून ते मनोवेधक पद्धतीने कथांमध्ये गुंफण्याची हातोटी त्यांना चांगली साधली आहे. त्यांच्या कथा अद्‌भुतता आणि तर्कशुद्धता यांच्या सीमारेषेवर रेंगाळणाऱ्या असतात. कधी कधी त्यांचा तोल घसरतो. परंतु वैज्ञानिक चमत्कृतिपूर्ण कथांमध्ये नेहमी येणारा बालिश बेतालपणा ते आपल्या सूत्रांमध्ये येऊ देण्याचे सहसा टाळतात. त्यामुळेच त्यांच्या रहस्यकथा वाचताना एक सूक्ष्म आनंद होतो. त्यांच्या कथेमधील अद्‌भुततेचा एखादा धागा किंवा एखादे अगम्य गणिती समीकरण डोळे मिटून गृहीत धरले की बाकी सारे सहज आणि तर्कशुद्ध असते. वाचताना कुठे खटकत नाही. मराठी रहस्यकथांमध्ये श्री. धारप यांनी एक नवा पायंडा पाडला आहे हे निश्चित.

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या या तीन दीर्घकथाही याचीच साक्ष पटवितात. रहस्याच्या तर्कशुद्ध सोडवणुकीबरोबरच विषयांची त्यांची हाताळणी भरपूर उत्कंठा वाढविणारी असते. ' पारंब्यांचे जग 'मध्ये त्यांनी हळूहळू अती सूक्ष्मपणे गुंफीत नेलेले गूढतेचे वलय विलक्षण परिणाम करते. विशेषत: भाषेला ओज न चढविता, वर्णनामध्ये भयानकता न आणता केवळ प्रसंगा-प्रसंगांतूनच वातावरणाची भयानकता ते वाढवितात. ' पारंब्यांचे जग 'मधील त्यांचा नायक नोकरीच्या निमित्ताने एका दूरच्या अनोळखी ठिकाणी येऊन पडलेला असतो. अशा वेळी कुणाच्याही मनात साहजिकपणे येणारी खिन्नता, औदासिन्य आणि अगम्य गूढता त्याच्याहीभोवती पसरते. आणि हेच नैसर्गिक गूढतेचे वातावरण श्री. धारप यांनी मोठ्या कुशलतेने वाढवीत नेले आहे. वाचकाला खिळवून ठेवले आहे.

त्यांचे नायक साधारणत: सामान्य कोटीतले असतात. रहस्यांचा उलगडा ते स्वत: कधीच करीत नाहीत. कोणत्यातरी कारणाने ते रहस्यात गुंफले जातात. या रहस्याचा उलगडा कोण करू शकेल हे जाणण्याची बुद्धी मात्र त्यांच्यात असते. आणि त्या दृष्टीने ज्यांच्याकडे ते मदतीची याचना करतात ते तज्ज्ञ भलतेच हुशार आणि असामान्य बुद्धीचे निघतात. ' पारंब्यांचे जग 'मधील डॉ. सेन आणि ' ऐसी

रत्ने मेळवीन 'मधील डॉ. कोतवाल यांची व्यक्तिमत्त्वे यामुळेच छाप पाडून जातात. नायकाची चौकसबुद्धी, आणि त्याचा चिवटपणा यांच्यावरही हे तज्ज्ञ ताण करतात.

परंतु गूढतेच्या बाबतीत, अघटितपणाच्या मर्यादेच्या बाबतीत ' पारंब्यांचे जग '-मध्ये श्री. धारप यांनी जो संयम राखला आहे तो ' ऐसी रत्ने मेळवीन 'मध्ये नाही. कथेची मध्यवर्ती कल्पना आकर्षक आहे. देशातील अती प्रगल्भ बुद्धीची असामान्य मुले निवडून त्यांच्याकरवी आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका विकृत बुद्धिवंताची ही कथा आहे. कल्पना चांगली हाताळली आहे. पण शेवटी शेवटी ती अतर्क्य-अगम्यतेच्याही पलीकडे जाऊ लागते. ' पारंब्यांचे जग-' मध्ये हे असे एवढ्या तीव्रतेने घडत नाही.

## समस्येची हळूवार उकल

' सरिता ' ही मात्र अगदीच वेगळ्या विषयावरील वेगळ्या तऱ्हेने हाताळलेली कादंबरी आहे. मराठी भाषेत एवढ्या धीटपणे सभ्यतेच्या मर्यादा न उल्लंघिता या विषयावर कुणी लिहिले नसेल. कादंबरी लिहिण्यासाठी श्री. धारप किती श्रम घेतात, किती अभ्यास करतात— हे या कादंबरीवरून कळावे. एका नवविवाहित जोडप्याच्या जीवनात एक अतिशय नाजूक अशी शारीरिक आणि मानसिक समस्या निर्माण होते आणि त्यामुळे त्यांचा सारा संसार उद्ध्वस्त होण्याची पाळी येते. या समस्येची हळुवार उकल या कादंबरीत केली आहे. बराचसा भाग मानसशास्त्रीय विवेचनात खर्च केलेला आहे. आणि तो पटतो. अनावश्यक वाटत नाही. किंबहुना त्यामुळे रसभंगही होत नाही. त्याचबरोबर श्री. धारप यांनी मध्ये खोल दरी पडलेल्या दोन प्रेमिकांच्या मनातील विदारक खळबळींचे चित्रही कुशलतेने रंगविले आहे. इथे घटनांना महत्त्व नाही. महत्त्व आहे मानसिक संघर्षाला. आणि तो चितारण्यात लेखक यशस्वी झाले आहेत.


भयकथांना, रहस्यकथांना किंवा समस्याप्रधान कथांना चिरंतन वाङ्मयाच्या फूटपट्ट्या लावत नसतात. परंतु तरी ी श्री. धारप यांची या तीन कथांमधील पात्रे व्यवहारी जगातील वाटतात—' ऐसी रत्ने मेळवीन 'मधली काही पात्रे सोडून—ती बोलतात, वागतात, चालतात खऱ्या माणसांप्रमाणे. त्यामुळेच या कथा वाचताना कंटाळा येत नाही. काही तरी नवे आणि निराळे वाचत असल्याची जाणीव होते. आणि बुद्धीला थोडा ताण देऊन सौम्य करमणूकही होते.

**अरुण साधू**

**[ पारंब्यांचे जग : मूल्य पाच रुपये : पृष्ठे १३९**
**ऐसी रत्ने मेळवीन : मूल्य सहा रुपये : पृष्ठे २२३**
**सरिता : मूल्य आठ रुपये : पृष्ठे २५१**
**प्रकाशक : ज्ञानराज प्रकाशन. ]**

○

# संपूर्ण आणि सार्वत्रिक पण




वि. स. वाळिंबे

पेट्रोग्राडमध्ये क्रांती होऊन दहा दिवस झाले होते. लेनिन अद्यापही झुरिक-मधल्या गलिच्छ कामगारवस्तीमध्ये निर्धन अवस्थेत जीवन कंठीत होता. दुसरी क्रांती करण्यासाठी पेट्रोग्राडला पोचण्याची त्याची धडपड सुरू झाली असली तरी अद्याप तिला यश आले नव्हते.

२५ मार्च रोजी त्याने 'प्रावदा'-मध्ये प्रसिद्ध करण्यासाठी गॅनेटस्कीकडे आणखी एक पत्र धाडले. हे पत्र सहा-सात ओळींचेच आहे. पण त्यातही 'क्रांती' या एकाच कल्पनेने लेनिन किती झपाटलेला होता हे दिसून येते. आज जे जे काही म्हणून उभे आहे—मग ती शासनयंत्रणा असो, समाजरचना असो वा अर्थव्यवस्था असो—त्या सर्वांचा विध्वंस करण्यासाठी त्याच्या जिवाची तडफड होत होती. झुरिकहून धाडलेल्या या शेवटच्या पत्रात तो लिहितो— 'भांडवलदारांच्या हातातील सत्ता कामगार-मंडळांनी आपल्या ताब्यात घेतली पाहिजे. असे झाले की महायुद्ध संपुष्टात येईल आणि जागतिक क्रांतीचा शुभारंभ करता येईल.' पंधरा वर्षांपूर्वी लिहिलेल्या एका पत्रातही त्याने हीच भाषा वापरली होती. १९०२ मध्ये

# भीषण आणि निर्घृण विनाश

लिहिलेल्या पत्रात लेनिनने म्हटले होते–'इतिहासाने आपल्यावर फार मोठी जबाबदारी टाकली आहे. केवळ एका देशातील कामगारवर्ग मुक्त करून आपण स्वस्थ बसता कामा नये. रशियन कामगारांनी आंतरराष्ट्रीय समाजवादी क्रांतीचे अग्रदूत झाले पाहिजे.'

लेनिन गॅनेटस्कीला पत्र लिहीत असतानाच, जर्मन लष्करी कचेरीकडून बर्लिनमधल्या परराष्ट्रखात्याकडे एक तार आलेली होती. या तारेत म्हटले होते-स्वित्झर्लंडमधल्या रशियन क्रांतिकारकांना पेट्रोग्राडपर्यंत पोचविण्याची आपणव्यवस्था करण्यास काहीच हरकत नाही. मात्र या क्रांतिकारकांनी मध्येच पळून जाऊन जर्मनीत क्रांतितत्त्वांचा प्रसार करता कामा नये एवढी आपण दक्षता घेतली म्हणजे झाले.'

लेनिनप्रभृति रशियन क्रांतिकारकांना पेट्रोग्राडपर्यंत पोचविण्याची कामगिरी जर्मन सरकारने स्वतःच पार पाडावी ही कल्पना पार्व्हस याची ! पार्व्हस हा एकेकाळचा क्रांतिकारी समाजवादी पक्षाचा कार्यकर्ता. युद्धकाळात तो जर्मन सरकारचा हस्तक म्हणून वावरत होता. पार्व्हसने रशियातील जर्मन राजदूत काऊंट ब्रॉकडॉर्फरँटझाँ याला हे पटवून दिले होते की लेनिनप्रभृति कट्टर युद्धविरोधक रशियात पोचले तर ते जर्मनीच्याच हिताचे ठरणार आहे. पार्व्हसची ही सूचना लष्कर प्रमुखांनाही पसंत पडली. आणि त्यामुळेच त्यांनी लेनिनला रशियात पोचविण्याची जबाबदारी जर्मन सरकारने घ्यावी असे परराष्ट्रखात्याला तार करून कळविले होते. हे रशियन क्रांतिकारक कोणत्या तत्त्वज्ञानाचे उपासक आहेत याची जर्मन परराष्ट्रखात्याला कल्पना होतीच. हे क्रांतिकारक एकदा रशियात पोचले की आपल्या सरकारने महायुद्धातून बाहेर पडावे असा त्यांचा प्रचार सुरू होईल आणि नव्या राजवटीला ती मागणी मान्य करावी लागेल याबद्दल बर्लिनमध्ये कोणालाच शंका वाटत नव्हती. कारण या क्रांतिकारकांची अशी दृढ समजूत होती, की सध्या सुरू असलेले आंतरराष्ट्रीय महायुद्ध म्हणजे साम्राज्यसत्तांमधील स्वार्थी भांडण असून त्यात भाग घेऊन रशियाने साम्राज्यवादाला हातभार लावू नये. त्यामुळे त्यांना या महायुद्धापेक्षा

२०

रशियातील वर्गयुद्धाची घाई झाली होती. लेनिनप्रभृति क्रांतिकारकांना हवे असलेले वर्गयुद्ध रशियात सुरू झाले की आपोआपच रशियाची लष्करी शक्ती खच्ची होणार व परिणामत: आपली पूर्व आघाडी निर्वेध होणार हे ध्यानात घेऊनच जर्मनीचे त्या वेळचे महामंत्री बेथमान–होलवेग यांनी पार्व्हसच्या सूचनेवर आपल्या मंजुरीचे शिक्कामोर्तब केले होते. जर्मनीला हवे असलेले कार्य पार पाडण्यासाठी लेनिनइतकी दुसरी समर्थ व्यक्ती शोधूनही सापडण्यासारखी नव्हती.

जर्मन सरकारचा विचार पक्का झाल्यानंतर डिएगो बर्गेन हा परराष्ट्रखात्यातील अधिकारी बर्लिनहून झुरिकला गेला. गॅन याने स्विस सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचा चिटणीस फ्रिट्झ प्लॅटेन याच्यामार्फत लेनिनशी बोलणी सुरू केली. जर्मनीची मदत घेऊन रशियात जावे की नाही यासंबंधी लेनिनचा निर्णय होत नव्हता. त्या ऐवजी ब्रिटन आणि फ्रान्स यांची मदत घेऊन रशियात प्रवेश करण्याची खटपट करावी काय हा विचारही त्याच्या मनात खेळत होता. परंतु ब्रिटन व फ्रान्स आपल्या या योजनेबाबत कितपत उत्सुकता दाखवतील याबद्दलही तो साशंक होता. जर्मनीची मदत घेण्यात व्यक्तिश: लेनिनला कोणताच विधिनिषेध वाटत नव्हता. परंतु जर्मनी आणि रशिया यांचे युद्ध सुरू असल्यामुळे आपण जर्मनीच्या मदतीने मायदेशी परतलो तर रशियन सरकार शत्रूशी संगतमत केल्याचा आरोप ठेवून आपल्या देहांताची शिक्षा सुनावील हा संभव त्याला दृष्टिआड करता येण्यासारखा नव्हता. परंतु परिस्थिती अशी होती की पेट्रोग्राडला लवकर पोचणे आवश्यक होते आणि त्यासाठी अन्य कोणताही मार्ग उपलब्ध नव्हता. जर्मन सरकार बर्न ते स्टॉकहोम एवढ्याच प्रवासाची जबाबदारी घेणार होते. त्यामुळे पुढच्या प्रवासाबाबत स्टॉकहोममधील आपला सहकारी गॅनेटस्कोम याचा सल्ला घेतल्याशिवाय पुढचे पाऊल टाकणे लेनिनला धोकादायक वाटत होते. म्हणून त्याने या एकंदर बनावाबद्दल गॅनेटस्काचे मत जाणून घेण्यासाठी त्याला सांकेतिक भाषेत तार केली. गॅनेटस्कीकडून होकार आल्यानंतर म्हणजे ३ एप्रिलला लेनिनने प्लॅटेन याची भेट घेऊन बर्गेन याची योजना आपल्याला मंजूर असल्याचे कळविले.

बर्गेन याच्या योजनेनुसार स्वित्झर्लंडमध्ये राहणाऱ्या रशियन क्रांतिकारकांना एका बंद आगगाडीतून अतिशय गुप्त रीतीने बर्नहून जर्मनी आणि स्वीडन यांच्या सीमेवरील सासनिट्झ स्टेशनपर्यंत पोचविण्यात येणार होते. या प्रवासी तुकडीचे नेतृत्व फ्रिट्झ प्लॅटेन करणार होता. प्रवासामध्ये प्लॅटेनचे आदेश आपण मान्य करू असे क्रांतिकारकांनी लिहून द्यावे, अशी बर्गेन याने अट घातली. त्या प्रमाणे लेनिनसह सोळा बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांनी या खास प्रवासातील सर्व निर्बंध आपल्याला मान्य असल्याचे लिहून दिले. या सोळा जणांव्यतिरिक्त मेन्शेव्हिक, सोशल रेव्होल्युशनरी, ज्युईश बंड आदी पक्षांचे आणखी सोळा कार्यकर्तेही या आगगाडीतूनच प्रवास करणार होते.

१० एप्रिलला पहाटे ही खास गाडी सुटणार होती. त्यामुळे स्वित्झर्लंडमध्ये रशियन क्रांतिकारक ९ एप्रिल रोजी बर्न येथे जमले. लेनिनची दिवसभर धांदल चालूच होती. स्वित्सर्लंडमधल्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या कार्यकर्त्यांनी लेनिन-साठी निरोपाच्या भोजनाचा बेत आयोजित केला होता. तेथे प्लॅटेनने तीन हजार स्विस फ्रँक्स् त्याच्या हातावर ठेवले. स्वत: लेनिनने झुरिकमधील आपल्या मित्रांकडून एक हजार फ्रँक्स गोळा केले होते. या चार हजार फ्रँक्सच्या बळावर बर्नपासून पेट्रोग्राडपर्यंतचा आपला सोळा जणांचा प्रवास नीट पार पडेल याची खात्री करून घेतल्यावर लेनिन आणि त्याचे सहकारी प्रवासाची अखेरची तयारी करू लागले.

लेनिनने एक पत्र लिहून स्वित्झर्लंडमधील आपल्या इतर सहकाऱ्यांचा निरोप घेतला. या पत्रात तो म्हणतो, 'आंतरराष्ट्रीय कामगार क्रांतियुद्धातील पहिले यशस्वी पाऊल टाकण्याचा मान रशियन कामगारांनी मिळविला असला तरी हा केवळ प्रारंभ आहे हे विसरून चालणार नाही. साम्राज्यवादी सत्ता आपापसांत झुंजत असल्यामुळेच रशियात क्रांती होऊ शकली. खरे म्हणजे इतर युरोपीय देशां-तील कामगारांच्या तुलनेने पाहता रशियन कामगार तितकासा संघटित नाही. शिवाय त्याला वर्गयुद्धाची नीटशी जाणीवही नाही. रशियन कामगारवर्गाजवळ काही विशेष गुण आहेत म्हणून प्रथम रशियात क्रांती झाली हे म्हणणे बरोबर नाही. अतिशय थोडचा अवधीत रशियातील श्रमिक जनता क्रांती करू शकली, याचे कारण रशियाच्या विशिष्ट परिस्थितीतच शोधले पाहिजे. रशिया हा मूलत: शेतीप्रधान देश असून युरोपच्या तुलनेने तो सर्वांत मागासलेला देश आहे. त्यामुळे तेथे समाजवाद आपोआप प्रस्थापित होईल असे मानण्याचे कारण नाही. या पहिल्या क्रांतीमुळे आपल्याला अभिप्रेत असलेली कामगार-क्रांती जवळ आणली आहे, एवढाच या पहिल्या क्रांतीचा फायदा आहे. कारण अखेरीस रशियन क्रांतीचे जागतिक समाजवादी क्रांतीमध्ये पर्यवसान घडवून आणावयाचे आहे, हे आपण सर्वांनी ध्यानात ठेवले पाहिजे.'

१० एप्रिल हा दिवस उजाडला. रात्री अडीचच्या सुमारास लेनिनप्रभृति बोल्शे-व्हिक नेते स्टेशनवर येऊन पोचले. लेनिनच्या प्रयाणाची बातमी गुप्त राह्यावी यासाठीच खास गाडी अवेळी सुटणार होती. त्यामुळे स्टेशनवरचा निरोप समारंभ अतिशय शांततेने व मामुली रीतीने पार पडेल अशी प्लॅटेनची अपेक्षा होती. परंतु बर्नमधल्या काही कामगार कार्यकर्त्यांना ही बातमी कळली होती. युद्धखोर जर्मन सरकारचे पैसे घेऊन लेनिन रशियाला परतत असल्याची बातमी कळताच पन्नास एक कार्यकर्ते त्याचा निषेध करण्यासाठी स्टेशनवर आले होते. त्यांच्या हातात लेनिनच्या निषेधाचे फलक होते. स्टेशनवर येताच, लेनिनचे या निदर्शकांकडे लक्ष गेले. त्यांच्या हातातील फलक वाचल्यानंतर लेनिन नुसता हसला व प्लॅटफॉर्मवर उभ्या असलेल्या

गाडीकडे जाऊ लागला. लागलीच, ' हा बघा जर्मन हस्तक ! ', ' कैसरचा पैसा घेऊन यांचा प्रवास सुरू होत आहे ' अशा घोषणा निदर्शकांनी सुरू केल्या.

गाडी सुटण्याची वेळ होत आली होती. एवढयात सिगफ्रीड ब्लोख हा स्विस कार्यकर्ता लेनिनच्या डब्यापाशी येऊन त्याला म्हणाला, ' कॉमरेड, तू येथे लवकर परतशील अशी मी आशा करतो. '

' छे '—लेनिन उतरला, ' तसे घडले तर आमचे उद्दिष्ट फसले आहे असे म्हणावे लागेल. '

ब्लोखशी बोलत असतानाच डॉ. ऑस्कर ब्लूमही या गाडीतून प्रवास करणार असल्याची बातमी लेनिनला कळली. ताबडतोब तो लगबगीने ब्लूमच्या डब्यापाशी गेला व त्याने ब्लूमला ' या गाडीतून तू प्रवास करता कामा नयेस ' असे बजावले. परंतु ब्लूम ऐकेना. ब्लूम पोलिसांचा हस्तक आहे असा लेनिनचा संशय होता. त्यामुळे ब्लूम आपले ऐकत नाही हे पाहताच लेनिन त्याच्या डब्यात शिरला व अक्षरश: धक्काबुक्की करून त्याने ब्लूमला बाहेर काढले.

रॅझानोव्ह हा ट्रॉटस्कीचा मित्र धावत धावतच प्लॅटफॉर्मवर आला. गाडी अजून सुटलेली नाही हे पाहून त्याला बरे वाटले. तो झिनोव्हेव्हला शोधत होता. त्याला बाजूला घेत रॅझानोव्ह म्हणाला, ' झिनोव्हेव्ह, रशियात क्रांती झाल्याची बातमी कळल्यापासून लेनिनचे डोके ठिकाणावर नाही. या प्रवासाने आपण कोणता धोका पत्करत आहोत याची त्याला कल्पना नाही. तू समजूतदार आहेस. जर्मनीच्या मदतीने प्रवास करण्याची ही कल्पना सोडून दे असे तू अजूनही लेनिनला सांगू शकतोस. '

झिनोव्हेव्ह म्हणाला, ' तू अद्याप लेनिनला ओळखले नाहीस हेच खरे. '

लेनिनवर झिनोव्हेव्हची एवढी श्रद्धा होती की रॅझानोव्हच्या सूचनेवर साधा विचार करण्याचीही त्याला गरज वाटली नाही. शिवाय त्याला हेही माहीत होते की रॅझानोव्ह म्हणतो तो धोका पत्करला नाही तर बोल्शेव्हिक क्रांतीचे उद्दिष्ट सफल होण्याची शक्यता आपण आपल्या हाताने नाहीशी करून टाकणार आहोत.

बरोबर तीन वाजून दहा मिनिटांनी खास गाडी प्लॅटफॉर्ममधून बाहेर पडली. लेनिन पेट्रोग्राडकडे निघाला होता.

लेनिनच्या या गुप्त प्रवासाचा बेत आखताना जर्मन सरकारने स्विस सरकारचीही मंजुरी मिळविली होती. लेनिन आणि त्याचे सहकारी जर्मनीच्या सीमेबाहेर जाईपर्यंत ही बातमी प्रसिद्ध न करण्याची काळजीही घेण्यात आली होती. लेनिनचा प्रवास सुरू झाल्यानंतर बर्नमधील जर्मन राजदूताला अशी आठवण झाली की या लोकांनी स्वीडनमधून प्रवास करण्याचा परवाना घेतलेला नाही. ताबडतोब त्याने परराष्ट्रीय खात्याला तार करून लेनिनच्या प्रवासाची स्वीडिश सरकारकडून परवानगी मिळविण्याची व्यवस्था करण्यास सांगितले. त्यानुसार बर्लिनमधील स्वीडिश

राजदूताला परराष्ट्रखात्यात बोलावून घेण्यात आले. लेनिन रशियात लवकर पोचणे किती आवश्यक आहे हे जर्मन परराष्ट्रखात्याने स्वीडिश राजदूताला पटवून दिले. या राजदुताच्या प्रयत्नामुळे, लेनिनला स्वीडनमधून प्रवास करू देण्यास आपली परवानगी असल्याचे स्टॉकहोमहून तारेने उत्तर आले. जर्मन सरकारची एक मोठी काळजी दूर झाली.

लेनिनला प्रवासातही आपले लेखन–वाचन शांतपणे करता यावे यासाठी त्याला आणि क्रुपस्कायाला एक निराळा कंपार्टमेंट देण्यात आला होता. प्रारंभी असे व्यवस्थेला लेनिनचा विरोध होता. परंतु शेवटी त्याला आपल्या सहकाऱ्यांचा या आग्रह मान्य करावा लागला. त्याच्या शेजारच्या कंपार्टमेंटमध्ये इनेसा आर्मेन्द, सॅफारोव्ह पतिपत्नी, रॅडेक आणि ओल्गा रॅव्हिच ही मंडळी बसली होती. रॅडेक आणि ओल्गा यांच्या गप्पा आणि हसणे–खिदळणे एवढ्या मोठ्याने सुरू झाले, की लेनिनच्या लिहिण्यावाचण्यात व्यत्यय येऊ लागला. तो तरातरा शेजारच्या कंपार्टमेंटमध्ये गेला व काहीही न बोलता ओल्गाचा हात धरून तिला दुसऱ्या एका डब्यामध्ये नेऊन बसविले. हा प्रकार पाहिल्यानंतर इनेसा आर्मेन्दशी रॅडेक खालच्या आवाजात बोलू लागला.

रॅडेक आणि सॅफारोव्ह या दोघांचे धूम्रपान इतके वेगाने चालू होते की थोड्याच वेळात सारा डबा धुराने भरून गेला. लेनिनला त्याचाही त्रास होऊ लागला. तो म्हणाला, ' ज्याला कोणाला धूम्रपान करायचे असेल त्याने मुतारीत जावे आणि धूम्रपान आटोपल्यानंतर डब्यात परत यावे. ' हा हुकूम ऐकताच, ज्याची त्याची मुतारीकडे जाण्याची गडबड सुरू झाली. यावर उपाय म्हणून प्रत्येकाने क्रमाक्रमाने मुतारीत गेले पाहिजे असे सांगून लेनिनने त्यांचे नंबर ठरवून दिले. प्रवासातही लेनिनने इतके हट्टी वागावे आणि आपल्या हालचालींवर बंधन घालावे ही गोष्ट त्याच्या सहकाऱ्यांना मुळीच पसंत पडली नाही. परंतु त्याच्याविरुद्ध ब्र काढण्याचीही कोणाचीच ताकद नव्हती. सत्ता हाती आल्यानंतर आपण कसे वागणार आहोत याची जणू लेनिनने या प्रवासातही चुणूक दाखविली. साऱ्यांनी आपण सांगू तसेच वागले पाहिजे यावर त्याचा इतका कटाक्ष असे की याबाबत तो कोणाचाही विरोध खपवून घेत नसे.

प्रवासात लेनिनचे अधूनमधून लिहिणे-वाचणे सुरू असावयाचे. त्या वेळी क्रुपस्काया खिडकीतून बाहेरचा प्रदेश न्याहाळत असे. जर्मन प्रदेशातून ही आगगाडी चालली असताना भोवतालच्या खेडेगावांमध्ये फक्त म्हातारेकोतारे स्त्री-पुरुषच हिंडताना दिसत होते. जर्मनीतील तरुण वर्ग आपापली गावे सोडून लढाईसाठी आघाडीवर गेला असल्यामुळे ही खेडेगावे चैतन्यहीन झालेली होती. लेनिनचे बाहेरच्या दृश्याकडे मुळीच लक्ष नसायचे. क्रुपस्कायाने एखादा प्रश्न विचारला तर तेवढ्यापुरते उत्तर देऊन तो पुन्हा आपल्या वाचनात किंवा विचारांत गढून जायचा.

एकटे बसण्याचा कंटाळा आला की तो शेजारच्या कंपार्टमेंटमध्ये जाऊन सहकाऱ्यांशी आपण रशियात पोचल्यानंतर काय घडणार आहे यासंबंधी चर्चा करायचा. एकदा असाच विषय निघाला असताना लेनिन म्हणाला, 'एकतर मी कामगार-क्रांतीचे विजयी नेतृत्व तरी करीन किंवा पेट्रोग्राडमध्ये पोचताच माझे शरीर फाशीच्या खांबाला चिकटलेले तरी आढळेल. मधला पर्याय संभवतच नाही.'

या प्रवासामध्ये कोणालाही मधल्या स्टेशनवर उतरण्याची परवानगी नव्हती. त्यांना हवी असलेली प्रत्येक वस्तू प्लॅटेन प्लॅटफॉर्मवर खरेदी करून आणून देत असे. लेनिन आणि झिनोव्हेव्ह हे दोघेही पट्टीचे बीअर पिणारे होते. त्यांच्यासाठी प्लॅटेनने खास जर्मन बीअर मागविली होती. ही खास गाडी असल्यामुळे तिला बऱ्याच वेळा मध्येच अडकून पडावे लागे. नेहमीच्या गाड्यांची वाहतूक सुरळीत चालू ठेवूनच या खास गाडीचा प्रवास चालू होता. त्यामुळे बर्न ते सासनिट्झ या प्रवासाला तीन दिवस लागले. १३ एप्रिलला रात्री ही गाडी सासनिट्झला पोचली. बंद गाडीतील प्रदीर्घ प्रवास पुरा झाला होता. रात्रभर या मंडळींना स्टेशनवरच्या एका बंद खोलीत ठेवण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी लेनिनने आणि त्याच्या सहकाऱ्यांनी लहानशा होडीतून वीस मिनिटांमध्ये मधली खाडी ओलांडली आणि स्वीडिश भूमीवर पाय ठेवला. ट्रेलेबर्ग येथे गॅनेटस्की त्यांच्या स्वागतासाठी हजर होताच.

तो दिवस ट्रेलेबर्ग येथे काढल्यानंतर संध्याकाळच्या गाडीने ही मंडळी मालमो येथे जाण्यासाठी निघाली. चार दिवसांच्या बंद प्रवासामुळे ते सारेजण कंटाळून गेले होते. परंतु मालमो येथे फार वेळ थांबणे शक्य नव्हते. मालमो स्टेशनवर सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी या मंडळीच्या स्वागताची आणि भोजनाची व्यवस्था केली होती. त्यामुळे आवश्यक तेवढा वेळच तेथे थांबून ही मंडळी स्टॉकहोमच्या गाडीत बसली. मालमो ते स्टॉकहोम हा प्रवास अतिशय कंटाळवाणा वाटत होता. सारी रात्र या प्रवासात काढावयाची होती. परंतु तरीही गाडीत झोप घ्यावी असे काही लेनिनला वाटेना. रात्रभर ते सारेजण गप्पा मारीत बसले होते. लेनिन सांगत होता, 'ज्याप्रमाणे रात्रीनंतर दिवस उगवायचाच त्याप्रमाणेच गेल्या महिन्यातील बुझ्र्वा क्रांतीनंतर रशियात कामगार क्रांती होणारच. आपल्याला लक्ष ठेवायचे आहे ते एकट्या केरेन्स्कीवर. कारण आपले डावपेच ओळखण्याची कुवत त्याच्या एकट्याच्याच बुद्धीत आहे.'

एप्रिलमध्ये हंगामी सरकारमधील केरेन्स्की एक सामान्य मंत्री होता. रशियाची सूत्रे अद्याप त्याच्याकडे आलेली नव्हती. तरीही येत्या काही महिन्यांत केरेन्स्की हाच आपला प्रमुख अडथळा ठरणार आहे हे रशियापासून गेली अनेक वर्षे दूर असलेल्या लेनिनने अचूक ओळखले होते. गॅनेटस्कीने आपल्या आठवणींत लेनिनचे

प्रवासातील हे वाक्य मुद्दाम उद्धृत केले आहे. भविष्यकालीन घटनांचा नेमका वेध घेण्याचे लेनिनचे बौद्धिक सामर्थ्य त्याच्या शत्रूंनीही मान्य केले आहे. मग गॅनेटस्कीसारखे त्याचे भक्त तर त्याच्या अद्वितीय बुद्धिवैभवामुळे दिपून गेले असल्यास नवल नाही.

मालमो ते स्टॉकहोम या प्रवासात लेनिन गॅनेटस्कीला म्हणाला, 'आपल्या पक्षाचे स्टॉकहोममधील केंद्र अतिशय कार्यक्षम राहिले पाहिजे. कारण मी रशियात पोचल्यानंतर बाहेरच्या जगाशी संबंध ठेवण्याचा दुसरा कोणताही मार्ग उपलब्ध होणार नाही.' पहाटेचे चार वाजून गेले तरीही लेनिन आगामी क्रांतीसंबंधी इतक्या उत्कटतेने बोलत होता की याच्या शरीराला विश्रांतीची गरज आहे की नाही याचाच सहकाऱ्यांना प्रश्न पडला. शेवटी गॅनेटस्की म्हणाला, 'तू आता झोप बघू. सकाळी स्टॉकहोममध्ये पोचल्यानंतर आपण आणखी बोलू.'

गॅनेटस्कीने इतका आग्रह केला तेव्हा कोठे लेनिन अंथरुणावर आडवा झाला. सकाळी आठ वाजता स्टॉकहोमच्या अलीकडल्या स्टेशनावर वार्ताहरांची तुकडी लेनिनच्या डब्यात शिरली. गॅनेटस्कीने लेनिनला उठवून वृत्तपत्रप्रतिनिधी मुलाखतीला आल्याचे सांगितले. परंतु लेनिनने त्यांची भेट घेण्यास नकार दिला. तो म्हणाला, 'मला जे काही सांगावयाचे आहे ते मी स्टॉकहोमला पोचल्यानंतर सांगेन.'

तासाभरातच गाडी स्टॉकहोमला पोचली. सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे येथील कार्यकर्तेही स्वागतासाठी स्टेशनवर हजर होते. त्यातील बरेचजण लेनिनच्या परिचयाचे होते. झिमेरवाल्ड परिषदेसाठी तो येथे येऊन गेला असताना स्टॉकहोममधील सोशल डेमोक्रॅट कार्यकर्त्यांशी त्याच्या अनेक बैठकी झाल्या होत्या. कार्ल लिंडहेगेन व टुर नेरमान हे स्टॉकहोममधील प्रमुख कामगार-कार्यकर्ते. त्यांनी रेजिना हॉटेलमध्ये लेनिनच्या उतरण्याची व्यवस्था केली होती. हॉटेलमध्ये पोचताच प्रथम लेनिनने प्रवासाचा सारा वृत्तान्त लिहिण्यास प्रारंभ केला. या वृत्तान्ताद्वारे प्रवासात आपण एकाही जर्मन कार्यकर्त्याला भेटलो नाही हे त्याला जर्मन सरकारला कळवावयाचे होते. कारण त्या अटीवरच लेनिनच्या बर्न ते स्टॉकहोम या प्रवासाची जबाबदारी जर्मन सरकारने स्वीकारली होती. हा वृत्तान्त लिहून झाल्यानंतर लेनिनच्या स्टॉकहोममधील भेटीगाठींना प्रारंभ झाला. लेनिन पेट्रोग्राडला पोचल्यानंतर त्याच्याबाबत हंगामी सरकारचे कोणते धोरण राहील हे जाणून घेण्याची सर्वांनाच उत्कंठा लागली होती. स्वत: लेनिनलाही पेट्रोग्राडमध्ये पाऊल ठेवण्यापूर्वी याचा अंदाज घ्यायलाच हवा होता. इखईड्झला तार करून याबाबतची माहिती मिळविण्याची गॅनेटस्कीने अगोदरच व्यवस्था केली होती. त्यामुळे लेनिन स्टॉकहोमला पोचल्यानंतर थोड्याच वेळात इखेईड्झचे गॅनेटस्कीला उत्तर आले होते, 'सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या सर्व रशियन सदस्यांचे आमची राजवट स्वागतच करील.'

ट्रेखेईड्झचे हे आश्वासन हाती पडताच लेनिन आणि त्याच्या बरोबरची मंडळी टॉर्नियो येथे गेली. त्यातील रॅडेक आणि प्लॅटेन हे दोघेजण रशियन नसल्यामुळे त्यांना पुढे जाऊ देण्यास टॉर्नियोच्या अधिकाऱ्यांनी मना केली. तेथून ते दोघेजण परत स्टॉकहोमकला परतले. टॉर्नियोस पोचताच लेनिन प्रथम पुस्तकांच्या दुकानात गेला व दोन्ही बगलेत मावतील एवढी पुस्तके खरेदी केल्यानंतर तो हॉटेलवर परतला.

स्टॉकहोममध्ये बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांप्रमाणे मेन्शेव्हिक, सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी, ज्युईश बंड आदी पक्षांचे कार्यकर्तेही राहत होते. त्यांच्या बैठकीला लेनिन आवर्जून हजर राहिला. लेनिन स्टॉकहोमला पोचताच पार्व्हस हाही डॉ. हेल्पहॅंड हे नाव घेऊन तेथे आलेला होता. लेनिनची आपल्याला खाजगी भेट घ्यायची आहे असे त्याने गॅनेटस्कीला कळविले. परंतु डॉ. हेल्पहॅंड जर्मन सरकारचा हस्तक असल्यामुळे आपण त्याला भेटू इच्छित नाही असे लेनिनने कळविले. आपला डाव हुकल्यामुळे पार्व्हस बर्लिनला परतला. जर्मन सरकारशी आपला कोणताही संबंध नाही हे लेनिनला दाखवून द्यावयाचे होते व म्हणून लेनिनने डॉ. हेल्पहॅंड याची भेट घेण्यास नकार दिला. ही बातमी लेनिनच्या सूचनेवरूनच स्टॉकहोमच्या पत्रांत प्रसिद्ध करण्यात आली.

स्वित्झर्लंडमधून आलेल्या या क्रांतिकारकांचे कपडे इतके जीर्णशीर्ण झाले होते की स्वीडनमधल्या कार्यकर्त्यांनी त्यांच्यासाठी नवे कपडे खरेदी करण्याचे ठरविले. छानछोकीपणाचा लेनिनला प्रारंभापासूनच तिटकारा असल्यामुळे तो म्हणाला, 'किमती कपडे अंगावर चढवून कार्य करता येत नाही. माझ्यापुरते म्हणाल तर मला हेच कपडे बरे वाटतात.'

रॅडेक म्हणाला, 'तुमचे कपडे निदान धड तरी आहेत. पण माझे हे कपडे पाहा. पॅंट, सदरा, बूट सारे काही फाटायला लागले आहे.'

'ठीक आहे. तुम्हांला गरज असेल तर तुम्ही नवे कपडे खरेदी करा. पण मला मात्र काहीही नको' लेनिनने उत्तर दिले.

स्वीडनमध्ये पोचताच लेनिनला 'प्रावदा'चा ताजा अंक वाचावयास मिळाला. रशियन सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या मवाळ धोरणासंबंधीची बातमी वाचून लेनिन इतका चिडला की या लोकांच्या हातून काहीही होणार नाही अशी त्याची खात्री पटली. तो गॅनेटस्कीला म्हणाला, 'आता गुळमुळीत भाषा वापरून चालणार नाही. आता गरज आहे ती कणखर कृतीची.' 'प्रावदा'च्या ताज्या अंकात कामेनेव्हचा लेख प्रसिद्ध झाला होता. त्या लेखाबद्दल बोलताना लेनिन म्हणाला, 'पहिली क्रांती नष्ट करून तिच्या जागी कामगार क्रांती घडवून आणण्यासाठी किती वेगाने पावले टाकली पाहिजे, याचे कामेनेव्हला ककाडीचेही ज्ञान दिसत नाही.'

स्वीडनमध्ये राहून वेळ वाया घालविण्याची लेनिनची मुळीच तयारी नव्हती. पेट्रोग्राडला पोचण्यासाठी त्याचा जीव अक्षरश: तळमळत होता. टोर्नियो हे गाव स्वीडन आणि फिनलंड यांच्या सीमारेषेवर असल्यामुळे तेथे ब्रिटिश आणि रशियन सैनिक गस्त घालीत होते. रशियन सैनिक आपल्याला फिनलंडमध्ये प्रवेश करू देतात की सीमारेषेवरच अटक करून पेट्रोग्राडला आपली पाठवणी करतात याचा लेनिनला काहीच अंदाज नव्हता. परंतु आता मागे परतूनही चालण्यासारखे नव्हते. त्यामुळे एकाएकाने तपासणी-नाक्यावर जाऊन परवानगी मिळवावी असे लेनिनने ठरविले. गस्त घालणारे सैनिक फिनलंडमध्ये प्रवेश करू इच्छिणांऱ्याची कसून जबानी घेत. नंतर सामानाची तपासणी करीत व त्या प्रवाशाला रशियात जाऊ देण्यास हरकत नाही अशी खात्री पटली तरच प्रवेशाचा परवाना देत असत. या तपासणी-नाक्यावर प्रत्येकाला आपली माहितीही लिहून द्यावी लागे.

लेनिननेही हे माहितीपत्रक भरून दिले.

नाव– व्लादिमिर इलिच उल्यानोव्ह.

कोठून आला ?– स्टॉकहोम–स्वीडन (हॉटेल रेजिना)

जन्म दिवस– १० एप्रिल १८७०. जन्मगाव– सिंबर्स्क.

राष्ट्रीयत्व– रशियन, धर्म– ऑर्थोडॉक्स.

रशिया का सोडला होता ?– राजकीय निर्वासित म्हणून. रशियातून परवाना न घेता पलायन केले होते.

फिनलंडमध्ये थांबणार आहात काय ?– नाही.

कोठे जाणार ?– पेट्रोग्राड. माझी बहीण तेथे आहे. तिचे नाव व पत्ता–मारिया इलिनिचना उल्यानोव्हा, शिरोकाया स्ट्रीट, ४८।९, खोली नं. २४.

व्यवसाय– पत्रकार.

हे माहितीपत्रक भरून दिल्यानंतर लेनिनच्या मार्गातील एक मोठा अडथळा दूर झाला होता. आता रशियात प्रवेश करण्याची त्याला मोकळीक मिळाली होती. तपासणी-नाक्यावरचे अधिकारी प्रश्न विचारत असताना लेनिन अतिशय शांत होता. परंतु 'तुम्हांला रशियात जाण्याची परवानगी देण्यात आली आहे' हे तपासणी-अधिकाऱ्याचे शब्द कानांवर पडताच लेनिनला भावनावेग आवरणे अशक्य झाले. तो एकदम मोठ्याने हसला. त्या हास्याला विजयाची सोनकिनार होती. मिखा इझखाकाया या आपल्या मित्राला मिठी मारीत लेनिन अतिशय आनंदाने म्हणाला, 'कॉमरेड मिखा, सर्व दिव्यातून आपण आता बाहेर पडलो आहोत. लवकरच आपण मायदेशी पोचू आणि रशियाचे भवितव्य आपल्या हाती सुरक्षित आहे हे साऱ्या जगाला दाखवून देऊ.'

रशियाच्या भविष्याचा विचार करीत असताना नकळत लेनिनची मूठ उंचा-

वली गेली.

टोर्नियोहून त्याने आपल्या बहिणीला तार केली, 'सोमवारी सकाळी अकरा वाजता येत आहे. 'प्रावदा'ला कळव.'

तपासणी-नाके ओलांडून लेनिनने फिनलंडच्या म्हणजेच पर्यायाने रशियन भूमिवर प्रवेश केला. कारण त्या वेळी फिनलंड रशियाच्या ताब्यात असून सर्वत्र रशियन प्रभाव दिसून येत होता. रशियन सैनिक व अधिकारी यांना पाहताच, आपण आपल्या परिचित वातावरणात पदार्पण केल्याच्या जाणीवेने लेनिन सुखावला. त्याच्या प्रवासाचा पुढचा टप्पा सुरू झाला. आगगाडी स्टेशनवर थांबली की प्लॅटफॉर्मवरचे रशियन सैनिक लेनिनच्या डब्यात घुसून त्याचा जयजयकार करीत. गाडी सुटली की ग्रेगरी उलोंव्हिच हा लेनिनचा सहकारी खिडकीतून तोंड बाहेर काढून घोषणा करी–'जागतिक क्रांती चिरायू होवो.' लागलीच या घोषणेने सारे स्टेशन दुमदुमून जाई.

रात्री अकरा वाजता लेनिन फिनलंड आणि रशिया यांच्या सीमेवरील बेलो-ओस्ट्रोव्ह स्टेशनवर पोचला. येथे प्रवाशांच्या सामानाची पुन्हा एकदा तपासणी केली जाई. त्यामुळे अर्धा तास गाडी तेथे थांबत असे. लेनिन खिडकीतून बाहेर पाहू लागला तो त्याला शंभर-सव्वाशे कामगार प्लॅटफॉर्मवर उभे राहून आपला जयजयकार करीत असल्याचे दृश्य पाहावयास मिळाले. कामेनेव्ह, झिलआपनिकोव्ह, अॅलेक्झांड्रा कोलोंटे आणि मारिआ उलिचिना लेनिनच्या स्वागतासाठी बेलो-ओस्ट्रोव्हला आले होते.

लेनिनचा हात हातात घेत कामेनेव्ह म्हणाला, 'कॉमरेड, पेट्रोलग्राडमधली जनता तुझी अतिशय उत्कंठेने वाट पाहत आहे.'

उदासवाणे हसत लेनिन म्हणाला, 'मी पेट्रोग्राडला पोचल्यानंतर माझे काय होणार आहे कोणास ठाऊक!'

कामेनेव्ह खळखळून हसला. पेट्रोग्राडमधला कामगारवर्ग आपल्या स्वागतासाठी किती उत्सुक आहे याची लेनिनला अद्यापही कल्पना नाही हे पाहून कामेनेव्हला हसू फुटले होते. नंतर त्याने पेट्रोग्राडमधली परिस्थिती लेनिनला समजावून सांगितली. कामेनेव्ह म्हणाला, "तुझ्या स्वागतासाठी पेट्रोग्राडमधल्या प्रत्येक कामगारात एवढा उत्साह संचारला आहे की तुझ्या अंगाला हात लावण्याची पोलिसांना हिम्मतच होणार नाही. थोड्याच वेळात तुला ते दिसून येईल.'

लेनिनने पाच-दहा मिनिटे तरी प्लॅटफॉर्मवर येऊन आपल्याला दर्शन द्यावे असा कामगारांनी हट्टच धरला. अनिच्छेनेच लेनिन डब्याबाहेर पडला. ही संधी साधून कामगारांनी त्याला खांद्यावर उचलून घेऊन त्याची वेटिंग रूमपर्यंत लहानशी मिरवणूकच काढली. लेनिन आपल्या आयुष्यात लोकांच्या स्वयंस्फूर्त स्वागताचा

एवढा उत्कट अनुभव प्रथमच घेत होता. हे प्रेम आणि ही भक्ती पाहून त्याला संकोचल्यासारखे झाले. कामगारांनी लेनिनला एका खुर्चीवर बसविले व चार शब्द बोलण्याची विनंती केली. लेनिन म्हणाला, 'साम्राज्यवाद्यांशी हातमिळवणी करणारे हंगामी सरकार उलथून पाडण्यासाठी श्रमिक जनतेने आपली एकजूट अभेद्य राखली पाहिजे एवढेच माझे तुम्हांला सांगणे आहे.'

एवढ्यात पासपोर्ट तपासणारे अधिकारी तेथे येऊन पोचले. रशियात जाण्यापूर्वीचा हा शेवटचा अडथळा होता. लेनिनचे मन पुन्हा शंकाकुल झाले. कदाचित हे अधिकारी आपल्याला अटक करतील ही शंका त्याच्या मनाला चाटून गेली. परंतु लेनिनच्या पासपोर्टवर स्टॉकहोममधल्या रशियन कॉन्सल-जसरलची स्वाक्षरी असल्याचे आढळून आल्यामुळे पासपोर्ट अधिकाऱ्यांनी कोणतीच हरकत घेतली नाही. ते म्हणाले, 'गाडी सुटायची वेळ झालेली आहे. आपण आता गाडीत जाऊन बसावे हे बरे.'

आता आपण हमखास पेट्रोग्राडला पोचणार याबद्दल लेनिनची खात्री झाली. डब्यात येऊन बसल्यानंतर तो खिडकीतून हात हलवून कामगारांचा निरोप घेऊ लागला. त्याबरोबरच पुन्हा एकदा लेनिनच्या नावाचा जयजयकार झाला. लेनिनबरोबरची मंडळी 'इंटरनॅशनल' हे समाजवादी क्रांतीचे रणगीत गाऊ लागले. अशा कोलाहलातच गाडी बेलो-ओस्ट्रोव्ह स्टेशनमधून बाहेर पडली.

पेट्रोग्राडच्या वेशीवरील फिनलंड स्टेशन कामगारांनी रंगीबेरंगी पताकांनी नटविले होते. गेले चोवीस तास बोल्शेव्हिक कार्यकर्ते लेनिनच्या जंगी स्वागताची तयारी करण्यासाठी राबत होते. स्टेशनलगतच्या रुळावर कमानी उभारण्यात आल्या होत्या आणि त्यावर लाल झेंडे फडकत होत. त्या दिवशी वृत्तपत्रे बंद असल्यामुळे लेनिन येणार असल्याची वार्ता ट्रकवर ध्वनिक्षेपक लावून कळविण्यात येत होती. त्यामुळे हजारो कामगार फिनलंड स्टेशनच्या रोखाने निघाले. सारे पेट्रोगाड शहर एका नव्या उत्साहाने न्हाऊन निघाले होते.

गाडी फिनलंड स्टेशनात शिरली. लेनिनचा सात दिवसांचा कष्टदायक प्रवास पुरा झाला होता. आपण प्लॅटफॉर्मवर पाऊल ठेवताच आपल्याला अटक केली जाईल, अशी अद्यापही लेनिनला भीती वाटत होती. त्याने डब्यातूनच परिस्थितीचा अंदाज घ्यावयास प्रारंभ केला. शेकडो सैनिक आणि नाविक आपल्याला मानवंदना देण्यासाठी लष्करी शिस्तीने उभे असल्याचे पाहून लेनिनला अक्षरश: आश्चर्याचा धक्काच बसला. सैनिकांच्या मागील बाजूस हजारो कामगार दाटीवाटीने उभे होते. या वेळी परिस्थिती अशी होती की प्लॅटफॉर्मवर पाऊल टाकताच लेनिनने असे म्हटले की विंटर पॅलेस जाळून टाका तर एका तासाच्या आत त्या विशाल प्रासादाची राख पाहावयास मिळाली असती.

१६ एप्रिल १९१७. सकाळी अकरा वाजून दहा मिनिटांनी लेनिनने फिनलंड

स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर पाऊल ठेवले. दहा वर्षांनंतर तो रशियाला परतला होता. या दहा वर्षांच्या अवधीत परिस्थिती इतकी पालटली आहे याची खुद्द लेनिनलाच कल्पना नव्हती. नवे हंगामी सरकार आपल्याला तुरुंगात टाकील हा संभव मनात बाळगत तो पेट्रोग्राडला आला होता आणि येथील वातावरण तर लेनिनमय झाले होते. एखाद्या सम्राटाचे स्वागत व्हावे असा आपल्या आगमनाच्या वेळचा पेट्रोग्राडचा हा थाट लेनिनला सर्वस्वी अनपेक्षित होता.

लेनिन प्लॅटफॉर्मवर उतरताच बँडवर 'मार्सेलेस' हे रणगीत वाजविण्यात आले. बँडवादन आटोपताच नाविक सैनिकांच्या तुकडीचा प्रमुख मॅक्सिमोव्ह पुढे आला आणि त्याने लेनिनला लष्करी पद्धतीने अभिवादन केले. नकळत लेनिनचे हात वर गेले. त्यानेही मॅक्सिमोव्हला लष्करी थाटात प्रति-अभिवादन केले. नंतर मॅक्सिमोव्हसमवेत लेनिनने लष्करप्रमुखाच्या थाटात सैनिकांची पाहणी केली. हा कार्यक्रम आटोपल्यानंतर मॅक्सिमोव्हने त्याला वेटिंग रूमकडे चलण्याची विनंती केली. तेथे पेट्रोग्राड सोव्हिएटच्या वतीने इखेईड्झ, स्कोबोलेव्ह आणि सुखानोव्ह यांनी लेनिनचे स्वागत केले.

याप्रसंगी बोलताना इखेईड्झ म्हणाला, 'पेट्रोग्राड सोव्हिएटच्या आणि रशियन क्रांतीच्या वतीने मी आपले स्वागत करतो......आता आपल्या लोकशाहीचे अंतर्गत आणि बाह्य शत्रूंपासून रक्षण करणे हे आपणा सर्वांचे परम कर्तव्य आहे ! रशियात अवतरलेली लोकशाही टिकावी यासाठी आपल्या एकजुटीची आवश्यकता आहे. या कार्यात आम्हांला आपले अमूल्य सहकार्य लाभेल अशी मी आशा करतो.'

उत्तरादाखल बोलताना लेनिन म्हणाला, 'प्रिय सहकाऱ्यांनो आणि सैनिक, नाविक व कामगार बंधूंनो, यशस्वी रशियन क्रांतीचे स्वागत करण्यासाठी मला येथे येता आले हे मी माझे महद्भाग्य समजतो. जागतिक श्रमिक सेनेचे अग्रदूत म्हणून मी आपल्याला अभिवादन करीत आहे. सध्या सुरू असलेल्या साम्राज्यवादी युद्धाचे अखेरीस साऱ्या युरोपभर यादवी युद्धात पर्यवसान होणार आहे याबद्दल मला शंका नाही. आज साम्राज्यसत्तांच्या वतीने लढणारे सैनिक लवकरच आपली शस्त्रे श्रमिक जनतेची पिळवणूक करणाऱ्या भांडवलदारांवर रोखतील. तो क्षण फार दूर नाही. जागतिक समाजवादी क्रांतीचा सूर्य नुकताच उगवला आहे. त्याच्या किरणांनी युरोपमधील साम्राज्यवादाचे भस्म होईल. तुम्ही रशियात जी क्रांती केलीत ती या नव्या युगाची नांदी ठरणार आहे. जागतिक समाजवादी क्रांती चिरायू होवो.'

लेनिनच्या मनात काय आहे हे इखेईड्झप्रभृति लोकशाहीवाद्यांना या भाषणाने कळून चुकले. रशियात नुकतीच जी 'बूर्झ्वा' राजवट प्रस्थापित झाली आहे ती

नष्ट करण्याची आपली प्रतिज्ञाच लेनिनने रशियात पाऊल ठेवताच बोलून दाखविली होती. तो हे असे बोलणार याची इखेईड्झला कल्पना होती व म्हणूनच त्याने आपल्या स्वागतपर भाषणात 'नवजात क्रांतीचे आणि लोकशाहीचे अंतर्गत आणि बाह्य शत्रूंपासून रक्षण करण्यासाठी लेनिनने आपल्याशी सहकार्य करावे' असे सूचक आवाहन केले होते. परंतु लेनिनने त्याची दखल घेतली नाही. रोखठोक शब्दांत त्याने आपले उद्दिष्ट जाहीर केले.

स्टेशनवरचा विराट स्वागत-समारंभ आटोपल्यानंतर कामगारांनी आपल्या खांद्यांवरून लेनिनची मिरवणूक काढली. लेनिनच्या जयजयकारावाचून दुसरा कोणताही आवाज ऐकू येत नव्हता. स्टेशनबाहेर उभ्या असलेल्या मोटारीपाशी पेट्रोग्राडमधील जनतेचे हे प्रेम पाहून तो पोचण्यास लेनिनला बराच वेळ लागला. सद्गदित झाला. लेनिनने मोटारीत बसण्यापूर्वी पुन्हा एकदा जनसागराकडे नजर वळविली. क्षणभर शांतता पसरली. या जनसमुदायाला अभिवादन करून लेनिन मोटारीत बसला. त्याने पुन्हा एकदा घोषणा केली- 'जागतिक समाजवादी क्रांती चिरायू होवो.' लेनिनची मोटार सुरू झाली. ती दिसेनाशी होईपर्यंत फिनलंड स्टेशनवर जमलेला कामगारवर्ग सतत एकच निनाद करीत होता- 'जागतिक समाजवादी क्रांती यशस्वी होवो.'

लेनिन साऱ्या आयुष्यभर या एका क्षणाची वाट पाहत होता. आपल्या थोरल्या भावाच्या-अॅलेक्झांडरच्या-फाशीची बातमी ऐकल्यापासून लेनिनची एकच प्रतिज्ञा होती-' संपूर्ण आणि सार्वत्रिक, भीषण आणि निर्घृण विनाश.' गेली तीस वर्षे वारंवार उच्चारलेली ही प्रतिज्ञा पूर्ण करण्याचा क्षण आता येऊन ठेपला होता.

(क्रमशः)


आगामी प्रकाशन

# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर वाजे

## □ देखणे राजकारण

प्रत्येकाला आपापला धंदा नीट यावा अशी जगाची अपेक्षा असते. उदाहरणार्थ, न्हाव्याला बिनपाण्याने हजामत करता आली पाहिजे, कारकुनाला मार्जिनल नोटिंग करता आले पाहिजे, लेखकाला वाङ्मयचौर्य करता आले पाहिजे, नवकवीला गद्य लिहिता आले पाहिजे, कंपॉझिटरला संपादक होता आले पाहिजे, आणि चिंपांझीला चित्र काढता आले पाहिजे. पण राजकारणात पडणाऱ्या माणसाला काय आले पाहिजे ? काही नाही. मंत्री होण्यासाठी मॅट्रिक होण्याचीदेखील गरज नाही. मागे एकदा पंडित नेहरूंनीच म्हटले होते, की आपल्या देशाचा वकील म्हणून परदेशी जाणाऱ्या माणसाजवळ यशस्वी होण्यासाठी कोठले क्वालिफिकेशन हवे तर देखणी बायको. याच चालीवर आता अमेरिकेतील एक अध्यक्षपदाकांक्षी गव्हर्नर रोनाल्ड रीजन यांची टेलिव्हिजन–सेक्रेटरी असलेल्या बाई म्हणतात, " देखणेपणा हा राजकीय नेत्याला आवश्यक आहे. आज अब्राहम लिंकन जिवंत असता तर अध्यक्षीय निवडणुकीत त्याचा पत्ताच लागला नसता." बिचारा लिंकन. नशीब त्याचे म्हणून तो आज जिवंत नाही. नाही तर निग्रोंचा मुक्तिदाता म्हणून जगाच्या इतिहासात अजरामर झालेल्या या कुरूप माणसाचा चेहरा टेलिव्हिजनच्या पडद्यावर झळकल्याबरोबर " इतका रद्दी दिसणारा मुक्तिदाता आम्हांला नको," म्हणून निग्रोंनीच त्याला धुडकावून लावले असते. याच्यापुढे यशस्वी अमेरिकन अध्यक्षाला देशातील व जगातील परिस्थितीचे सम्यक् ज्ञान, स्वतःच्या देशाचा उत्कर्ष सतत चालू ठेवण्याची ईर्ष्या, मागासलेल्या देशांना मदत करण्याची उदारता, इत्यादी फालतू गोष्टींची जरूरी लागणार नाही. त्याने दिवसातून किती वेळा व कोणत्या ब्लेडने दाढी करावी, आफ्टर–शेव्ह लोशन कोणते वापरावे, डोक्याला ब्रिलक्रीम वापरावे की पोमेड, टायची नॉट कधीही वाकडी न होण्यासाठी काय करावे, सूट सिंगल ब्रेस्ट घालावा की डबल ब्रेस्ट, या महत्त्वाच्या प्रश्नांवर मात्र खूप काळजीपूर्वक विचार करायला हवा. नाही तर बिचाऱ्याची लिंकनसारखी परिस्थिती व्हायची ! – म्हणजे लिंकनप्रमाणेच तो निग्रो–समस्येसारखा किरकोळ प्रश्न सोडवू शकायचा पण अमेरिकन अध्यक्ष कसा दिसावा या अती महत्त्वाच्या प्रश्नात मात्र नापास व्हायचा.

## ☐ चि. मोर्चेश, कु. निदर्शिनी

केरळमध्ये नुकताच एक "बंद" पाळण्यात आला. त्या दिवशी जन्मलेल्या एका मुलीचे नाव "बंदिनी" ठेवण्यात आले असे परवा वर्तमानपत्रांत वाचले. या पद्धतीने नावे ठेवायची झाली तर हल्ली आपल्याकडे बराच वाव आहे. "बंद"च्या दिवशी जन्मलेली मुलगी "बंदिनी" होते तर हरताळाच्या दिवशी जन्मलेली 'हरतालिका' होणार हे ओघानेच आले. शिवाय बंद पाळणाऱ्या कामगाराची मुलगी बंदिनी होते तर ताळेबंदी करणाऱ्या कारखानदारांची कन्या ताळेबंदिनी होऊ शकेल. दिल्लीला प्रधानमंत्र्यांच्या घरासमोर "धरणा" देण्यासाठी हल्ली बरेचजण येत असतात. त्यातल्या एखाद्या पंजाबी गृहस्थाला मुलगा झाला तर तो "धरणासिंग" होऊ शकेल. मोर्चा अन् घेरा हे तर रोजचेच आहेत, तेव्हा रोज एखादा तरी "मोर्चेश" आणि "घेरा-प्रकाश" जन्माला येत असेल यात शंका नाही, याच्या जोडीला निदर्शन–निदर्शिनी, निषेध–निषेधकुमार, संप-संपत अशाही जोड्या लावता येतील. एकूण हिंदुस्थानातील हल्लीच्या परिस्थितीला जरा निराळ्या अर्थाने नावे ठेवायची चांगली सोय आहे.

•

## ☐ रुचकर मोटार

पैसे खाणारी माणसे हिंदुस्थानात भरपूर आहेत–पण मोटार खाणारा एक तरी माणूस आहे का ? ऑस्ट्रेलियातल्या एका पहिलवानाने पैजेखातर एक सबंध मोटारगाडी चार वर्षांत खाऊन संपविण्याचे कबूल केले आहे म्हणे. हा पहिलवान रोजच्या दंड–बैठकानंतरचा अल्पोपाहार म्हणून दिवसाला एक सायकल खातो की काय, याची कल्पना नाही. पण मला वाटते हिंदुस्थानातली माणसे गहू–तांदळासारख्या फालतू गोष्टी खात बसण्यापेक्षा असे काही खायला शिकली तर अन्नधान्याचा प्रश्न सुटायला वेळ लागणार नाही. अर्थात् आपण मोटारी खायला लागावे असे म्हणावयाचे धाडस मात्र माझ्याने करवत नाही. कारण मोटारी खायच्या म्हणजे प्रत्येकाला मोटारींच्या रेशनशॉपसमोर सुमारे दहा वर्षे क्यूमध्ये उभे राहावे लागायचे. पण आपल्याकडे सायकली मात्र निर्यात होण्याइतक्या तयार होतात. तेव्हा लोकांच्या पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठी ही निर्यात सरकारने तावडतोब थांबवावी आणि केरळ-बंगालच्या उपाशी जनतेला फूल नाही फुलाची पाकळी या चालीवर सबंध सायकल नाही तर निदान सायकलचे स्पोक तरी वाटावेत. कोणी सांगावे, पुढे मागे देशात इतकी सुबत्ता येईल की प्रत्येक भारतीय माणसाला सकाळ–संध्याकाळ सबंध सायकल खायला मिळू शकेल !

○




# क्रिकेटची लढाऊ परंपरा

मुंबईकरांनो, आमचा विजय भोसले तुम्ही का पळविलात आणि महाराष्ट्रीयांनो आमचा विजय मांजरेकर तुम्ही का लांबविलात अशी खलनायकाची न-नाट्य भूमिका जेव्हा महाराष्ट्र आणि मुंबई क्रिकेट संस्थेची पदस्थ मंडळी घेत बसतात तेव्हा त्यांना या दोन संघांतील लढाऊ परंपराच समजली नाही असे नाइलाजाने म्हणावे लागते.

आता मुंबईच्या ब्रेबॉर्न स्टेडियमवर महाराष्ट्र आणि मुंबई यांमधील ' रणजी करंडक ' स्पर्धेतील महत्त्वपूर्ण सामन्याला सुरुवात होत आहे. या लढतीला नेहमीच एक ऐतिहासिक स्वरूप येत असते आणि इतर प्रांताप्रांतांतील सामन्यांपेक्षा एक वेगळाच विलक्षण रंग चढत असतो. १९३४ सालापासून हा संग्राम चालू आहे. प्रा. देवधर, विजय मर्चंट, विजय हजारे, श्रीरंग सोहोनी, के. एम. जाधव, कमल भांडारकर, खंडेराव रांगणेकर, नौश नगरवाला, राजाभाऊ गोखले, हेमू अधिकारी, के. सी. इब्राहीम, उदय मर्चंट, दत्तू फडकर, रावसाहेब व भाऊसाहेब निंबाळकर, माधव मंत्री, मधू रेगे, पॉली उम्रीगर, गुलाबराय रामचंद, नाना जोशी असे कितीतरी विख्यात क्रिकेटपटू महाराष्ट्र आणि मुंबई संघांतून या ना त्या दशकांत झळकून गेले. १९४० साली महाराष्ट्राने ६७५ धावा रचल्या आणि मुंबईने त्या धावसंख्येस ६५० धावांचे तितकेच लढाऊ प्रत्युत्तर दिले. १९४९ मध्ये मुंबईने महाराष्ट्रावर दुसऱ्या डावात जवळ जवळ हजार धावांचा डोंगर उभा करून ठेवला. आणि महाराष्ट्राने सातव्या दिवशी सहाशेवर धावा करून आपल्या परंपरेला साजसा खेळ केला.

मनोहर रेगे

त्यानंतर मात्र दोन्ही संघांचे कर्तृत्व उतरंडीला लागले. पण उभयतांतील जिद्द आणि ईर्ष्या अजून लोप पावलेली नाही, ही अभिमानास्पद गोष्ट मानली पाहिजे. आजच्या ब्रेबर्नवरील सामन्यात विजय मांजरेकर, बाप्पू नाडकर्णी, चंदू बोर्डे यांच्या-सारखे जुन्या परंपरेतील तेजस्वी दुवे या दोन संघांत आपापले अस्तित्व सांभाळून आहेत.

नावांत काय आहे? पुष्कळ आहे आणि काहीही नाही! श्री. विजय मर्चंट म्हणतात, "खेळाडूपेक्षा खेळच श्रेष्ठ." पण महाराष्ट्र आणि मुंबई यांच्या लढ-तीत खेळ आणि खेळाडू बरोबरीने चाललेले आढळतात. आज दोन्ही संघांत नावे आढळत नसली तरी काही नवे तारे चमकत आहेत. त्यांच्यातूनच पुढेमागे श्रेष्ठ प्रतीचे क्रिकेटपटू निपजतील.

मागे मुंबईचे रांगणेकर, फडकर, मंत्री हे महाराष्ट्राकडून खेळले. महाराष्ट्राचे सोहोनी, नाडकर्णी हेदेखील मुंबई संघातून उतरले. पण आज पाहावे तो आमचे विजय भोसले तुम्ही का घेतलेत, आम्हांला कळविले कसे नाहीत? आणि आमचे विजय मांजरेकर तरी तुम्ही कुठे कळवून खेळविलेत? अशा संकुचित मनोवृत्तीच्या निरर्थक लढाया या दोन संस्था करीत आहेत. जन्माने आणि वास्तव्याने उभयतांना रणजी ट्रॉफी नियमाप्रमाणे परवानगी असेल तर कसली औपचारिक परवानगी एकमेक मागता?

महाराष्ट्र आणि मुंबई संस्था आजपर्यंत गनिमी काव्याने बरीच वर्षे लढत आहेत. पण कुणी कुणाविरुद्ध ब्र काढला नाही. सोलापूर, सातारा किंवा औरंगा-बादच्या मॅटिंगवर मुंबईला कोंडीत पकडून महाराष्ट्राने त्यांना हरविले आहे. मुंबईनेही ब्रेबॉर्न स्टेडियम असताना एकदा आझाद मैदानाचा आश्रय घेतला होता! परंतु आज महाराष्ट्राला मुंबईबरोबर उघडचा पाठारावर लढावयाचे आहे म्हणू-नच महाराष्ट्र आणि मुंबईच्या क्रिकेट झुंजीला एक वेगळा अर्थ आहे नि तो म्हणजे आपल्या लढाऊ परंपरेतील काही नमुनेदार दाखले सादर करण्याचा! हा रण-संग्राम ऐकावयास आम्ही उत्सुक आहोत. त्यातील विजय किंवा जलद धावांचा अधिक गुण म्हणूनच मला विशेष किमतीचा वाटत नाही. एकमेक एकमेकांवर अशी क्षणोक्षणी मात करतात त्यात मला अधिक स्वारस्य आहे.

## नऊ का सात?

१७ सप्टेंबर 'महाराष्ट्र टाईम्स' च्या रविवार आवृतीत प्रसिद्ध क्रीडा समीक्षक श्री. वसंत मालेकर यांनी जुन्या मुरब्बी कबड्डीपटूंच्या मुलाखती घेऊन कबड्डी-

मधील एक जुना वाद मोठ्या कौशल्याने हेतूपूर्वक हाताळलेला आहे. कबड्डी खेळात ९ खेळाडू असावेत की ७ असावेत असा त्यांच्या लेखातील मूळ विषय आहे. १९३८ साली जेव्हा कबड्डीला भारतीय ऑलिंपिक्समध्ये स्थान मिळाले तेव्हा खेळलेल्या मुंबई संघाचे नेतृत्व श्री. माधवराव सांडव यांच्याकडे होते. श्री. सांडव म्हणतात, की कबड्डी ७ च खेळाडूंचा असावा. या खेळाचे क्रीडांगण व त्यात खेळणाऱ्या खेळाडूंची दणकट प्रकृती लक्षात घेता ९ खेळाडूंची केव्हाही गर्दीच व्हावी. विशेषत:, पंजाब, दिल्ली, राजस्थान आदी ठिकाणच्या बलदंड शरीरयष्टीच्या खेळाडूंचा विचार केला तर ७ खेळाडूंचा संघ अधिक सोयीचा ठरतो. अशा वेळी अनेकदा २ खेळाडू वाढले तर गर्दी होऊन गोंधळच होण्याचा संभव अधिक. श्री. सांडव कबड्डीच्या प्रत्यक्ष खेळाचे मार्मिक विवेचन करताना म्हणतात, " ७ खेळाडूंच्या संघातील क्षेत्ररक्षकांची चढाईच्या खेळाडूंबरोबर अधिक चपलतेने धावपळ होऊ शकते व चढाई करणाऱ्याला भरपूर मोकळी जागा मिळून गडी टिपणे पण खूप सोयीचे होते आणि त्याला चटकन कोंडीत पकडण्यात क्षेत्ररक्षकांनादेखील चांगले यश मिळते. खेळाची रंगत वाढविण्याच्या दृष्टीने ७ खेळाडूंचाच संघ असणे आवश्यक आहे."

श्री. भाई असोलकर यांच्या मते संघात ९ खेळाडू असल्याने भारतीय स्वरूपाच्या स्पर्धातून त्यामुळे अधिक खेळाडूंना खेळण्याची संधी मिळेल. श्री. वसंतराव कोलगावकर सांगतात की, " भरदार तब्येतीचे खेळाडू, त्यांना पडणारे अपुरे क्रीडांगण हा मुद्दा माझ्या मते क्षुल्लक आहे. कारण पूर्वी हुतुतू खेळ खेळत ते व्यायामपटूच. एकेकाळी पहिलवान बांध्याचेच खेळाडू खेळत असत. पण त्यांना कधी खेळाडूंची गर्दी झाल्याची अडचण भासली नाही, की खेळात चुरस आणण्याच्या मार्गात या दोन अधिक खेळाडूंचा अडसर आडवा आल्याचे आठवत नाही. उलट त्या वेळचे क्रीडांगण ४० × ३० फुटांचे तर आताचे असते ४२।। × ३३ फुटांचे. मग क्रीडांगणाची लांबी–रुंदी वाढल्यावरही खेळाडूंची संख्या कमी व्हावी हे इष्ट नव्हे."

श्री. सो. शं. प्रभू यांनी कबड्डीच्या खेळाची केलेली शास्त्रीय कारणमीमांसा मला अधिक महत्त्वपूर्ण वाटते. ते म्हणतात, " कबड्डीच्या क्रीडांगणाची एकंदर रचना लक्षात घेता क्षेत्ररक्षण करणाऱ्या खेळाडूंचे मधली फळी, दोन कोपरे व साहाय्यक खेळाडू असे तीन भाग पडतात. ७ खेळाडूंत त्यांची वर्गवारी मधल्या फळीत ३, दोन कोपऱ्यांत २ व साहाय्यक २ अशी होते. अशा वेळी ७ खेळाडूंतून २ खेळाडू बाद झाले व ५–१० मिनिटे बाहेरच बसले तर ५ खेळाडूंत ही रचना पूर्णच होऊ शकणार नाही. अशा वेळी पूर्वीच्या जागा पटकन भरून काढण्यासाठी ९ खेळाडूंचा संघच अधिक उपयुक्त ठरतो. उलट ४–५ खेळाडू क्रीडांगणावर उरल्यावर खेळात बचावच अधिक येतो. कारण पूर्वीची रचना पार कोलमडलेली असते व चढाईच्या खेळाडूला हमखास पकडूच अशी खात्री नसते व अशा वेळी क्षेत्ररक्षक पार अंतिम

रेषेपर्यंत चढाईच्या खळाडूचा हल्ला चुकवीत चुकवीत जातात. परिणामी खेळ रंगत नाही. खोलवर चढाई करूनदेखील त्याचा फारसा उपयोग होत नाही." ७ खेळाडूंचाच संघ इष्ट केव्हा ठरेल याचे कारण विशद करताना ते सांगतात की, "अमरपद्धतीने म्हणजेच खेळाडूला स्पर्श झाला अगर त्याची पकड झाली तरी तो बाद न होता प्रतिस्पर्धी संघाला काय गुणच् देण्याच्या पद्धतीचा अवलंब केल्याने."

याबाबत गेली चाळीस वर्षे कबड्डी क्षेत्रात ज्यांनी अधिकारवाणीने प्रत्यक्षपणे प्रामाणिक कार्य केले ते श्री. हरिभाऊ साने म्हणतात, "९ खेळाडूंच्या कबड्डीला शास्त्रीय बैठक आहे. हल्ली ७ खेळाडूंच्या "साखळीच्या" खेळात खेळाडूला वैयक्तिक स्वातंत्र्य नाही."

श्री. वसंत भालेकर म्हणतात त्याप्रमाणे कबड्डी ९ खेळाडूंच्या संघानेच खेळला जावा यासंबंधी फेरविचार करण्याची वेळ आता आली आहे. महाराष्ट्रातील जुन्या जाणत्या कबड्डीपटूंनी आणि या खेळातील विचारवंतांनी एकत्र येऊन आपापली भूमिका स्पष्ट करावी. सबंध-महाराष्ट्राचे एकमत झाले तर राष्ट्रीय पात्रतेवरील प्रतिनिधींना नवाचे महत्व समजून येईल. आणि मगच कबड्डीतील एका नव्या पर्वाला चालना देण्याचे कार्य प्रत्यक्षात होऊ शकेल.

## खेळांची वृद्धी : सरकारचे प्रयत्न

महाराष्ट्र स्टेट स्पोर्टस् कौन्सिलचे चिटणीस आणि शारीरिक शिक्षणाधिकारी श्री. डी. जी. वाखारकर यांना पुण्याच्या सेंट्रल बिल्डिंगमध्ये त्यांच्या ऑफिसात भेटण्याचा काही दिवसांपूर्वी योग आला होता. श्री. वाखारकर यांनी अतिशय आत्मीयतेने विविध खेळांविषयी सरकारी प्रयत्न काय चालले आहेत यांची माहिती दिली. १९६०-६१ मध्ये स्पोर्टस् कौन्सिलने खेळांच्या ७० संस्थांना ५९ हजार ४१ रुपये अनुदान दिले. ६६-६७ मध्ये २६७ संस्थांना सरकारने २ लाख ३५ हजार रुपयांची आर्थिक मदत केली. मैदानाची निगा राखणे व त्यांचा विकास करणे, स्पर्धा भरविणे, स्टेडियम बांधणे, काही खेळांचे विशेष कार्यक्रम झाले तर आणि इतर गोष्टींना सरकारने आजपर्यंत आर्थिक साहाय्य केले आहे, त्याचप्रमाणे जिम्नॅशियम्स उभारणे, शिक्षण-शिबिरे भरविणे आणि खेळांचे साहित्य खरीदणे यांकरिताही निरनिराळ्या ग्रँट्स् देण्यात येतात.

श्री. वाखारकर सांगत होते की, "एकूण २१ जिल्ह्यांत प्रत्येकी दोन म्हणजे ४२ ग्रामीण क्रीडा केंद्रे (रूरल स्पोर्टस् सेंटर्स) स्थापण्यात आली आहेत. त्यामुळे तालुक्यांत आणि खेड्यांत खेळ पोहोचू शकतील. महाराष्ट्रातील २६ जिल्ह्यां-

तील १८ जिल्ह्यांत ' डिस्ट्रिक्ट स्पोर्टस् कौन्सिले ' स्थापन झाली असून त्यांच्या निवडणुका अगदी लोकशाही पद्धतीने येत्या ऑक्टोबरपूर्वी घेण्यात येतील. जिल्हा पातळीवरील क्रीडा संस्थांना आता महत्त्व येणार आहे. या संस्थांना संलग्न असलेल्या संघटनांचे १२ प्रतिनिधी प्रत्येक ' डिस्ट्रिक्ट स्पोर्टस् कौन्सिल 'वरील कार्यकारी मंडळात काम करतील."

त्याचप्रमाणे श्री. वाखारकर यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रत्येक खेळाची एक राज्य-संस्था राहील. म्हणजे महाराष्ट्र स्विमिंग असोशिएशन, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन इत्यादी. या राज्य आणि जिल्हा पातळीवरील संस्था सबंध महाराष्ट्रीय जनतेचे प्रतिनिधित्व मिळाल्याने सर्व थरांत आणि सर्व भागांत काम करू शकतील.

हिंदुस्थानातील स्वतंत्र संस्थांना सरकारची खेळांत ही अडचण नको आहे. १९३२ सालापासून भारतीय क्रिकेटची सूत्रे एका स्वतंत्र संस्थेकडे आहेत. त्यामुळे भारतीय क्रिकेटचा काही फायदा झाला असे म्हणता ? नाव नको ! खेळाडूंना प्रसिद्धी मिळते आणि परदेशी जायची संधी लाभते. बस्स् एवढेच ! हॉकी हा खेळ सोडला तर भारतीय खेळांची अशी सर्वत्र दैना दिसून येते. त्यामुळे सरकारी मध्यस्थी आता सर्वांनाच मान्य करावयास लागणार नि ती योग्यही ठरेल. हत्तीला माहुताच्या अंकुशाची अधूनमधून ' आठवण ' द्यावी लागते. सरकारही तेच काम करणार आहे. पाऊल तर नीट पडले आहे. पाहूया काय होते ते.

## सॉफ्टबॉलमधील कार्यकर्ते आणि खेळाडू

महाराष्ट्रात सॉफ्टबॉलचा खेळ नव्यानेच रुजतो आहे. शाळा-महाविद्यालयांतील मुले-मुली त्याकडे विशेष आकर्षित होत आहेत. या मुलामुलींनीच गेल्या मे महिन्यात जोधपूरला पहिल्याच राष्ट्रीय प्रावीण्य स्पर्धेत महाराष्ट्राला घवघवीत यश संपादन करून दिले आणि तेव्हापासून एक नवी स्फूर्ती घेऊन सॉफ्टबॉल पुण्यात झपाट्याने प्रसारित होत आहे. आज ना उद्या सबंध महाराष्ट्रातच त्याचे प्राबल्य वाढणार आहे. अर्थात त्याचे स्वागत करणाऱ्यांपैकी मीही एक आहे.

३६०० चौरस फुटांचे चौकोनी मैदान. त्याच्या पहिल्या कोपऱ्यात हातात एक एक लांब रूळ घेऊन बॅटर उभा राहतो. या फलंदाजापासून मैदानाच्या मधोमध ४६ फुटांवरून पिचर म्हणजे गोलंदाज त्या फलंदाजाकडे चेंडू फेकतो. फलंदाजाच्या मागे कॅचर उभा असतो. फलंदाज उभा राहतो त्या ठिकाणचा पहिला कोपरा मानला तर ४ ते १ व ४ ते ३ या रेषांमधूनच फलंदाजाला चेंडू टोलवावा लागतो. पहिल्या कोपऱ्यावर किंवा होम-बेसवर एक पंचकोन काढलेला असतो. त्यावरून

व फलंदाजाच्या गुडघा व खांद्याच्या मधून चेंडू गोलंदाजाने टाकला तर तो योग्य ठरविला जातो. असे तीन चेंडू हुकले तर फलंदाज बाद होतो. ९ खेळाडूंच्या संघातील तीन फलंदाज बाद झाले की एक डाव संपतो. असे पाच डाव प्रत्येक संघ खेळतो. प्रत्येक बेसवर एकेक क्षेत्ररक्षक उभा असतो. असे चार क्षेत्ररक्षक झाले. उरलेले चार ( गोलंदाज सोडून ) क्षेत्ररक्षक मैदानाच्या कक्षेत हेतूपूर्वक पेरलेले असतात. फलंदाजाचे फटके ते रोखतात. त्याला धावबाद करतात. वेडेवाकडे फटके त्याला मारावयास लावून त्याच्या हातून चुका घडवितात व त्याला झेलबादही करतात. फलंदाज चारही कोपरे धावले की एक धाव पूर्ण होते. तासाभराचा खेळ. खेळाडूंची शारीरिक तंदुरुस्ती आणि बौद्धिक कसोटी तेथे पणाला लागते. प्रेक्षकांच्या दृष्टीने एक मौज उडून जाते.

गोलंदाजाने टाकलेला चेंडू किती वेगाने, कोणत्या उंचीने आणि कोठल्या दिशेने येतो आहे याचे क्षणार्धात आकलन झाले नाही तर फलंदाजाचे कार्य प्रारंभीच खुंटते. हातातल्या रुळावरची पकड कशी असावी, क्षेत्ररक्षकांमधून चेंडू त्याने कसा पिटाळावा, शारीरिक चापल्याने कसे दौडावे, थबकावे, पुन्हा धावावे, हे जर फलंदाजाला कळले नाही तर सारे व्यर्थ ठरते. म्हणूनच हा खेळ मला एकाग्रचित्त, सतत सराव, शास्त्रशुद्ध अभ्यास, जबर आत्मविश्वास आणि शरीर व मनाच्या एकीकरणासाठी विशेष महत्त्वाचा आणि वरच्या दर्जाचा वाटतो.

प्रताप जाधवराव, विजय टकले, चंद्रसेन दिघे, सुधीर जोगळेकर, हरी पंजवानी, सुरेश पुरंदरे, शोभना शिर्के, माणिक मंत्री, शैला सावंत, उमा दाते, लता पुरोहित, मीरा पाटणकर असे उत्तमोत्तम खेळाडू महाराष्ट्र संघात आहेत आणि पुण्यातील प्रत्येक स्पर्धेत ते हिरीरीने भाग घेत असतात.

येत्या मार्च महिन्यात फिलिपाईन्स–मनिला येथे भारतीय पुरुष संघ आशियाई स्पर्धा खेळण्यासाठी जाणार आहे. कदाचित स्त्रियांच्या स्पर्धाही तेथे होतील. म्हणूनच खेळाडूंनी इथेच थांबून चालणार नाही. जागतिक स्पर्धांत आपणांस नाव कमवावयाचे आहे आणि कर्तृत्व दर्शवावयाचे आहे ही भावना त्यांनी गळी रुजविली पाहिजे. वेळ थोडा आहे म्हणूनच स्पर्धात्मक सरावाचा जोरदार प्रसार व्हावयास पाहिजे. त्या दृष्टीने खेळाडूंबरोबर कार्यकर्त्यांची संख्या वाढली पाहिजे. कारण खेळाडूंना जगविणारे तेच लोक असतात. म्हणूनच गेल्या चार महिन्यांत नाना शितोळे, सुरेश शहा, शीला शिंदे, शोभना शिर्के, शैला सावंत, ललिता परांजपे, विजय टकले, प्रताप जाधवराव अशी जी कार्यकर्ती मंडळी या खेळाच्या वृद्धिसाठी जे हरप्रयत्न करताहेत त्यांबद्दल कृतज्ञतेचे शब्द काढणे आवश्यक वाटते. त्यांचे जेवढे अभिनंदन करावे आणि आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. अशा प्रयत्नानेच महाराष्ट्रातील श्रेष्ठ दर्जाचे सॉफ्टबॉल खेळाडू आशियाई आणि कदाचित आंतरराष्ट्रीय स्पर्धांतही चमकू शकतील. त्या सुखद क्षणाचीच मी वाट पाहत आहे. ○

# चित्रपट

## शरद गोखले

मराठी चित्रपट सर्वसाधारणपणे चालणं कठीणच. परंतु जर एखादं पिक्चर 'क्लिक' झालं, तर वितरकाचा भरपूर फायदा ठरलेला. अशा चालणाऱ्या चित्रपटांमध्ये तमाशा चित्रपटांना लई मागणी. तमाशा चित्रपट म्हटला, की अनंत माने आलेच.

हमखास यशाचा हा धोपटमार्ग सोडून माने-नमाडे या जोडीने पु. भा. भावे यांच्या कथेवरील 'सांगू कशी मी ?' हे हेतूप्रधान चित्र प्रेक्षकांना सादर केले आहे.

शहरी वातावरण दिवसेंदिवस गढूळ होत चालले आहे. नीती-अनीतीच्या कल्पना शिथिल होत आहेत. सहशिक्षणातून नवीन प्रश्न निर्माण होत आहेत. मुलींची वाढती वयं, बरोबरीच्या मुलांचा सतत सहवास, सिनेमा-नाटकांचे धुंद करणारे वातावरण, यांमुळे होणाऱ्या परिस्थितीतून कळत नकळत मुलींच्या हातून चूक होण्याचा व पुढे ती भोगावी लागण्याचा दाट संभव आहे.

अशाच वातावरणात वाढलेल्या अहिल्यची कथा अनंत माने यांनी रुपेरी पडद्यावर आणली आहे. पटकथा-संवादही त्यांचेच असल्याने कथानकातील 'ठिसूळ माल मसाल्या'चा मोठा वाटा स्वाभाविकपणेच त्यांच्याकडे जातो.

महाविद्यालयीन शिक्षण घेणारी अहिल्या ही मध्यमवर्गीय घरातील मुलगी. घरात वडीलधारे माणूस फक्त आई. शिक्षणाबरोबरच फाजील स्वातंत्र्याच्या कल्पना अहिल्येच्या मनात रुजू लागतात. विचारांतील बदल वेषभूषेत व आचारातही दिसू लागतो. स्त्रीच्या स्वाभाविक मर्यादांचाही अहिल्येला विसर पडतो. स्वैर कल्पनांच्या या स्वप्नसृष्टीत वावरत असतानाच शामसारखा प्रेमाच्या खोट्या खेळातील सराईत फलंदाज तिच्या सहवासात येतो. शामच्या रूपाला भाळलेल्या अहिल्येला त्याचे वास्तवरूप दिसतच नाही. आईने लग्नाची गोष्ट काढताच अहिल्या शामकडे जाते. त्याच्या खऱ्या स्वरूपाने मन:स्वास्थ्य हरपलेली अहिल्या

## 'सांग, अहिल्या सांग'



रत्नमाला आणि जयश्री गडकर

आईने आणलेल्या मुलाला होकार देते. नवीन माणसं, नवा संसार, घरातील माणसांची वागणूक, नवऱ्याचा सौजन्यशील स्वभाव याने हरखून गेलेली अहिल्या संसारात रस घेऊ लागते. आणि घरात पाळणा हलू लागल्यावर तर तिला आपल्या पूर्वायुष्याचा पूर्ण विसर पडतो.

अकल्पितपणे शाम तिच्या आयुष्यात पुन्हा प्रवेश करतो. तिच्या इच्छेविरुद्ध धमकीच्या पत्रांचा मारा करून अहिल्येला आपली भेट घेणे तो भाग पाडतो. त्याच्या आसुरी हेतूची पूर्ण कल्पना असल्याने अहिल्या विषाची बाटली जवळ बाळगते. आणि अचूक वेळ साधून शामचा सूड उगवते.

माव्यांची कथा सामान्य, पटकथा समाधानकारक व संवाद सुयोग्य आहेत. चित्रपट निदान १३ रिळांचा असलाच पाहिजे हे किंवा अशा स्वरूपाचे बंधन आपल्याकडे नाही. अशा परिस्थितीत चित्रपटाच्या पूर्वार्धातील बराचसा भाग अकारण लांबलेला व मूळ कथाविषयाला मारक वाटतो. बरे, दाखवलेल्या दृश्यांतून वास्तवता आहे असेही नाही. मग हा सर्व खटाटोप कशासाठी? तर ध्येयवादी

## सांगू कशी मी?

चित्रपट काढताना 'जमला तर धंदाही व्हावा' या हेतूच्या पूर्तीसाठी. (अर्थात हजारो रुपयांचे भांडवल गुंतत असल्याने असा हेतू बाळगण्यात काही चूक आहे असे नाही) धंद्याचे हे तंत्र कथासूत्राशी सुसंबद्धपणे सांधून निघाले तर चांगल्या चित्रपटाचे श्रेयही निर्मात्याला मिळते. आणि व्यावसायिक दृष्ट्याही चित्रपट यशस्वी होतो.

हिंदी चित्रपटसृष्टीतील राज कपूर, बी. आर. चोप्रा आदी निर्मात्यांना जमलेले हे तंत्र आपल्या मराठी निर्मात्यांना जमावे तितके जमत नाही याचा प्रत्यय हा चित्रपट पाहत असताना येतो. उत्तरार्धात उत्तम रंगलेले हे चित्र पूर्वार्धात अपेक्षा पूर्ण करू शकत नाही.

## उत्तम प्रारंभ

विचित्र परंतु नाट्यपूर्ण पार्श्वभूमीवर उभारलेला अहिल्येचा संसार, संसार-चक्रातील अनेक भावपूर्ण बारकावे, अहिल्येच्या आयुष्याची धूळधाण करण्याचा पूर्वायुष्यातील शामचा प्रयत्न आणि अहिल्येच्या हातून होणारा शामचा खून, अशा एकापेक्षा एक सलग घटना कथासूत्राशी सुसंवादित्व ठेवीत पडद्यावरून सरकत जातात आणि प्रेक्षकही चित्र बघण्यात रंगून जातो. चित्राच्या पूर्वार्धात शाम-सारखा उडाणटप्पू, अहिल्या नावाच्या सुधारक तरुणीची फसवणूक करतो. विम-नस्क स्थितीत अहिल्या आईने सुचवलेल्या मुलाबरोबर लग्न करते. एवढेच कथानक पाहावयास मिळते. ६–७ रिळांपर्यंत 'एवढे मोठ्ठे' कथासूत्र पसरावयाचे म्हणजे मसाला हवाच ! मग नको असलेले पिकनिक आले, 'करू प्रेम दोघे' सारखे भिकार व अत्यंत अनावश्यक गीत आले. चित्रपटाच्या या भागामध्ये अहिल्या, तिच्या मैत्रिणी व शाम आणि त्याचे मित्र महाविद्यालयीन विद्यार्थी दाखवले आहेत. पुण्या-मुंबई-सारखा सुधारलेल्या शहरांतूनही आजही या पातळीवरील विद्यार्थी-विद्यार्थिनी फारच थोडे सापडतील. महाविद्यालयीन वातावरण मोठे निर्मळ असते असे मला जराही सूचित करायचे नाही. सुचवायचे आहे ते फक्त इतकेच, की महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे जीवन चितारताना निर्मात्यांचा कल जास्त वास्तव असणे चांगले.

श्रेय नामावळीची सुरुवात अतिशय आकर्षक केली आहे. त्यासाठी शामच्या खुनासाठी अहिल्येवर भरलेल्या खटल्याचा फ्लॅश–बॅक पद्धतीने वापर केला आहे. पूर्वायुष्यातील कटू कहाणी प्रेमळ पतीला सांगण्यास अहिल्या धजावत नाही. तुरुं-गाच्या गजांआडून ती पतीकडे नजर वर करून बघते, आणि "सांग, अहिल्या सांग" म्हणून आग्रह करणाऱ्या पतीला भावपूर्ण डोळ्याने तिने दिलेले उत्तर, "सांगू कशी मी ?" शब्दांकित होऊन पडद्यावर येते. चित्रपटाचा शेवट प्रेक्षकांना सुरुवातीलाच समजतो. हा एवढाच या पद्धतीतील दोष.

दिग्दर्शक अनंत माने यांनी चित्र परिपूर्ण व्हावे यासाठी भरपूर परिश्रम घेत-ल्याचे निश्चितपणे जाणवते. कथा फुलवण्यास त्यांनी व श्री. भावे यांनी अनेक घटनांचा सूचक उपयोग केला आहे. विवाहानिमित्त प्रा. देवधर घराच्या आवारात

वृक्षारोपण करून त्याला कुंपण लावतात ते दृश्य हेतुपूर्तीसाठी चांगल्या प्रकारे वापरले आहे. अहिल्या व शाम जात असताना अहिल्येच्या पायांत काटा मोडतो. त्या वेळचे द्वयर्थी संवादही उल्लेखनीय आहेत. अहिल्येच्या 'ब्राह्मण्याचा' उल्लेख करणे अगदी आवश्यक होते काय? अहिल्येच्या उच्छृंखल वागणुकीमागे तिच्या घरात वडीलधारे पुरुष माणूस नाही हे एक महत्त्वाचे कारण आहे. अहिल्या-मोहनच्या विवाहात सप्तपदीच्या वेळी पदर पेटतो, यात सूचकता आहे. त्याचा वापर करण्यात कल्पकताही आहे. फक्त सिम्बॉल फारच ब्रॉड आहे इतकेच. " बेबंद आम्ही बेधुन्द आम्ही पुढे जाऊ "– आणि– " जरा संभाळ ग, पोरी संभाळ ग, तोल संभाळ ग," हा खेबुडकरांच्या पहिल्याच गीतातील विरोधी समन्वय कथाविषयाची कल्पना देणारा आहे. मान्यांनी त्याचे चित्रीकरणही चांगले केले आहे.

कलाकारांपैकी सर्वांत प्रभावी वाटतात ते अरुण सरनाईक. अहिल्येच्या पतीची– प्रा. मोहन देवधर यांची–भूमिका त्यांनी कमालीच्या तन्मयतेने रंगविली आहे. सहजसुंदर अभिनय हे त्यांचे वैशिष्टय. त्यांना दिलेल्या चष्म्यामुळे आवश्यक तो भारदस्तपणा प्राप्त झाला आहे. उत्कृष्ट भूमिकेबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

अहिल्येची मध्यवर्ती व्यक्तिरेखा जयश्री गडकरने यशस्वीपणे साकार केली आहे. लग्नापूर्वीची व नंतरची अहिल्या, यांच्या वर्तनांतील वास्तव फरक अभिनयाच्या बारीक छटांतून त्यांनी व्यक्त केला आहे. शामचा खून करणारी अहिल्याही त्यांच्या अभिव्यक्तीतून यशस्वीपणे उतरली आहे. सूर्यकांतही खलनायकाच्या भूमिकेत काम ठीक करून जातात. छोटया भूमिकेत रत्नमालेचा (अहिल्येची आई) उल्लेख करणे आवश्यक वाटते.

चित्रपटाची तांत्रिक बाजू पुष्कळच समाधानकारक आहे. विशेषतः, वसंत शिंदे यांचे छायाचित्रण व बळीराम बिडकर यांच्या सेटस्‌चा उल्लेख करणे अगत्याचे वाटते.

संगीताची बाजू राम कदम व कै. वसंत पवार यांनी सांभाळली आहे. ग. दि. मां. च्या लेखणीतून उतरलेले 'रूप सुखाचे माझ्या दारी' हे गीत भावपूर्ण व कथेशी सुसंवादित्व राखणारे आहे. जगदीश खेबुडकर यांचीही बहुतेक गीते अर्थवाही आहेत.

चांगले हेतुप्रधान मराठी चित्रपट दुर्मीळ होत असताना 'पवनाकाठच्या धोंडी'च्या पाठीवर हे दुसरे चांगले चित्र पाहून समाधान वाटले. आपुलकीच्या–प्रेमाच्या भावनेतून चांगल्या मराठी चित्रपटांनाही जर आश्रय मिळाला नाही तर आधीच दुर्मीळ होत चाललेली दर्जेदार मराठी चित्रे अधिकच दुर्मीळ होतील.

O



# पुरंदरच्या बुरुजावरून

राज्याभिषेकाचं निमंत्रण मुंबईच्या इंग्रज टोपीकरांना आलं. रायगडावर महाराज शिवाजीराजांना दि. ६ जून १६७४ रोजी प्रातःकाळी राज्याभिषेक होणार होता. महाराज 'छत्रपति सिंहासनाधीश्वर' होणार होते. ह्या असामान्य महत्त्वाच्या सोहळ्याची निमंत्रणं स्वराज्याबाहेरील मातब्बरांनाही गेली होती. इंग्रज टोपीकर ईस्ट इंडिया कुंपणीवाले मुंबईकर यांनाही निमंत्रण गेलं होतं. इंग्रज वकील राज्यारोहण समारंभा-साठी नजराण्यासह हजर राहणार होता. नजराणा तयार होता, दुभाषा पंडित हजर होता. मुख्य इंग्रज प्रतिनिधी म्हणून कोण हजर राहणार हेही इंग्रजी कुंपणीत ठरलं. इंग्रज साहेब पालखीत बसून मुंबईहून निघाला. निघाल्या दिवशी दिनांक होता १० मे १६७४. ह्या साहेबांचं नाव होतं हेन्री ऑक्झिंडेन.

हेन्री दि. १० ला निघाला. दि. १३ ला सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास तो चौल इथं पोहोचला. साहेबाला जागोजागी रायगडच्या सावध राजकारणाची प्रचिती येत होती.

चौलला पोर्तुगीझांचं लहानसं ठाणं होतं. ते जीव धरून चौलच्या कोटात राहत होते. हेन्री सायंकाळी चौलला पोहोचला. वास्तविक नुकताच दिवस मावळला होता, दाट अंधार दाटला होता, असं मुळीच नाही. पण हेन्रीला दिसलं की, पोर्तुगीझांनी कोटाचे रहदारीचे खासे दरवाजेही बंद करून घेतले होते ! दिवस मावळायच्या आत ही मध्य-रात्रीसारखी सामसूम झालेली पाहून इंग्रज हेन्रीला आश्चर्य वाटलं. मात्र

# आमचं नाणं

## बाबासाहेब पुरंदरे

हेन्रीसाठी दरवाजे खास उघडण्यात आले. हेन्री कोटात गेला. पोर्तुगीझ डेप्युटी गव्हर्नरला तो भेटला, आगत स्वागत झालं. बोलता बोलता हेन्रीने फिरंगी गव्हर्नरला विचारलंच,

" इतक्या लवकर तुम्ही रहदारी बंद करून दरवाजे लावून घेता? का? "

यावर फिरंग्याने हेन्रीला उत्तर दिलं,

" हां हां! कारण तो भयंकर मराठा, शिवाजीराजा, कोणत्या क्षणी चौलवर झडप घालील याचा नेम नाही. "

महाराजांच्या सावध राजकारणाचा असा दरारा होता.

महाराजांच्या सावध राजकारणाचा प्रत्यय हेन्री ऑक्झिडेनलाही आला. त्याचं असं झालं, हेन्री दि. १९ मे १६७४ रोजी रायगडा-खालच्या पाचाड मुक्कामी पोहोचला. नंतर रायगडावर पोहोचला.

रायगडावर राज्याभिषेकाचा सोहळा शानदार झाला. हेन्रीचं लक्ष सोहळ्यापेक्षा राजकारणावर जास्त होतं. व्यापार, अर्थकारण आणि राजकारण यांत आपलं इंग्रजी घोडं पुढं दामटण्याचा प्रयत्न साहेब करीत होता. महाराजांनी नव्याने पाडलेली आपल्या शिक्क्याची नाणी हेन्रीने पाहिली. नाण्यावर मजकूर होता, 'श्रीराजा शिवछत्रपति!' नाणी होती ओवडधोबड. बेढब. त्यांत सौंदर्य नव्हतंच. आवाज गोड नव्हता. अगदी बद्द आवाज! वजनही एकसारखं नव्हतं. हे शिवराई नाणं पाहून हेन्रीच्या डोक्यात एक कल्पना आली. त्याच्या खिशात त्याच्या इंग्रजी

राजाच्या शिक्क्याचं एक नाणं होतं. शिवराईच्या मानानं ते इंग्रजी नाणं फारच सुबक होतं. डौलदार होतं. आवाज गोड होता. छन्न् ! नाण्यावरचा मजकूर व चित्र रेखीव व सुंदर होतं. एका तळहातावर हे आपलं आणि दुसऱ्या तळहातावर शिवशाहीची ती ओबडधोबड शिवराई घेऊन साहेब मनात उमललेला विचार फुलवीत बसला होता. स्वत:शीच रंगला होता. खुश झाला होता. मनात आलेला धूर्त इंग्रजी डाव शिवाजीराजांच्या गळी कसा उतरवावयाचा याचा तो विचार करीत तळहातांवरच्या नाण्यांकडे बघत रायगडावरील आपल्या मुक्कामाच्या हवेलीत विचार करीत बसला होता.

अन् ठरलं त्याचं ! तो उठला. ती तळहातांवरची दोनही नाणी घेऊन तो बालेकिल्ल्याकडे निघाला. दुभाषी बरोबर होताच. तो निघाला होता छत्रपतींच्या अमात्यांना भेटायला. रामचंद्रपंत नीळकंठ हे अमात्य होते. साहेब झपझप निघाला होता. रायगडावर बालेकिल्ल्यात राजसभेच्या दक्षिणांगास अष्टप्रधानांचे राहते वाडे होते. पंत अमात्यांचा वाडा त्यांतच होता.

हेन्री पंतांच्या सदरेवर आला. पंत होतेच. हेन्री आलेला पाहून पंतांनी टोपीकराचं आगत स्वागत केलं. हेन्री सदरेवर बसला. त्याने एकदम विषयालाच हात घातला. त्याने आपले दोन्ही तळहात पंतांपुढं धरले. इंग्रजी आणि मराठी नाणी त्याच्या हातांत होती. हेन्री पंतांना म्हणाला,

" पाहा, हे आमचं नाणं. हे तुमचं नाणं. फरक पाहा ! आमचं नाणं किती सुबक, सुंदर आवाजदार आहे."

दुभाष्याने मराठी तर्जुमा सांगितला. पंतांनी दोन्ही नाणी उचलून न्याहाळली. खरंच होतं हेन्रीचं म्हणणं. साहेब पुढं म्हणाला,

" तुमची नाणी पाडण्याचं कंत्राट तुम्ही आमच्या ईस्ट इंडिया कंपनीला द्या ! आम्ही आमच्याइतकीच तुमचीही नाणी सुंदर तयार करून देऊ !"

" अस्सं !" पंतांनी भिवया उंचावीत म्हटलं.

"–फक्त एकच आमची अपेक्षा. अट, विनंती."

“ कोणती ?”

“ तुमच्या मराठी राज्यात, तुमच्या नाण्यांच्या बरोबरीने आमच्या कंपनीची नाणीही चालावीत !”

इंग्रजी डाव रामचंद्रपंतांच्या लक्षात आला. ते गालात हसले. मराठी राज्यात शिरकाव करण्याची युक्ती टोपीकराच्या टोपीखालून बाहेर पडली होती. पंत हेन्रीला म्हणाले,

“ आपण महाराजांनाच भेटू. त्यांना आपला थोर मनसुबा आम्ही सांगतो. चला !”

लगेच पंत व हेन्री राजवाड्यात आले.

महाराज सदरेवर होते. ते चिटणिसांना काही मजकूर सांगत होते. तेवढ्यात ही इंग्रजी व मराठी नाणी सदरेवर येऊन हाजीर झाली. महाराजांनी पुसलं,

“ काय मनसुबा पंत ?”

“ महाराज, हे टोपीकर हेजीब अर्ज घेऊन आलेत. त्यांचं म्हणणं असं की—”

पंतांनी दोन्ही नाणी महाराजांच्या हाती देत देत हेन्रीचं म्हणणं महाराजांना सांगितलं. महाराजांनी ऐकलं. तळहातावरची ती नाणी बघत बघत ते पंतांना म्हणाले,

“ अस्सं ? एकूण आमची नाणी सुंदर डौलाची असावीत ही टोपीकरांना खरी तळमळ ! त्यांची नाणी आमच्या दौलतीत चालावीत ही आपली केवळ खेळीमेळीची विनंती !! हं ?”

महाराजांच्या भिवया उंचावलेल्या होत्या. त्यांच्या दोनही तळव्यांवर दोन नाणी तोलत होती. महाराज एकदम पंतांना म्हणाले,

“ पंत, टोपीकरांना सांगा–”

महाराजांचा आवाज किंचित चढला. हेन्रीकडे पाहत ते म्हणाले,

“ टोपीकरांना सांगा की, आमच्या स्वराज्यातले सोनार कुशल कारागीर होतील तेव्हा याहीपेक्षा सुंदर नाणी पाडतील. तुमच्या इंग्रजी कारागिरीची आम्हांला गरज नाही !”

महाराजांनी इंग्रजी नाणं पंतांच्या रोखाने फेकले ! हेन्रीच्या लक्षात आलं की, रायगडचं राजकारण सावध आहे. फार सावध आहे. ○


 [पृष्ठ ४ वरून]

महाजन मंडळाने या विवाद्य सीमा भागांचा निवाडा दिला असताना, महाजन मंडळावर आगपाखड करण्याऐवजी महाराष्ट्रीय जनतेने हा सारा खेळखंडोबा केल्याबद्दल महाराष्ट्र सरकारला व महाराष्ट्र काँग्रेसच्या मुखंडांना जबाबदार धरलें पाहिजे व या बोटचेप्या राजकारणाबद्दल खडसावून जाब विचारला पाहिजे.

श्री. यशवंतराव चव्हाण काय किंवा श्री. वसंतराव नाईक काय, हे दोघेही महाराष्ट्रातील काँग्रेस संघटनेचे आजचे अध्वर्यू अद्यापही या अहवालाबाबत गप्प का बसलेले आहेत, हा प्रश्न विचारला गेला पाहिजे. अद्याप हा अहवाल अधिकृत-रीतीने प्रसिद्ध झालेला नाही असे कारण सांगून ते आपल्या मौनव्रताचे समर्थन करतील. पण या अहवालाचा गोषवारा निजलिंगप्पांच्या मुखातून कानडी वृत्त-पत्रांतून प्रसिद्ध झाला असताना या अहवालाबद्दल आपली प्रतिक्रिया व्यक्त कर-ण्याला महाराष्ट्र सरकारला किंवा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसला खळखळ का वाटावी ?

सीमा भागातील जनता गेली अकरा वर्षे आपल्या न्याय्य मागणीसाठी झगडत असताना आणि त्यापायी म्हैसूर सरकारचा रोष निर्धाराने सहन करीत असताना हे आंदोलन करू नका, आम्ही तुमची मागणी श्रेष्ठांकडून मान्य करून घेतो, असे सांगणाऱ्या महाराष्ट्र काँग्रेसने बेळगाव–कारवारवर म्हैसूरी राजवटीचे शिक्का-मोर्तब करणाऱ्या महाजन यांच्या अहवालाला केराची टोपली दाखवून या सीमा-भागातील जनतेबद्दल आपल्याला खरोखरच आस्था वाटते हे कृतीने सिद्ध करा-यला हवे. खोटा रुसवा आणि उसने हास्य यांच्या बळावर सीमा भागातील जनतेला झुलवीत ठेवण्याचा आपला परिचित खेळ महाराष्ट्र काँग्रेसने आता तरी बंद केला पाहिजे आणि ज्या पाटसकर निवाड्याच्या आधारे आंध्र आणि मद्रास या दोन राज्यांतील सीमा निश्चित केल्या गेल्या, त्याच तत्त्वांच्या आधारे महाराष्ट्र आणि म्हैसूर यांच्यातील सीमा निश्चित करा, असे केंद्रीय काँग्रेसनेत्यांना बजावले पाहिजे. आणि ही मागणी केंद्रीय नेते जर मान्य करणार नसतील तर केंद्र सरकार-मधील महाराष्ट्राच्या प्रतिनिधींनी आणि महाराष्ट्र मंत्रिमंडळाने अधिकारपदाचा त्याग करून सीमावादातील मराठी जनतेमध्ये येऊन उभे राहिले पाहिजे. इंग्रजी–हिंदी भाषेचा वाद चिघळताच सुब्रह्मण्यम–अलगेसन आदी दाक्षिणात्य मंत्र्यांनी आपल्या मंत्रिपदाचे राजीनामे प्रधान मंत्र्यांच्या तोंडावर फेकण्याचे धैर्य दाखविले. असे धैर्य दाखविले जाते तेव्हाच सुस्तावलेले काँग्रेस श्रेष्ठ जागे होतात आणि अन्यायाची दखल घेऊ लागतात असाच आजवरचा अनुभव आहे.

श्री. यशवंतराव चव्हाण किंवा वसंतराव नाईक हे सुब्रह्मण्यम यांनी दाखविलेला हा 'मद्रास मार्ग' चोखाळतात की मामासाहेब देवगिरीकरांनी शोधलेल्या 'मन-माड मार्गा'वरून वाटचाल करतात यावरून त्यांचे राजकारण लोकनिष्ठ आहे की खुर्चीनिष्ठ आहे याची कसोटी लागणार आहे. — सदाशिव पेठकर



STUSA

## भारतांतील शेतीव्यवसायाचा कायापालट...

भारतांतील शेती ही गेलीं हजारों वर्षे परंपरागत पद्धतीनें केली जात होती; पण आतां या प्रचंड व्यवसायाचा कायापालट होत आहे. किर्लोस्कर लोखंडी नांगर हे या क्रांतीच्या प्रारंभाचें प्रतीक होय. त्यानंतर विविध प्रकारचे सोयिस्कर नांगर, पेरणी यंत्र, पाणी पुरवठा करणारे अनेक प्रकारचे सेंट्रिफ्युगल पंप आणि विविध यांत्रिक साधनांची निर्मिति करून किर्लोस्कर कारखान्यानें शेती व्यवसायाच्या आधुनिकीकरणाला जोराची गती दिली आहे.

**किर्लोस्कर**



**किर्लोस्कर ब्रदर्स लि.,**
किर्लोस्करवाडी, जि सांगली.

Manoos ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H–649


# लुसलुशीत नसेल

पण

# रसरशीत खासच

★ लेनिनची निर्णायक गरूडझेप

★ आमचे पळपुटे 'परदेशवासी' शास्त्रज्ञ

★ श्रीनगरचे अखेरचे वार्तापत्र

★ ब. मो. पुरंदरे, जयवंत दळवी, विजय तेंडुलकर, इंद्रायणी सावकार, व. पु. काळे, रंगा मराठे या नामवंतांचे निवडक आणि निराळे साहित्य

शिवाय '*ग्यानबा*'चे *काहीतरी खास*

# माणूस

## साप्ताहिक

एक समस्याप्रधान दिवाळी अंक

**मूल्य दोन रुपये केवळ**


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**